UNIVERSAL
LIBRARY
OU_192505
UNIVERSAL
LIBRARY

# बालसुहृद्

---

- लेखक -

गोविंद रावजी चोळकर, बी. ए. बी. टी.

मुख्याध्यापक, गोविंदराव हायस्कूल,

इचलकरंजी.

---

किंमत १२ आणे.

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ-भांडार,
कोल्हापूर.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुद्रक :
वा. ना. ठकार
श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस
कोल्हापूर.

# उपायन-पत्रिका

**आजचे बालक व बालिका**

हेच भारतभूचे भावी आधारस्तंभ होत. ते शीलसंपन्न व तेजस्वी व्हावेत व त्यांनीं स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ह्यांच्या उत्कर्षाकरितां झटावें या हेतूनें लिहिलेलें हें पुस्तक त्यांसच उपायन देतों.

लेखक.

# प्रस्तावना

साधारणपणें १२ ते १६ वर्षांच्या बालबालिकाकरितां मी हे लेख लिहिले आहेत. 'बाल आषोडशवर्षाद्' सोळा वर्षांपर्यंत बाल समजावा. ह्या वयांत मुलें आडमुठीं असतात असे म्हणतात. वास्तविक इतकेंच असते कीं ह्या वयात मुले नुसत्या प्रेमाने किंवा धाकाने वळत नाहींत त्याची समजूत घालावी लागते. त्याच्यात थोडीशी विचार करण्याची शक्ति उत्पन्न झालेली असते. म्हणून त्याना वळण लावूं इच्छिणारानें त्याचें हित कशात आहे; हे त्याच्या बुद्धीला पटवून देण्याचाहि प्रयत्न केला पाहिजे. नुसते, अमुक कर, नाहीं तर शिक्षा करीन असें म्हणून भागणार नाहीं.

हे वय एका दृष्टीने फार महत्त्वाचे असते. ह्या वयात मुलाच्या विचाराला दिशा लागते. पुष्कळ वेळा योग्य मार्गदर्शक न लाभल्यामुळें त्याची स्थिति प्रवाहपतितासारखी होते; पण तसा जर लाभला तर त्याचा आयुष्याला उत्तम वळण लागून त्याचा व समाजाचा फार मोठा फायदा होण्याचा संभव असतो.

ह्या वयात मुलें बिघडण्याचा जितका संभव असतो तितकाच तीं सन्मार्गाकडे वळण्याचा असतो. ह्या वयातच मुलें विड्या, सिगारेट ओढावयास, नट्टापट्टा करावयास शिकतात. तर ह्याच वयात तीं स्वदेशी माल वापरण्याच्या, व्यायाम करून शरीर बळकट बनविण्याच्या, चहा सोडण्याच्या शपथा घेतात; किंवा स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ह्यांच्या उत्कर्षाकरिता एकाद्या त्यागी व लोकमान्य पुढाऱ्याच्या मागोमाग जाण्याचा निश्चय करतात.

ह्या वेळीं जर थोर मनाचा शिक्षक किंवा पुढारी त्यांच्या नजरेसमोर असेल तर त्यांच्या आयुष्याला इष्ट वळण लागण्यास मदत होते. ह्यावेळीं जर त्याचे वाचनात उदात्त विचार सांगणारें वाङ्मय आलें तर त्याचाही बराच अनुकूल परिणाम होतो. तें वाङ्मय त्याच्याकरितां मुद्दाम लिहि-

लेलें—म्हणजे सोप्या, शुद्ध व आकर्षक भाषेंत लिहिलेलें असेल तर त्याचा परिणाम अधिक होईल हेंहि निर्विवाद आहे.

रोजच्या पण अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी घेऊन तसें लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. ज्या गोष्टी मनुष्याला सद्गुणी व सुखी बनविण्यास आवश्यक आहेत त्यांचेंच महत्त्व वर्णन करून बालमनावर त्याचा ठसा उमटावा असा माझ्या लिहिण्याचा हेतु आहे. तो कितपत साध्य झाला आहे हें वाचकानीं ठरवावयाचें आहे. मुलाना जर हे लेख आवडले, आईबापाना जर पसंत पडले, शिक्षकाना जर मुलाना इष्ट वळण देण्याचे कामीं उपयुक्त वाटले तर माझा हेतु सफल झाला असें मी समजेन.

हे लेख वरील लोकांना आवडल्यास आणखी निदान एक पुस्तक होईल इतके अगत्याचे विषय माझ्या दृष्टीपुढें आहेत. त्यावर मी लिहिण्यास सुरवातहि केली आहे.

थोडक्यात सागावयाचें तर मुलें उद्योगी, सद्गुणी, समाज व राष्ट्रहित–तत्पर व्हावींत म्हणून व सर्वांशीं त्याच्या हिताचे दोन शब्द बोलण्याचे प्रसंग मला लाभणें शक्य नाहीं, म्हणून लेखनद्वारा ते सागण्याची संधि मी घेतली आहे.

अशा प्रकारचे पुस्तक मुलामुलींना उपयुक्त होईल म्हणून प्रथमपासून मला उत्तेजन देणारे माझे एका वेळचे सहकारी विद्वद्वर्य प्रो. वामन मल्हार जोशी याची या पुस्तकाचे प्रकाशन करिताना मला प्रथम आठवण होते.

इचलकरंजीचे अधिपति श्री. **नारायणराव बाबासाहेब घोरपडे** यांची विद्वत्ता व दातृत्व महाराष्ट्रात व महाराष्ट्राचे बाहेरहि विद्वानाना सुपरिचित आहेत. श्रीमंतानीं हे सर्व लेख वाचून मार्मिक सूचना केल्या व प्रकाशनाकरिता शंभर रुपयाची उदार देणगी दिली. याबद्दल मी श्रीमंताचा अत्यंत ऋणी आहें.

माझे स्नेही रा. रा. कृष्णाजी रामचंद्र कुलकर्णी, एम्. ए., हेडमास्तर विद्यापीठ हायस्कूल कोल्हापूर, यानीं सर्व लेख वाचून उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्याचा फार आभारी आहें. माझे सहकारी मित्र

रा. रघुनाथ रामचंद्र भावे, 'वाङ्मयविशारद' यांनीं मुद्रितें तपासण्याचे कामीं, तसेंच रा. सिद्धेश्वर सदाशिव दीक्षित, एम्. ए., बी. टी. यानीं परिशिष्ट तयार करण्याचे कामीं मदत केली ह्याबद्दल उभयतांचा मी आभारी आहें.

ज्या ज्या विद्वानांनीं व विदुषींनी लेख आगाऊ वाचून अभिप्राय दिले त्या सर्वांचा मी फार आभारी आहे.

श्री सिद्धेश्वर छापखान्याचे मालक रा० रा० वासुदेव नारायण ठकार यांनी आपुलकीनें छपाईचें काम वेळेवर व चांगलें करून दिलें याबद्दल त्याचे मनःपूर्वक आभार मानतों. शेवटीं महाराष्ट्र ग्रंथ-भांडाराचे चालक रा० गोविंदराव कुलकर्णी यानीं प्रकाशनाचें कार्य मोठ्या संतोषानें अंगावर घेतलें याबद्दल त्यांचे आभार मानून हा 'बालसुहृद्' बालबालिकाचे स्वाधीन करितों.

इचलकरंजी,
अनंतचतुर्दशी शके १८६१

गो० रा० चोळकर.

# बाल-सुहृद्

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रार्थना ... | १ |
| २ | राष्ट्रधर्म ... | ४ |
| ३ | मातृदेवो भव । ... | ८ |
| ४ | पितृभक्त श्रावण ... | ११ |
| ५ | माझे गुरुजी ... | १४ |
| ६ | माझीं भावंडें ... | १७ |
| ७ | शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । ... | २४ |
| ८ | ब्रह्मचर्य ... | २३ |
| ९ | सृष्टिसौन्दर्य ... | ३५ |
| १० | आरामरचना ... | ४१ |
| ११ | शीलपालन ... | ४५ |
| १२ | वक्तृत्व ... | ४९ |
| १३ | वक्तृत्व कलेचा अभ्यास ... | ५३ |
| १४ | वेळाचा सदुपयोग | ५७ |
| १५ | वक्तशीरपणा ... | ६१ |
| १६ | एका पदवीधराचे स्वगत विचार ... | ६३ |
| १७ | अज्ञानेंच स्वराज्य गेलें ! ... | ६९ |
| १८ | दैनंदिनीचें महत्त्व | ७२ |
| १९ | उद्योग ... | ७७ |
| २० | वाचन ... | ८१ |
| २१ | प्रेमबंध ... | ८४ |
| २२ | आईचें मुलास पत्र | ८८ |
| २३ | रत्नाकर ... | ९२ |
| २४ | भाऊबीज ... | ९५ |
| २५ | सौजन्य ... | ९९ |
| २६ | झोंप ... | १०४ |
| २७ | संस्कृत भाषा ... | १०८ |
| २८ | दुराग्रह सोडा ... | ११५ |
| २९ | साधु पुरुष कसे ओळखावेत ? ... | ११८ |
| ३० | एक अर्वाचीन संत | १२३ |
| ३१ | धर्म व उपवास ... | १२६ |
| ३२ | औद्योगिक शिक्षण | १३३ |
| ३३ | व्यसनें ... | १४२ |

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | असे नको. | असें वाचा. |
|---|---|---|---|
| ३ | १४ | Many | More |
| ४ | २ | रहिवश्यानीं | रहिवाश्यानीं |
| ६ | २२ | तत्व | तत्त्व |
| १९ | १ | माझी | माझीं |
| २१ | १ | माझी | माझीं |
| २३ | १ | माझी | माझीं |
| ३५ | १ | सृष्टिसौदय | सृष्टिसौदर्य |
| ५५ | २ | त्याने तर्कशुद्ध | त्याने ते तर्कशुद्ध |
| ५९ | १ | वळाचा | वेळाचा |
| ६५ | २४ | अंगजरा | अग जरा |
| ६७ | ५ | एकदा | एकादा |
| ७७ | १२ | वगैरे | वगैरेच्या |
| ,, | २० | शिक्षण | वळण |
| ८२ | २१ | पयार्थ | पदार्थ |
| ८४ | १५ | व माझ्या | व ते माझ्या |
| ८९ | ५ | गमंत | गंमत |
| १११ | २१ | कुलिन | कुलीन |
| १२७ | १८ | बोबा, | बोवा, |
| १३१ | १२ | असे. | असें. |
| १४० | १३ | लहानपणापासून | लहानपणापासून |

सूचना.—पान ११५ व ११६ यांवर 'गोष्ट' नको 'गोष्ट' वाचा. कथा या अर्थी गोष्टी व इतरत्र गोष्ट व गोष्टी समजावें.

# बालसुहृद्

## : १ : प्रार्थना

आपणांस जें जें दिसतें तें सर्व एका प्रचंड शक्तीनें निर्माण केलें असून, ती शक्ति ह्या जगाचें मूळ कारण होय असें सर्व धर्म मानतात. ही शक्ति सर्वसामर्थ्यसंपन्न, सर्वज्ञ व दयाळु आहे. ही शक्ति म्हणजेच परमेश्वर व तद्रूप होण्याचा मार्ग, त्याची मनोभावानें प्रार्थना करणें हा होय असें सर्व धर्मांतून सांगितलें आहे.

सर्व धर्मांनीं प्रार्थनेचे मंत्र दिले असून प्रार्थनेच्या वेळाहि ठरवून दिल्या आहेत. हिंदुधर्मात दोन्हीं संध्यासमय व मध्याह्न ह्या प्रार्थनेच्या मुख्य वेळा सांगितल्या आहेत. ह्यावेळीं नदीकांठीं किंवा समुद्रकिनारीं किंवा दुसऱ्या एखाद्या शान्त व पवित्र जागीं प्रार्थना करावी अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे.

प्रार्थनेचा मुख्य हेतु परमेश्वरानें आपणांस बुद्धि द्यावी व त्याच्या कृपेनें आपणांस सत्याचें यथार्थ ज्ञान व्हावें हा होय. अज्ञानानें

आपण प्रमाद करितों. किंवा आपल्या हातून ते घडतात. ते बंद होऊन आपली सुधारणा होण्यास ज्ञानाशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

अज्ञान हेंच सर्व दुःखाचें मूळ आहे; व त्याचा निरास झाला म्हणजे आपण सुखी होतों. म्हणून देवाजवळ समर्थांनीं, 'बुद्धि दे रघुनायका' असें मागणें केलें. ऋषींनीं 'तमसो मा ज्योतिर्गमय' 'अज्ञानांधकार नाहींसा करून, हे देवा, मला ज्ञानप्रकाश दे' अशी प्रार्थना केली. 'हे सवितृदेवा, तुझ्या श्रेष्ठ तेजाचें आम्हीं ध्यान करितों, आमच्या बुद्धीला तूं प्रेरणा दे.' अशी तेजोराशी सूर्यदेवाची प्रत्यहीं द्विज प्रार्थना करितात. सर्व प्रार्थनामंत्रामध्यें हा गायत्री मंत्र श्रेष्ठ होय. ह्यापेक्षां उच्च प्रतीची प्रार्थना असूंच शकणार नाहीं.

आपण देवाजवळ जें मागूं तें शहाणपणाचें असेल किंवा नसेलहि. नसल्यास आपण मागितलेल्या वस्तूनेंच आपणास सुख होण्याऐवजीं दुःख होईल असा विचार मनांत आणून शहाणे लोक, 'देवा, तुला योग्य वाटेल तेंच दे व तुला योग्य वाटेल तसें आम्हांला ठेव' अशी परमेश्वराला प्रार्थना करितात. ही प्रार्थना श्रेष्ठ प्रतीची असून हीच दुःखांतून मुक्त करणारी होय.

परमेश्वरावर पूर्ण विश्वास ठेवून आपलें कर्तव्य करावें. तोच आपणांस मार्ग दाखवील, तोच आपणांस सर्व दुःखांशीं झगडण्यास सामर्थ्य देईल, असा विश्वास सर्व खरे भक्त बाळगितात.

परमेश्वरावर विश्वास ठेवणें म्हणजे 'असेल माझा हरि, तरी देईल खाटल्यावरी।' या वचनांत भासणारा दुबळेपणा व आळस नव्हे. त्यानें दिलेल्या बुद्धीला अनुसरून आपलें कर्तव्य करीत जावें आणि त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकावा म्हणजे तो आपल्याला योग्य मार्ग

दाखवील अशी खात्री बाळगणें म्हणजेच खरी श्रद्धा होय. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' ह्या भगवद्वचनाचा खरा अर्थ असा आहे.

कोणी देवाजवळ धन मागतो, कोणी पुत्रादिक मागतो, कोणी सुंदर बायको मागतो, तर कोणी शत्रूचा नाश होवो म्हणून प्रार्थना करितो. पण ह्या सर्व प्रार्थना कनिष्ठ प्रतीच्या असून खरी प्रार्थना वर सांगितल्याप्रमाणें गायत्री मंत्रांत आहे.

मुलांनो, रोज सकाळीं उठल्याबरोबर व रात्रीं झोंपी जाण्यापूर्वीं परमेश्वराची प्रार्थना करीत जा. उठल्यावर जी प्रार्थना कराल तींत आपल्या हातून चांगलीं कामें व्हावींत, चुका होऊं नयेत म्हणून सामर्थ्य देण्यास देवाला विनंति करा. झोंपीं जाण्यापूर्वीं तुमच्या हातून कळत वा नकळत घडलेल्या चुकांबद्दल परमेश्वराची क्षमा मागा व जीं चांगलीं कामें तुम्हीं केलीं असतील तीं त्याचे चरणीं अर्पण करा; कारण आङ्ग्ल कवि टेनिसन् म्हणतो—

'Many things are wrought by prayer than this world dreams of.'

## : २ : राष्ट्रधर्म

एखाद्या देशांतील रहिवश्यांनीं त्या देशाची सुस्थिति रहावी म्हणून जें केलें पाहिजे तो त्यांचा राष्ट्रधर्म होय. स्वतःची किंवा कुटुंबाची सुस्थिति राखण्याकरितां जें केलें पाहिजे तो व्यक्तिधर्म होय. व्यक्तिधर्मापेक्षां राष्ट्रधर्म श्रेष्ठ मानला तरच एखाद्या राष्ट्राची भरभराट होऊन ती टिकेल. थोरल्या शिवाजीमहाराजांनीं दक्षिणेंत राष्ट्रधर्माची जाणीव उत्पन्न करून स्वराज्य मिळविलें. संभाजी महाराजांना कैद करून औरंगजेबानें त्यांचा बळी घेतल्यावर मराठ्यांचें राज्य नाहींसें होण्याच्या बेतांत होतें. परंतु संताजी, धनाजी वगैरेसारख्या पुरुषांच्या मनांत महाराष्ट्रधर्माची ज्योत तेवत असल्यामुळें हरप्रयत्न करून त्यांनीं 'खूप शर्थीनें' राज्य राखिलें; 'मराठा तितुका' एक झाला—जिवावर उदार झाला म्हणून बाजू सांवरली.

ह्याच्या उलट रावबाजीच्या वेळीं हा राष्ट्रधर्म नाहींसा होऊन सर्व सरदार आपापला स्वार्थ साधण्यांत दंग होऊन गेले. होळकर, शिंदे, भोसले, गायकवाड वगैरे मराठे सरदारांनीं इंग्रजांशीं स्वतंत्र तह केले. प्रत्येक जण आपापल्या पुरतें पाहूं लागला. परिणाम असा झाला कीं, मराठी राज्य उलथून पाडणें इंग्रजांस अवघड गेलें नाहीं.

भारतीय लोक शौर्य, साहस, कल्पकता वगैरे कोणत्याहि गुणांत पाश्चात्यांपेक्षां कमी नाहींत. असें असून मूठभर इंग्रज आज एवढ्या

अवाढव्य देशावर राज्य करितात ह्याचें कारण काय? ह्याचीं जरी अनेक कारणें असलीं तरी त्यांत मुख्य कारण त्या लोकांचा राष्ट्राभिमान नेहेमीं जागृत असतो हें होय. आपल्या देशाकरितां ते वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार असतात. देशावर संकट आल्यास मतभेद, पक्षभेद विसरून हे लोक जिवावर उदार होतात. ह्याच त्यांच्या गुणांमुळें प्रबल शत्रूला सुद्धां ते भारी होतात. इंग्लंडचा इतिहास अशा उदाहरणांनींच उज्ज्वल बनला आहे. ते आपापसांत भांडतील, एकमेकांना जाळतील, परंतु राष्ट्रहिताचा प्रश्न उत्पन्न होतांच सर्व एक होतील. दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा केव्हांहि लाभ होऊं देणार नाहींत.

ह्याच्या अगदीं उलट आमची स्थिति! राघोबानें आपल्या पुतण्याच्या, नातवाच्या विरुद्ध इंग्रजांची मदत मागितली आणि परकीयांना आपल्या घरांत घेतलें, ते तेथेंच कायमचा तळ देऊन बसले व मालकाला त्यांनीं बाहेर घालवून दिलें.

आजही आम्हीं तोच आत्मघातकीपणा चालू ठेविला आहे. स्पृश्य—अस्पृश्य, ब्राम्हण—ब्राम्हणेतर, हिंदु—मुसलमान ह्या भेदांना अवास्तव महत्त्व देऊन आम्हीं आमचें राष्ट्रीयत्व विसरलों आहोंत. वास्तविक पहातां आम्ही सर्व हिंदभूचीं लेकरें असून तिच्या सौभाग्य—रक्षणाकरितां कोणताहि त्याग करण्यास आम्ही तयार असलें पाहिजे. हा धडा इतक्या दिवसांत आम्ही आमच्या राज्यकर्त्यांपासून शिकलों नाहीं तर आमच्या मूर्खपणाला सीमाच नाहीं म्हणायची!

जवळचे कोण व परके कोण हा विचार मनांत नेहेमीं बाळगून आपापसांत कितीहि भांडणें असलीं तरी परकीयांचा हात मध्यें शिरूं न देणें हें शहाणपणाचें लक्षण होय. हाच बोध आपला राष्ट्रीय

ग्रंथ जो महाभारत त्यामध्यें भगवान् व्यासमुनींनीं धर्मराजाच्या मुखानें केला आहे.

तो प्रसंग म्हणजे श्रीमन्महाभारतांतील ‘ घोषयात्रा ’ प्रसंग होय. वनवासी पांडवांना आपलें ऐश्वर्य दाखवून खिजविण्याकरितां दुर्योधन–दुःशासनादिक त्यांचे बंधू मोठ्या दिमाखानें द्वैतवनांत दाखल झाले. तेथें एका सरोवरांत चित्रसेन गंधर्व अप्सरांसहित जलक्रीडा करीत होता. दुर्योधन–कर्णादिकांनीं अशा रीतीनें अवचित येऊन आपल्या क्रीडेंत व्यत्यय आणावा हें त्यास खपलें नाहीं. गंधर्वांची व कौरवांची चकमक उडून त्यांत कौरवांचा पराभव झाला. कर्ण पळून गेला. चित्रसेन दुर्योधन व त्याच्या स्त्रिया यांस बांधून घेऊन चालला. कौरवांच्या अमात्यांनीं ही बातमी धर्मराजाला सांगितली व दुर्योधन आणि त्याच्या स्त्रिया यांस सोडवून आणण्याविषयीं विनंति केली. भीमाला वाटलें बरें झालें. परस्पर तिऱ्हाइताकडूनच कांटा निघाला.

पण धर्मराजास तें मानवलें नाहीं. आपल्या भावांना परकीयांनीं कैद करून न्यावें व आपण तिकडे दुर्लक्ष करावें हें त्यास खपेना. त्यानें अर्जुन व भीम यांस दुर्योधन व त्याच्या स्त्रिया यांस सोडवून आणण्यास आज्ञा केली. धर्मराज म्हणाले, “ आपापसांत भांडतांना ते शंभर व आपण पांच, परंतु परका चालून येईल तर आपण एकशेपांच आहोंत. ”

केवढें उदात्त तत्व ! याचा विसर पडल्यामुळेंच आपल्या राष्ट्राचें अनेक वेळां अपरिमित नुकसान झालें आहे.

राष्ट्राकरितां जीविताचाहि यज्ञ करण्यास जे लोक तयार असतात त्यांचेंच स्वातंत्र्य टिकतें व त्यांचीच भरभराट होते. राष्ट्र-

हिताचा विसर पडून व्यक्तिस्वार्थ बळावला कीं राष्ट्र अधोगतीच्या मार्गाला लागतें व अल्पकाळांत प्रबळ शत्रु त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतो. व मग त्या राष्ट्राची स्थिति ‘ फारच बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच ’ या पंतोक्तींत वर्णन केल्याप्रमाणें अत्यंत दुःसह होऊन राहाते.

आपल्या देशाचा अभिमान बाळगणें व त्याच्या उन्नतीकरितां झटणें हें प्रत्येक नागरिकाचें आद्यकर्तव्य होय. पण याचा अर्थ दुसऱ्या देशाचा द्रोह करणें, त्याच्यावर आक्रमण करून आपली तुंबडी भरणें, दुसरे लोक मरेनात आपली चैन चालली म्हणजे झालें असे विचार बाळगणें हें अन्याय्य व अधर्म्य वर्तन होय. आपण मानानें जगावें व दुसऱ्यासही तसेंच जगूं द्यावें यांतच खरा शहाणपणा आहे.

## : ३ : मातृदेवो भव ।

ह्या जगांत शुद्ध प्रेमाची परमावधि मातेच्या ठिकाणीं आढळून येते. माता मुलांच्याकरितां ज्या खस्ता खाते, जे कष्ट सोसते, जे अपमान निमूटपणें गिळते त्याला तोड ह्या जगांत अन्यत्र दिसून येत नाहीं. निरपेक्ष प्रेमाचा जास्तींत जास्त चांगला नमुना दाखवावयाचा झाल्यास मातेकडेच बोट दाखवावें लागेल. मुलें दुर्वर्तनी निघालीं, त्यांनीं अपमान केला तर मातेला वाईट वाटतें, ती आपल्याशींच रडते, तरी पण तिचें चित्त मुलापाशींच ! मुलें कितीही निष्ठुर झालीं तरी मातेला कठोर होतां येतच नाहीं! आचार्यांनीं म्हटलें आहे, " कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ! "

माता इतकी प्रेमळ असते तरी बहुतेक मुलांना ती जिवंत असेपर्यंत तिची योग्यता नीटशी कळत नाहीं. माता आपल्याला सोडून गेली म्हणजे मात्र, ह्या क्रयविक्रय करण्यांत दंग झालेल्या जगांत, आपली खरी काळजी वहाणारें, आपले कसलेहि अपराध पोटांत घालून आपल्यावर प्रेम करणारें दुसरें माणूस नाहीं ह्याची तीव्र जाणीव झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यावेळीं मात्र, " आज माझी आई असती तर मी तिला फुलाप्रमाणें सांभाळली असती ! तिनें कांहीं काम केलें नसतें तरी चाललें असतें. तिनें नुसतें माझ्याकडे प्रेमानें पाहिलें असतें तरी मला दुःखाचा विसर पडला असता," अशा तऱ्हेचे उद्गार कित्येकांनीं आपल्याशींच काढले असतील. पण मित्रांनो, उपयोग काय ! गेलेली आई पुन्हां येऊं शकत नाहीं.

पैशानें ह्या जगांत सर्व कांहीं मिळतें असें म्हणतात. पण आई—जन्मदात्री आई—काय वाटेल तें मोल दिलें तरी मिळणें शक्य नाहीं. ती एकदां गेली कीं तिची जागा कायमची रिकामीच !

प्रिय वाचकांनो, तुमच्यांपैकीं ज्यांना आई सोडून गेली असेल त्यांना आईच्या प्रेमाचें महत्त्व सांगत बसण्याचें कारणच नाही. विशेषेंकरून तुम्ही ज्या वेळीं अडचणींत असाल, ज्यावेळीं ह्या जगांतील प्रेमाचा दिखाऊ मुलामा नाहींसा होऊन आंतील हिणकस भाग तुमच्या नजरेस पडूं लागला असेल, ज्यावेळीं तुम्ही आजारी असाल, व ज्यांना तुम्ही आपलीं माणसें म्हणत आलांत तींहि तुमच्याशीं परक्यासारखीं वागतांना तुमच्या नजरेस आलीं असतील, त्यावेळीं तुम्हांला त्या प्रेममूर्ति आईची आठवण होऊन तुम्ही एकांतांत अश्रु ढाळले असतील ! पण ज्यांची आई जिवंत असेल त्यांना मात्र माझें हात जोडून सांगणें आहे कीं, मित्रांनो, आईला दुखवूं नका. तिची योग्यता ओळखून तिच्याशीं कृतज्ञतेनें वागा, असें न कराल तर तुम्हांला पश्चात्ताप झाल्याविना रहाणार नाहीं.

आईच्या प्रेमाला या जगांत तुलनाच नाहीं ! मुलाला कांहीं दुखलें खुपलें कीं बिचारीचें चित्त कळवळलेंच ! मूल विशेष कारणाशिवाय ओरडलें तरी हिचा जीव घाबरा झालाच ! मूल आजारी पडलें कीं, त्याची शुश्रूषा करण्यांत तिला कांहींच कष्ट वाटत नाहींत; परंतु मुलाविषयींच्या काळजीनें मात्र बिचारी खंगूं लागते ! मुलें बाहेर गांवीं गेलीं तर तीं तिकडे मजेंत असतात, परंतु आईला मात्र अन्न गोड लागत नाहीं ! पत्र येण्यास जरा उशीर झाला कीं, झाले हिचे तर्कवितर्क सुरू ! मुलांना वाटतें कीं, आपली आई उगीच काळजी करते. ती उगीच काळजी करीत असेल; पण मित्रांनो,

तिची उपेक्षा करूं नका. तिची काळजी काल्पनिक असेल, पण तिचें दुःख मात्र खास काल्पनिक नसतें हें लक्षांत ठेवा.

आई प्रेम करिते हें बऱ्याच जणांना माहीत असेल; परंतु आई आपणांस शिक्षण देऊन आपलें शील बनवीत असते हें फारच थोड्यांस कळत असतें. आपणांस तें कळो वा न कळो. परंतु वस्तुस्थिति मात्र तशीच आहे. जगांत जीं जीं मोठीं माणसें होऊन गेलीं त्यांच्या मोठेपणाला, त्यांच्या माताच बऱ्याचशा कारण होत्या. छत्रपति श्रीशिवाजीमहाराज ह्यांना राष्ट्रभक्तीचें बाळकडू त्यांच्या आईनेंच पाजलें होतें असें आतां इतिहासावरून सिद्ध झालें आहे. नेपोलियन व वॉशिंग्टन ह्यांनींहि आपल्या आईनें आपणांस खरें शिक्षण दिलें असें लिहून ठेविलें आहे. शाळांमध्यें जें आपणांस शिक्षण मिळतें तें विशेषंकरून बुद्धीची वाढ होण्यास उपयोगी पडतें; परंतु खरा मोठेपणा शीलावर अवलंबून असतो व शीलसंवर्धनाचें शिक्षण मुख्यत्वेंकरून माता आपणांस देत असते. म्हणून माता हा आपला गुरूहि आहे.

हिंदुधर्मांतील साधुसंतांना माता ही प्रेममूर्ति आहे हें तत्त्व इतकें पटलें होतें कीं, परमेश्वर व भक्त ह्यांचेमधील अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध दाखविण्यासाठीं ते परमेश्वराला आई म्हणून हांक मारितात. ‘ येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ’। अशांसारखीं वचनें महाराष्ट्र संतकवींच्या ग्रंथांतून ठिकठिकाणीं आढळून येतात.

मातेइतकें प्रेमळ माणूस जगांत दुसरें कोणीहि नाहीं. म्हणूनच उपनिषत्कर्त्या ऋषींनीं तिची देवकोटींत गणना करून ‘मातृदेवो भव’ असा सर्व विद्यार्थ्यांना उपदेश केला आहे. इतकेंच सांगून ते थांबले नाहींत. त्यांनीं आपणांस असें बजाविलें आहे कीं मातेपेक्षां श्रेष्ठ अन्य दैवत नाहीं. ( न मातुः परदैवतम् । )

## : ४ : पितृभक्त श्रावण

दशरथ राजा राज्य करीत असतां, शरयू नदीच्या कांठीं एका शान्त अशा आश्रमामध्यें एक वृद्ध दांपत्य व त्यांचा एकुलता एक मुलगा धर्माचरणांत काल कंठीत असत.

मुलाचें नांव श्रावण असें होतें. त्याचे आईबाप फार म्हातारे असून, अशक्त, पंगू व अंध होते. श्रावणाची आईबापांवर निःसीम भक्ति असून तो त्यांची मनोभावानें सेवा करीत असे. आई ज्या-प्रमाणें आपल्या मुलांची काळजी वाहाते, त्याप्रमाणें हा प्रेमळ मुलगा, वार्धक्यांत आपल्या आईबापांना जपत असे. तो त्यांना स्नान घाली, हाताला धरून त्यांना हिंडवी, कंदमुळें—फळें आणून त्यांना जेवूं घाली, त्यांचें अंग चेपी, त्यांचीं वस्त्रें व त्यांचें आंथरूण—पांघरूण धुवी. कांहींहि उणें पडूं देत नसे. रिकाम्या वेळीं तो त्यांना धार्मिक व शास्त्रीय ग्रंथ वाचून दाखवी.

पावसाळ्यांत एके दिवशीं रात्रीं त्याचे आईबाप तृषार्त झाले असतां, नदीचें स्वच्छ व ताजें पाणी त्यांना आणून द्यावें म्हणून श्रावण घागर घेऊन शरयू तीरावर गेला. रस्ता पायाखालचा असल्यामुळें अंधाराचें त्याला कांहीं वाटलें नाहीं.

ह्याच सुमारास राजा दशरथ धनुष्यबाण घेऊन मृगया करण्याचे हेतूनें त्या भागांत हिंडत होता. श्रावण नदींत घागर बुडवूं लागला

तों तिचा डुबडुब आवाज झाला. तो आवाज कोणातरी वन्यपशूचा समजून दशरथानें त्या आवाजाच्या दिशेनें बाण सोडला. राजा दशरथ शब्दवेधी म्हणजे शिकार प्रत्यक्ष दिसली नाहीं तरी केवळ जिकडून आवाज येईल तिकडे बाण मारून अचूक वेध करणारा होता.

दुर्दैवानें हा बाण त्या ऋषिकुमार श्रावणाला लागला व तो घायाळ होऊन ओरडूं लागला. तो म्हणाला, " मी अरण्यांत राहून आई-बापांची सेवा करणारा एक निरुपद्रवी मनुष्य. मला मारणारा हा निर्घृण पुरुष तरी कोण ? माझ्या आईबापांना आतां कोणाचा आधार ? त्यांनीं कोणाकडे पाहून जीव जगवावा ? हाय रे दैवा, केवढा घात झाला ! पंख उपटून टाकलेल्या पक्ष्याप्रमाणें आतां त्यांची केविलवाणी स्थिति होणार ! "

राजा पुढें जाऊन पाहातों तों एक ऋषिकुमार हृदयांत बाण शिरल्यामुळें विव्हळत व मधून मधून आक्रोश करीत असलेला त्याच्या नजरेस पडला. राजाला फार वाईट वाटलें व त्यानें आपण अजाणतां पशू समजून बाण कसा मारिला हें त्या कुमाराला सांगितलें; व त्याची क्षमा मागितली.

तेव्हां श्रावण दशरथाला म्हणाला, " राजा, माझे आईबाप वृद्ध, अंध व पंगू आहेत. त्यांना माझ्या मदतीशिवाय कोणतीहि हाल-चाल करितां येणें शक्य नाहीं. शिवाय मी त्यांचा एकुलता एक मुलगा. माझ्या मरणाची वार्ता ऐकून त्यांचें हृदय फुटून जाईल. राजा, तुझ्या हातून चुकून गोष्ट झाली खरी ; पण तिचे परिणाम फार घोर होणार. मला मारून तूं माझ्या वृद्ध आईबापांनाहि मारलें आहेस. मला माझ्या मरणाबद्दल फारसें वाईट वाटत नाहीं; पण माझ्या

मातापित्यांची आतां घडगत नाहीं; हा विचार मनांत आला म्हणजे फार दुःख होतें. राजा, माझ्या हृदयांतील शल्य काढ, व मला सुखानें मरूं दे. हें पाणी माझ्या मातापित्याला नेऊन दे. व त्यांची क्षमा माग. राजा, माझ्या आईबापांना माझा शेवटचा प्रणाम सांग. त्यांना सांग कीं, त्यांच्या वार्धक्यांत त्यांची सेवा करण्याचें भाग्य देवानें मला फार दिवस लाभूं दिलें नाहीं हें मी माझ्या पूर्वजन्मीचें पातक समजतों. पुन्हां अनेक जन्म घेऊन मी त्यांची सेवा करीन. त्यांचे उपकार माझ्या हातून केव्हांच फिटणार नाहींत. राजा, माझें एकच मागणें आहे. माझे आईबाप आतां फार दिवस जगणार नाहींत. त्यांची शक्य ती काळजी घे. मी आतां जातों." असें म्हणून त्या पितृभक्त श्रावणानें प्राण सोडला.

राजा त्याची पितृभक्ति पाहून गहिंवरला. आपल्या हातून घडलेल्या घोर अपराधाबद्दल त्याला अत्यंत दुःख झालें. श्रावणाच्या मातापित्यांकडे जाऊन आपल्या हातून घडलेल्या घोर पापाबद्दल त्यानें त्यांची क्षमा मागितली. राजाच्या साहाय्यानें ते आपल्या मृतपुत्राजवळ गेले. त्यांनीं दारुण शोक केला. त्या शोकांतच त्यांचा अंत झाला.



: ५ :

# ‘ माझे गुरुजी ’

मी मराठी शाळेंत शिकत असतांना आम्हांला एक असे शिक्षक लाभले होते कीं, त्यांची आठवण झाली म्हणजे अन्तःकरण आदरानें भरून येतें. माझ्यांत जें कांहीं चांगलें असेल त्याचें कारण बऱ्याच अंशीं हे नाना मास्तर होते, अशी माझी आतां खात्री झाली आहे. नानांचें वर्तन एकाद्या ऋषीसारखें होतें.

नाना आम्हांला प्रेमानें व कळकळीनें शिकवीत. ते स्वभावानें शान्त होते. मुलांनीं शंका विचारल्या तर ते त्यांची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. कोणाला टाकून बोलून त्यांचा हिरमोड ते कधीं करीत नसत. क्वचित् एकादा विशेष मठ्ठ विद्यार्थी आढळला तर ते त्याच्याबद्दल जास्त सहानुभूति बाळगीत असत. त्यांच्या गरीब स्वभावामुळें कांहीं मुलें केव्हां केव्हां दंगा करीत, तरी ते त्यांना एकदम शिक्षा न करतां प्रथम धाक दाखवीत. एखाद्या वेळीं एखाद्या खट्याळ मुलाला शिक्षा करण्याचा प्रसंग येत असे तेव्हांहि ते शिक्षा बेताचीच करीत; कधीं संतापून जात नसत.

नाना पूर्वीची मराठी सहावी इयत्ता पास झालेले. पण तिसऱ्या वर्षाच्या ट्रेनिंगची परीक्षा दिलेले आमचे हेडमास्तर कांहीं प्रसंगीं नानांची मदत घेत. नानांचा गणित विषय फार चांगला. हेडमास्तरांना एखादें उदाहरण अडलें कीं, ते आपला वर्ग नानांकडे पाठवीत. नाना तें सहावीच्या मुलांना उत्तम समजावून देत.

नानांना घरीं जो वेळ मिळे त्यांत ते नियमित वाचन करीत, घरचें थोडेंबहुत पाहत व कोणी सल्ला विचारायाला येई त्याला तो देत. ते रोज संध्याकाळीं आमच्या गांवाबाहेर सुमारें मैलावर शंकराचें देऊळ आहे तेथें नियमानें देवदर्शनास जात. ते मंडळींत गप्पा मारण्यास कधींच जात नसत. फक्त गांवकीची बैठक असली तर ते हजर राहत व लोकांनीं सल्ला विचारला तरच बोलत.

नानांचें कुटुंब पहिल्या बाळंतपणांत आजारी पडलें. जिवावरचें दुखणें. नानांनीं आपल्या पत्नीची उत्तम सेवा केली. त्यांना आढळलें कीं, वैद्यलोक वेळेवर येत नाहींत. जिकडे जास्त फी मिळेल तिकडे आधीं जातात. जास्त जरूर कोणत्या रोग्याला आहे याचा विचार करीत नाहींत. या विचारानें नानांना फार वाईट वाटलें. त्यांनीं निश्चय केला कीं, वैद्यकीचा अभ्यास करावयाचा व गरीबांना सल्ला द्यावयाचा. नानांची बुद्धि अतिशय तीव्र. त्यांना संस्कृताचें ज्ञान होतेंच. तरी पण तें बेताचेंच होतें. त्यांनीं वैद्यकीचे भाषान्तरित ग्रंथ खरेदी केले. पांच सहा वर्षे फुरसतीचा सर्व वेळ त्यांनीं ह्या ग्रंथांचा अभ्यास करण्यांत घालविला. नाना हळुहळू गरीब लोकांना औषधें सांगू लागले. पुष्कळांना गुणहि येऊं लागला. नाना कोणाच्या पैलाहि शिवत नसत. ते म्हणत, " देवानें मला पोटापुरतें दिलें आहे. तेवढें मला पुरें. गरीबांना माझा उपयोग झाला तर तेवढा धर्म माझे हातून घडला असें मी समजतों. " नानांनीं अनेक रोगी पाहिले. दहा बारा वर्षांत त्यांना पुष्कळच अनुभव मिळाला. त्यांना कोणीहि रोगी पाहाण्यास बोलाविलें तरी ते जात. जुन्या परंपरेंत वाढलेले; पण अस्पृश्याकडेसुद्धां ते जात. घरीं येऊन स्नान करीत, पण त्यांनीं कोणाला विन्मुख पाठविलें नाहीं. कोणत्याहि वेळीं मनुष्य बोलवायला येवो.

नानांना सुपारीचेंसुद्धां व्यसन नव्हतें. आमच्या गांवांत दोन सार्वजनिक उत्सव होतात. त्यावेळीं रात्रीं कीर्तनें होतात. फक्त त्यावेळीं नाना जागरण करीत, किंवा रोगी पाहण्यास गेले तर आपोआपच जागरण होई. एऱ्हीं नाना कधींहि जागरण करीत नसत. दुपारीं जडान्न झालें तर नाना रात्रीं जेवीत नसत. नानांना आम्हीं कधीं आजारी पडलेलें पाहिलें नाहीं. ते म्हणत ही देवाची कृपा. मी मोठा झाल्यावर त्यांना म्हणे कीं, नाना हें तुमच्या मनःसंयमाचें फळ आहे. तर ते लगेच उत्तर देत, “ छे छे, असें म्हणू नका. अगदीं नियमित वागणारीं माणसेंसुद्धां केव्हां केव्हां आजारी पडतात. ”

गांवांतील बहुतेक सर्व लोक नानांना मान देत. पण गांव तेथें गुंड असतातच. ते म्हणत, “ नाना चांगलें काम करितात, पण तें सर्व कीर्तीकरितां करितात. ” नानांच्या वैद्यकीय ज्ञानाचा, आमचे गांवांतील व त्याच्या आसपास पांचपंचवीस मैलांतील गरीब लोकांना फार उपयोग झाला.

नाना ८५।८६ वर्षांचे होऊन नुकतेच निवर्तले. त्यांच्या प्रेतयात्रेच्या वेळीं लोकांनीं त्यांना फुलें व पैसे उधळीत नेलें असें सांगतात. मला वाईट वाटतें कीं, मी त्यावेळीं तेथें नव्हतों; असतों तर फार बरें झालें असतें. ह्या आमच्या मराठी मास्तरांनीं आम्हांला जें वळण दिलें त्याचें मोल करितां येणार नाहीं.



# : ६ : माझीं भावंडें

‘ताई ! मी आतां फार दिवस वांचत नाहीं. हें लहानसें घर आणि विम्याचे २॥–३ हजार रुपये येतील येवढाच तुम्हांला आधार. मला जास्त कांहीं करतां आलें नाहीं. नेकीनें दिवस काढून बाळाला शिक्षण द्या. ईश्वर तुम्हांला कांहीं कमी पडूं देणार नाहीं. मला किती गरीबींत दिवस काढावे लागले, हें तुम्हांला माहीत आहेच. अडचणीच्या वेळीं वासुकाकांचा विचार घेत जा; पण पैशाची मदत अगदीं नाइलाज झाल्याशिवाय मागूं नका.

“ताई ! आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली. तुझें शिक्षण आता पुरें झालें आहे. तूं वासुकाकांच्या व तुझे मामांच्या विचारें तुला पसंत पडेल त्या पुरुषाशीं विवाह कर. अशीच राहूं नको. विवाह करून सुद्धां तुला तुझ्या माईला व भावंडांना कांहीं मदत करतां येईल. तुझ्या सुखाच्या आड माझीं माणसें येऊं नयेत, अशी माझी फार इच्छा आहे. माझा प्रपंच सांभाळण्याकरितां मी तुला शिक्षण दिलें नाहीं, तर तुझें कल्याण व्हावें, एवढाच माझा हेतु होता. सांभाळा. सत्य सोडूं नका. अडचणीचे दिवस निघून जातील.”

इतकें बोलून, नानासाहेब डोळे मिटून स्वस्थ पडले. त्यांचें अन्तःकरण भरून आलें. डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. ते इतरांना दिसूं नयेत, म्हणून त्यांनीं हातरुमालानें डोळे झाकून घेतले. बनूताई ( त्यांची थोरली मुलगी ) खालीं मान घालून रडूं लागली.

‘ताई ! अग ताई !’ मी माझ्या वहिवाटीप्रमाणें संध्याकाळीं फिरावयास जातांना नानासाहेबांच्या घरीं जाऊन जिन्याखालीं उभे राहून हाक मारली. ‘नानासाहेब जागे आहेत का ?’

‘काका ! वर या.’ ताई जिन्यापाशीं येऊन डोळे पुशीत मला म्हणाली, ‘आज नानांचें दुखणें अधिक झालें आहे.’ मी वर जाऊन नानांच्या अगदीं जवळ जाऊन बसलों. त्यांनीं रुमाल बाजूला करून डोळे उघडले. ‘भाऊ आलास, बरें झालें. मी आतां १-२ दिवसांचा सोबती. मागच्यांचा सांभाळ करणार तूंच. मी ताईला सर्व सांगितलें आहे. ती तुला सांगेल.’

‘नाना ! असे घाबरूं नका. तुम्ही बरे व्हाल. काळजी सोडा. तुमचा हा मानलेला भाऊ कांहीं कमी पडूं देणार नाहीं. ताई ! तूं नानांजवळ बैस. मी डॉक्टरांना घेऊन येतों.’ कांहीं वेळ नानांच्या जवळ बसून ताईला धीर देऊन मी डॉक्टरांना आणावयास गेलों.

वर वर्णन केलेले नानासाहेब गोरे हे माझे शेजारी. माझ्यापेक्षां ८-१० वर्षांनीं मोठे. त्यांनीं कोर्टांत कारकुनापासून काम करून नाझरची जागा मिळविली होती. आमच्या सातार्‍यांत येऊन त्यांना वीस वर्षें झालीं. एका ठिकाणीं वीस वर्षें कोर्टांत नोकरी केलेले हेच गृहस्थ आमच्या सातार्‍यांत आढळले असें म्हणतात. चोख, काम व कोणाच्या पैलाहि शिवायचें नाहीं, असा त्यांचा बाणा; त्यामुळें लोक व अधिकारी दोघांनाहि ते हवेसे वाटत.

ते सातार्‍यांत आल्यापासून आमच्या शेजारच्या घरीं राहिले. त्यांचा थोर स्वभाव पाहून, माझा व त्यांचा स्नेह जमला. तो इतका कीं, पुढें आम्ही एकमेकांना भावाप्रमाणें मानूं लागलों. माई हें नानासाहेबांचें दुसरें कुटुंब. या कुटुम्बापासून त्यांना कुसुम व

नारायणबाळ अशीं दोन मुलें झालीं. कुसुम १६–१७ वर्षांची असून मॅट्रिकचे वर्गांत शिकत होती. नारायण १२–१३ वर्षांचा असून, इंग्रजी पांचवींत होता. बनूताई पहिल्या कुटुंबाची शेवटची मुलगी. ती एक वर्षापूर्वी बी. ए. होऊन येथील कन्याशाळेंत शिक्षकिणीचें काम करीत होती. नानासाहेबांच्या पहिल्या कुटुंबाच्या आणखी दोन मुली लग्न होऊन मुलांबाळांसहित आपापल्या घरीं सुखानें नांदत होत्या.

नानासाहेबांची राहणी अगदीं साधी. वृत्ति पापभीरु व होईल तितकें दुसऱ्याचें बरें करावयाचें, हा हव्यास. नोकरीमुळें देशकार्य जरी प्रत्यक्ष करतां आलें नाहीं, तरी तें करणारांविषयीं अत्यंत आदर. नोकरी करून राहिलेला बराचसा वेळ ते संतांचे ग्रंथ व महाराष्ट्राचा इतिहास यांच्या वाचनांत घालवीत.

नानासाहेबांचे नियमित वागणुकीमुळें त्यांना कधीं आजारी पडल्याचें मी पाहिलें नाहीं. मात्र गेले ५।६ दिवस ते इन्फ्लुएंझानें आजारी पडून वर वर्णन केलेल्या स्थितींत येऊन पोहोचले होते. मी डॉक्टरांना घेऊन आलों. त्यांनीं प्रकृति पाहिली व ‘ स्थिति बिकट आहे, तथापि झोपेचें औषध पाठवून देतों; आराम पडेल, ’ असें सांगून ते निघून गेले.

त्यानंतर नानासाहेबांनीं एक दिवस जेमतेम काढला. दुसरे दिवशीं रात्रीं ९ च्या सुमारास त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. रात्रीची वेळ असतांनाहि १५०।२०० माणसें आपण होऊन, त्यांच्या स्मशानयात्रेस हजर होतीं. लोक म्हणाले, ‘ नाना—देव गेले. संसारांत राहून परमार्थ साधला नानांनीं. ’

नानांच्या कुटुंबांतील मंडळीला कोणतीही अडचण पडूं नये, म्हणून मी रोज एकदा तरी त्यांच्या घरीं जाऊन, तास अर्धा तास बसून सर्व विचारपूस करीत असें. नानांनीं ताईला शेवटीं सांगितलेली गोष्ट तिनें मला एके दिवशीं आम्ही दोघेच असतां सांगितली; पण स्वतःच्या लग्नाबद्दल नानांनीं दिलेला सल्ला मात्र तिनें मजपासून लपवून ठेविला. ही गोष्ट स्वतः ताईनें पुढें चार वर्षांनीं मला सांगितली.

"ताईचें लग्न आतां लवकर केलें पाहिजे. तिचें शिक्षण आतां पुरें झालें आहे. थांबण्याचें कांहींच कारण नाहीं. एखादें बरेंसें स्थळ पहा." असें नाना मला व इतर स्नेह्यांनाहि गेले कांहीं महिने सांगत असत. 'ताईचें लग्न ठेवूं नका. बाळ मिळवूं लागेपर्यंत तुम्हांस विम्याच्या पैशावर भागवितां येईल. तिचें लग्न लवकर न झाल्यास लोक तुम्हांला नांवें ठेवतील,' असा उपदेश ते आजारी असतांना माईलाहि करीत असत.

नानांच्या कुटुंबाचें बरें व्हावें; आपणांस पैशाची झीज लागली तरीहि चालेल, अशी माझी मनापासून इच्छा व प्रयत्न होता. ताईला एखादा योग्य वर शोधून काढावा, म्हणून मी लक्ष ठेवीत होतों. येथील हायस्कुलांतील तरुण शिक्षक श्रीधरपंत गोखले हे एम्. ए. दुसऱ्या वर्गांत पास झाले होते. गृहस्थ तरतरीत व सुस्वभावी. गरिबींतून स्वतःच्या श्रमानें वर आलेला. मला पसंत, पण ताईचें मत घ्यावें म्हणून मी नाना गेल्यावर २।३ महिन्यांनीं माईच्या देखत गोष्ट काढली.

'माई! यंदा ताईचें लग्न ठेवायचं नाहीं. मी नवरा मुलगा

शोधून काढला आहे. चांगला बुद्धिमान् व सुस्वभावी आहे. मात्र पैसे नाहींत हो! स्वतःचे कर्तबगारीनें शिकलेला आहे.'

'पैसे नाहींत पण नोकरीधंदा तरी आहे का?' माईनीं विचारलें.

"हो. हायस्कुलांत मास्तर आहेत; पंचाहत्तर रुपये मिळतात. गरिबीनें राहिले तर पुरतील." मी उत्तर दिलें. "काय ताई! गरिबींत रहाण्याची तयारी आहे का?" ताईकडे वळून मी विचारलें.

"काका! पंचाहत्तर रुपये म्हणजे गरिबी का? हिंदुस्थानांत किती लोकांना महिना पंचाहत्तर रुपये मिळतात?" ताईनें उत्तर दिलें.

"तर मग आहे कबूल? लागूं पुढच्या मार्गाला? गृहस्थ तूं पाहिलेले आहेस. हायस्कुलांत नवीन आलेले शिक्षक श्रीधरपंत गोखले. तूं होय म्हण, बाकी सर्व मजकडे लागलें. पैशाची व्यवस्था मी आधींच केली आहे."

"काका! नानांच्या जागीं तुम्ही आहांत. गेले तीन महिने आम्हांला एकही अडचण भासली नाहीं. काका तुमचा शब्द मोडणें माझ्या जिवावर येतें. पण—" इतकें बोलून विषण्ण मनानें ताई स्तब्ध बसली.

"ताई! काय मनांत असेल तें ठेवूं नको. श्रीधरपंत गरीब आहेत, पण गुणी आहेत. पैशापेक्षां गुणच अधिक सुख देतात. तुला हें स्थळ पसंत नसेल तर मात्र माझा आग्रह नाहीं."

"काका! स्थळ मला पूर्ण पसंत आहे. मी तुमच्या बाहेर मुळींच नाहीं. पण काका! मी निश्चय केला आहे."

"काय अविवाहित राहण्याचा कीं काय?"

" छेः, मुळींच नाहीं. पावित्र्य राखून अविवाहित राहण्याइतकी विरक्ति माझ्या ठिकाणीं आहे, असें मला वाटत नाहीं. पण काका ! कुसुम व नारायण साधारण मोठीं होऊन मार्गाला लागेपर्यंत तुम्ही मला लग्न करण्याचा आग्रह करूं नये. माझी तुम्हांला वडील या नात्यानें हात जोडून विनंति आहे. "

" ताई ! कुसुम व नारायण यांची मुळींच काळजी करूं नको. मी त्यांचें कांहीं कमी पडूं देणार नाहीं. "

" काका ! तुम्ही आमच्याकरितां किती झीज सोसावी ? शिवाय नानांनीं माझ्यावर जें पुत्राप्रमाणें प्रेम केलें व स्वतःच्या प्रपंचाच्या अडचणीकडे न पाहतां मला शिक्षण दिलें, त्याबद्दल मी काय केलें ? नानांचें ऋण अंशतः तरी फेडल्याशिवाय मी विवाह करणार नाहीं, अशी मी शपथ घेतली आहे. तेव्हां तुम्ही मला लग्नाच्या बाबतींत आग्रह करूं नका व माझ्या बोलण्याबद्दल मला क्षमा करा. "

" मग तूं किती दिवस अविवाहित राहणार ? अग, प्रपंचाच्या अडचणी केव्हांच संपणार नाहींत. "

" काका ! आज कुसुम मॅट्रिकच्या वर्गांत आहे. नारायणहि पांचवींत आहे. दोघेहि बुद्धिमान आहेत. कुसुम चार वर्षांनीं बी.ए. होईल व नारायणहि उच्च शिक्षण घेऊं लागेल. त्यावेळीं मी तुमच्याच विचारानें लग्न करीन, तुमचा शब्द मोडणार नाहीं; पण आज मात्र मला तुम्ही क्षमा करा. "

ताईचा निश्चय चार वर्षें ढळला नाहीं. योगायोग असा कीं, चार वर्षांनीं तिचें लग्न श्रीधरपंत गोखल्याशींच झालें. श्रीधरपंतां-

नींहि सुशिक्षित व सुस्वभावी मुलीशीं लग्न करण्याचा निश्चय केला होता व ह्या नाहीं त्या कारणामुळें त्यांनीं आजपर्यंत पुष्कळ मुलींना नकार दिला होता.

लग्नानंतर साताऱ्यांत लोक म्हणत, "किती समजूतदार जोडा!"

समंजस लोक म्हणत, " रत्नकाञ्चनयोग जमून आला.' असे केवळ गुणांकडे बघून विवाह होतील, तर सुखाला काय उणें ? "



## : ७ : शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

मित्रांनों, तुम्हांला कोणत्याहि प्रकारची कर्तबगारी दाखवावयाची असल्यास शरीराची काळजीपूर्वक जोपासना केली पाहिजे. शरीर सुस्थितींत नसल्यास तुमच्या हातून कांहींहि महत्त्वाचें काम पार पडणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर तुमच्या आयुष्याचे दिवस फार कंटाळवाणे होतील. म्हणूनच आपले ऋषी बहुतेक सर्व शास्त्रांच्या आरंभीं शरीर सुस्थितींत कसें राहील याचा विचार करीत असत. 'धर्मार्थकाममोक्षाणां शरीरं साधनं यतः' म्हणजे 'ज्याअर्थीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चारी पुरुषार्थांचें शरीर हें साधन आहे,' असा उपक्रम करून आरोग्याचे नियम सांगण्याची त्यांची पद्धति असे. तुम्हांला ऐहिक वैभव मिळवावयाचें असो, किंवा पारमार्थिक सुखाची प्राप्ति करून घ्यावयाची असो, दोन्हीहि गोष्टींना शरीरस्वास्थ्याची अत्यंत जरूरी आहे. हेंच लक्षांत घेऊन शंकर पति लाभावे म्हणून तपश्चर्या करावयास निघालेल्या पार्वतीला तिची आई मेनका हिनें, 'बाळे, शरीर सुस्थितींत ठेवणें हें धर्मार्जनाचें मुख्य साधन आहे,' असा उपदेश केला आहे.

ज्याचें शरीर स्वस्थ नाहीं त्याच्या हातून महत्त्वाची कामगिरी होत नाहीं, इतकेंच नव्हे तर तो दुसऱ्यांना भारभूत होऊन बसतो. त्याची शुश्रूषा करण्यांत आणि त्याची काळजी वाहण्यांत त्याचे आईबाप किंवा इतर प्रेमाचीं माणसें ह्यांना बराच वेळ व पैसा खर्चीं घालावा लागतो. तेव्हां आपला भार दुसऱ्यांवर न पडावा म्हणून

व आपल्या हातून कांहीं तरी स्वार्थ व परमार्थ घडावा म्हणून शरीर निरोगी राखण्याकरितां प्रत्येकानें झटलें पाहिजे.

शरीर पूर्ण निरोगी असणें हें सुखाचें मोठें साधन आहे. याची यथार्थ कल्पना सदासर्वदा आजारी असणारांना येणार नाहीं. त्याचप्रमाणें निरोगी माणसें आजारी पडल्याशिवाय त्यांनाहि येणार नाहीं. ज्याप्रमाणें दृष्टीची किंमत डोळे आल्यावर कळते, आधीं कळत नाहीं.

आरोग्याचें मुख्य चिन्ह उत्साह व आनंद हें होय. निरोगी पुरुष काम करतांना आनंदांत असतो; त्यामुळें संकटांना तो फारसा जुमानीत नाहीं, आणि संकटांना निर्भयपणें तोंड दिलें म्हणजे तीं मुर्दाड शिपायाप्रमाणें हळूहळू पळ काढतात. ह्याच्या उलट आरोग्य बिघडलें म्हणजे माणसाला कांहीं करूं नये असें वाटूं लागतें. तो ऐदी बनतो व नेहमीं खिन्न असतो. अशा पुरुषापुढें संकटें उभीं राहिलीं कीं तो गर्भगळित होऊन जातो त्याला कांहींएक सुचेनासें होऊन संकटांच्या माऱ्यापेक्षां भीतीनेंच तो अर्धमेला होतो.

लहान मुलांत मोठ्या माणसापेक्षां आरोग्य जास्त प्रमाणांत आढळून येतें. त्यांचा जीवनक्रम पहा! तीं कधींहि स्वस्थ बसत नाहींत. त्यांना भूक लागल्याशिवाय किंवा शारीरिक अपाय झाल्याशिवाय तीं खिन्न होत नाहींत. मूल रडूं लागलें कीं, भूक किंवा शारीरिक इजा ह्यांपैकीं कांहीं कारण आहे कीं काय याचा प्रथम आईबाप शोध करितात. आतां हें खरें कीं, अलीकडच्या ह्या दुर्दैवी काळांत कांहीं मुलें जन्मतःच रोगी निपजतात. अशा मुलांची नेहमीं कांहींना कांहीं चिरचिर चालू असते. निरोगी मूल स्वतः आनंदी असून इतरांना त्याच्याकडे पाहून आनंद होतो.

चरचरीत भूक लागणें, वेळेवर स्वस्थ झोंप येणें व आनंदी व उल्हसित वृत्ति असणें हीं आरोग्याचीं प्रमुख लक्षणें होत. हीं लक्षणें ज्या प्रमाणांत आढळून येतील त्या प्रमाणांत आरोग्याचें मान कमीजास्त आहे असें समजावें. अलीकडे पुष्कळशीं माणसें हातपाय गाळणारीं व विषण्णवृत्तीचीं आढळून येतात. ह्याचें कारण मुख्यतः त्यांचें आरोग्य बिघडलेलें असतें हें होय. पूर्वींच्या काळीं साठ-पांसष्ट वर्षांच्या वयाला जो उत्साह व जी धमक आढळून येत असे ती हल्लीं पंचवीस तीस वर्षांच्या तरुणांत आढळून येत नाहीं. फिकट चेहेरा, खोल गेलेले डोळे, बगळ्यासारखी उंच मान, हातापायांच्या काड्या हा देखावा विशेषेंकरून शहरांत नेहमीं दृष्टीस पडतो.

कोणत्याहि देशाची उन्नति होण्यास त्यांतील तरुण पिढी शरीरानें व मनानें जोरदार, उद्योगप्रिय व स्वदेशावर उत्कट प्रेम करणारी निघाली पाहिजे. शरीर व मन ह्यांचें स्वास्थ्य एकमेकांवर अवलंबून असतें म्हणजे शरीर स्वस्थ असल्यास मन जोरदार राहूं शकतें व मन जोरदार असल्यास शरीरहि जोरदार होऊं शकतें. शांत व प्रेमळ वृत्तीचीं मनुष्येंसुद्धां रोगांनीं गांजल्यावर चिडखोर बनतात व ह्याच्या उलट अशक्त मनुष्यें मेहनत करून सशक्त झाल्यावर त्यांची सहनशक्ति वाढून तीं अधिक धिमीं बनतात. हें बऱ्याच जणांच्या लक्षांत आलेंच असेल.

आपला देश एकेकाळीं सर्व सुधारलेल्या देशांच्या अग्रस्थानीं होता. तो आज कोणत्याहि सुधारलेल्या देशापेक्षां कमी दर्जाचा झाला आहे. त्याचा पूर्वींचा मान त्यास पुनः मिळवून देणें हें तरुण पिढीच्या हातीं आहे. मात्र हें कार्य शरीर व मन जोरदार झाल्याशिवाय होऊं शकणार नाहीं म्हणून ह्या निबंधांत शारीरिक अव-

नतीचीं कारणें व तीं नाहींशीं करण्याचे उपाय ह्यांचा आपण विचार करूं.

शारीरस्वास्थ्य हें योग्य आहार, व्यायाम व पवित्रता (ब्रह्मचर्य) ह्यांवर अवलंबून असतें. आहाराविषयीं विचार करूं लागल्यास ह्या देशांत लाखो लोकांना जाडेंभरडें अन्नसुद्धां खावयास मिळत नाहीं हें पाहून अतिशय वाईट वाटतें. देशांतील दारिद्य नाहींसें करण्याचे प्रयत्न जोरानें झाल्याशिवाय सर्वसामान्य आरोग्य नीटसें सुधारणार नाहीं असें निश्चितपणें सांगतां येईल. दारिद्यामुळें उपासमार, उपासमारीनें अशक्तता व अशक्ततेमुळें नानाप्रकारचे रोग उत्पन्न होऊन आपल्या देशाचें अपरिमित नुकसान होत आहे. पाश्चात्य सुधारणेबरोबर आलेली छानछोकी व व्यसनें हीं ह्या दारिद्याला त्याच्या विनाशक कार्यांत आणखी मदत करीत आहेत. म्हणून दारिद्य नाहींसें करण्याचा जसा प्रयत्न केला पाहिजे, त्याचप्रमाणें साध्या व शुद्ध राहणीचा अवलंब करून छानछोकी व व्यसनें ह्यांना हद्दपार केलें पाहिजे. दारू, अफू व तंबाखू हीं व्यसनें शरीराची व पैशाची अतिशय नासाडी करीत आहेत. चहा जरी तितका अपायकारक नसला तरी त्याचेंहि प्रस्थ बेरेंच वाढत चाललें आहे. तरुणपिढी त्याला आपल्या घरांत वाव न देईल तर फार बेरें!

आहार साधा व पुष्टिकारक असावा. शाकाहारास दूधदुभत्याची चांगली जोड पाहिजे, तरच शरीर जोरदार होऊं शकेल; परंतु अलीकडे ह्या बाबतींत फारच उपेक्षा होत आहे. हल्लीं गरीब लोकांना अन्नशुद्धीपुरतें तूप व पातळसें ताकहि मिळण्याची पंचाईत पडूं लागली आहे. ह्या शरीरयंत्राला दूधदुभत्याचें वंगण न मिळाल्यास त्याचे भाग लवकर झिजून तें यंत्रच निकामी होतें. म्हणून

शाकाहारी लोकांनीं या बाबतींत विशेष लक्ष घालून दुभत्या जनावरांची वाढ केली पाहिजे. कारण त्यांचें आरोग्य विशेषेंकरून दूधदुभत्यावर अवलंबून आहे. दूधदुभत्याची जोड असली म्हणजे शाकाहार शरीर व बुद्धि यांची वाढ करण्यास चांगलीच मदत करतो. अलीकडे पाश्चात्य देशांतही कांहीं विचारी लोकांनीं बुद्धीची वाढ होण्यास मांसाहारापेक्षां शाकाहारच जास्त श्रेयस्कर आहे असें ठरविलें आहे.

गरीब लोकांस पोटभर खाण्यास न मिळाल्यामुळें त्यांचें आरोग्य बिघडतें तर सुखवस्तु लोकांना पोटभर अन्न मिळूनहि व्यायाम न केल्यामुळें त्यांचें आरोग्य नीट रहात नाहीं. पंचवीस तीस वर्षांपूर्वीं माणसांना शारीरिक कष्ट करण्याची लाज वाटत नसे. बाजारांतून चार पांच पायली धान्य घरीं नेण्यास त्यांना कधीं हमाल लागत नसे. थंड पाण्यानें स्नान करून आपले कपडे आपण धुवून टाकण्याची त्या वेळच्या पुरुषांना नित्याची संवय असे. दहा वीस मैल चालून जाण्यास त्यावेळीं फारशी कोणास वाहनाची जरूर भासत नसे. अगदीं श्रीमंत वर्ग सोडून घरांतील दळणकांडणासहित सर्व कामें बायका स्वतः करीत. हल्लींच्याइतकी शहरांत पूर्वीं गर्दी नसल्यानें तेथें मोकळी हवा भरपूर मिळत असे. व मोकळ्या हवेंत शारीरिक कष्ट केल्यामुळें त्यावेळचीं माणसें हल्लीपेक्षां बरींच सुदृढ आढळून येत. हल्लींच्या पुरुषांना बाजारांतून पांच दहा शेर धान्य आणण्यास हमाल लागतो. दोन तीन मैलांचा प्रवास करावयाचा झाल्यास गाडीशिवाय भागत नाहीं. थंड पाण्याचें स्नान व स्वतःचे कपडे धुणें हें कमी दर्जाचें वाटतें. शारीरिक कष्ट करण्याची वेळ आल्यास त्यांचा नोकझोंक बिघडतो. बायकांना गिरण्या झाल्या-

मुळें दळणकांडणाची आवश्यकता राहिली नाहीं, व धुणीं, भांडीं मोलानें देण्याची सरसहा पद्धतच पडून गेल्यासारखी झाली आहे. तात्पर्य, जुना साधेपणा व कष्ट करण्याची संवय गेली, व युरोपियन लोकांचें अनिष्ट अनुकरण सुरू झालें. मात्र त्या लोकांच्या एकदशांशहि मिळकत नसल्यामुळें, इसापनीतींतील वाघाचें कातडें पांघरलेल्या कोल्ह्यासारखी आपली शोचनीय दशा झाली आहे. ही स्थिति नाहींशी होण्यास आपला पूर्वींचा साधेपणा कायम ठेवून शरीरकष्ट करण्यास आपण नेहमीं तयार झालें पाहिजे.

व्यवहारांतील कामें स्वतः करणें हा एक व्यायामाचा प्रकार झाला. हीं कामें ज्यांना फारशीं करावीं लागत नाहींत त्यांनीं खेळांचे देशी व विदेशी अनेक प्रकार आहेत त्यांतील एकाद्या प्रकारचा व्यायाम घ्यावा. कोणीकडून तरी शारीरिक मेहनत भरपूर झाल्याशिवाय खाल्लेलें अन्न अंगीं लागणार नाहीं हें लक्षांत बाळगावें. पूर्वीं धार्मिक भावनेनें उपासनेच्या निमित्तानें सूर्याला नमस्कार घालण्याची चाल होती. नमस्कारामुळें शरीर निरोगी राहून शिवाय धार्मिक भावनेमुळें मनहि शुद्ध रहाण्यास मदत होत असे. ही चाल प्रत्येक हिंदूनें अमलांत आणण्याचा प्रयत्न केल्यास फार हित होणार आहे. नमस्कारासारखा बिनखर्ची, साधा, शरीरास ताण न पडतां त्याची हळुहळू खात्रीनें वाढ करणारा दुसरा व्यायाम नाहीं असें बऱ्याच तज्ज्ञांचें मत आहे. मित्रांनो, कोणताहि व्यायाम घ्या. तुम्हांला आवडेल व ज्याचीं साधनें अनुकूल असतील तो व्यायाम घ्या. पण व्यायाम घेतल्याशिवाय एकहि दिवस जाऊं देऊं नका. नियमित आहार व व्यायाम हीं शरीरस्वास्थ्याचीं प्रमुख साधनें आहेत. अतिरेक होऊं न देतां नियमित व्यायाम केल्यास शरीर चपळ, भरीव व पिळदार

होऊन भुकेची तक्रार कधींहि रहात नाहीं. झोंप स्वस्थ लागते व कोणतेंहि काम करण्यास हुरूप वाटतो. नियमित व्यायाम करणारे लोक जास्त दिवस जगून जास्त काम करतात. असा अनुभव आहे. कै० डॉ० सर रा. गो. भांडारकर हे नियमित फिरण्याचा व्यायाम घेत असत. वयाच्या ८० व्या वर्षांपर्यंत त्यांचा व्यवसाय चालू होता. प्रो. कर्व्यांची शरीरयष्टि कृश असूनसुद्धां केवळ फिरण्याचा व्यायाम नियमित घेतल्यानें आज ऐशींच्या जवळ वय असतां काम करण्याच्या उत्साहांत ते पुष्कळ तरुणांना खालीं मान घालण्यास लावतात. पांच दहा मैलपर्यंत प्रवास ते अजून पायींच करतात. सकाळ संध्याकाळ मिळून ७–८ मैल फिरल्याशिवाय त्यांचा एकहि दिवस जात नाहीं. ह्या फिरण्याच्या नियमित व्यायामामुळें आपल्याला फार फायदा झाला व फिरण्यांत २–३ तास खर्च केल्यामुळें आपणास बाकीच्या वेळाचा चांगला उपयोग करतां येतो असें त्यांनीं प्रस्तुत लेखकास कित्येक वेळां तरी सांगितलें आहे. कै. लो. टिळक यांनीं कॉलेजांत असतांना व्यायामानें जें सामर्थ्य संपादन केलें तें त्यांना सर्व आयुष्यभर पुरलें. आपला अनुभव ते नेहेमीं तरुणांना सांगून व्यायाम करा म्हणून कळकळीचा उपदेश करीत असत.

व्यायामाच्या प्रकारामध्यें शरीर सुस्थितींत राहून बुद्धीची वाढ होण्यास मदत करणारा असा नमस्कार हा एक व्यायाम सांगण्यांत आलाच आहे. दुसरा योगांतील आसनें व प्राणायाम हा होय. ह्या विषयाकडे अद्यापि तरुण पिढीचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. ह्या विषयाचा श्री. जगन्नाथ गणेश गुणे (स्वामी कुवलयानंद) ह्यांनीं चांगला अभ्यास केला आहे. त्यांच्या ज्ञानाचा फायदा तरुण मंडळींनीं घेऊन

व्यायामाची आपली एक शास्त्रीय पद्धति आपल्या अज्ञानानें मागें पडली आहे तिला चालन देण्याचें श्रेय घ्यावें.

स्वास्थ्य-रक्षणाचें शेवटचें व महत्त्वाचें साधन पवित्रता होय. ही पवित्रता दोन प्रकारची, बाह्य व आंतर अथवा शारीरिक व मानसिक अशी होय. बाह्य पवित्रतेमध्यें शरीराची स्वच्छता म्हणजे दररोज नियमानें स्नान करणें, वेळेवर दांत व तोंड धुणें, स्वच्छ कपडे वापरणें, आपलें घर व भोंवतालचा भाग स्वच्छ राखणें, इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. सर्व रोग घाणीपासून उत्पन्न होतात. शरीर जसें बाहेरून स्वच्छ राखलें पाहिजे, तसेंच आंतूनहि स्वच्छ ठेविलें पाहिजे. साधा व निर्मळ आहार, स्वच्छ पाणी व व्यायाम यांनीं तें आपोआपच स्वच्छ रहातें, इतकें करून स्वच्छ न राहिल्यास; वैद्याची मदत घेणें आवश्यक आहे.

परमेश्वरानें आपणास ज्या अनेक देणग्या दिल्या आहेत त्यांत आरोग्य ही अमूल्य देणगी आहे. हिचें आपण फार काळजीपूर्वक रक्षण केलें पाहिजे. ही जर आपण गमावली तर सर्व आयुष्य आपणांस दुःखांत काढावें लागेल. मग आपणांजवळ कितीहि पैसा, मान व सगेसोयरे असले तरी त्यांचा काडीइतका उपयोग होणार नाहीं. एका पारड्यांत आरोग्य व दुसऱ्या पारड्यांत इतर सर्व ऐहिक ऐश्वर्य घातलें आणि त्यांची तुलना केली तर आरोग्याचें पारडें खास खालीं बसेल. हें आरोग्य ज्या गोष्टींवर मुख्यत्वें अवलंबून असतें त्यांपैकीं दोन गोष्टींचा, आहार व व्यायाम यांचा, आपण विचार केला. तिसरी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानसिक पवित्रता अथवा ब्रह्मचर्य होय. तिचा विचार पुढील निबंधांत करूं.

## : ८ : ब्रह्मचर्य

मुलांनो, शरीराचें स्वास्थ्य मनःस्वास्थ्यावर अवलंबून असतें असें मागील निबंधांत सांगितलें.

आतां मनःस्वास्थ्याकरितां काय केलें पाहिजे तें पाहूं या. इंद्रियांच्या अधीन न होणें; त्यांना आपल्या कह्यांत ठेवणें हा तो उपाय होय. ह्यालाच ब्रह्मचर्य म्हणतात.

इंद्रियांची स्वाभाविक प्रवृत्ति कशी असते पहा. साधें अन्न आरोग्यकारक असतें, पण जिभेला आरोग्यनाशक चिवडा, भजीं अधिक आवडतात. व तीं वारंवार खाल्लीं म्हणजे मनुष्य आजारी पडतो; हें समजूनसुद्धां मनुष्याची ते पदार्थ खाण्याकडे जास्त प्रवृत्ति असते. विचारानें ही दुष्ट प्रवृत्ति दाबून टाकून हितकर अन्न असेल तें खाणें म्हणजेच जिभेवर ताबा ठेवणें होय.

दारू, अफू, तंबाखू वगैरे मादक व शरीरहानिकारक पदार्थांचें सेवन करणें म्हणजे इंद्रियांचे गुलाम होणें आहे.

वारंवार नाटकें—सिनेमा पाहाणें, जरूरीपेक्षां जास्त झोंपा काढणें, शिवीगाळ करणें, दुसऱ्याचा हेवादावा करणें, चोरी करणें, आळसांत वेळ घालविणें हे सर्व इंद्रियांच्या गुलामगिरीचे प्रकार आहेत.

हे सर्व निश्चयानें सोडून देऊन, उच्च विचार बाळगणें, दुसऱ्याबद्दल सहानुभूति ठेवणें, सत्कार्यांत वेळ घालविणें म्हणजेच ब्रह्मचर्य होय.

प्रत्येक विद्यार्थी ब्रह्मचारी असला पाहिजे. ब्रह्मचाऱ्यानें कसें वागावें ह्याविषयीं मनुस्मृतींत फार हितकर नियम सांगितले आहेत. त्यांचा भावार्थ असाः—

वडील माणसांबद्दल नेहमीं आदर बाळगावा. आईबाप व गुरु ह्यांच्यांशीं नम्रतेनें वागावें. त्यांचे आपल्यावर इतके उपकार असतात कीं, त्यांची कधींहि फेड होऊं शकणार नाहीं. त्यांच्यांबद्दल कोणी अनादरानें बोलूं लागल्यास तें ऐकूनसुद्धां घेऊं नये. आपले भाऊ व बहिणी यांच्यांशीं प्रेमानें वागावें. वडील माणसांचा मान राखला असतां आयुष्य, विद्या, कीर्ति व बल हीं वाढतात.

कुशल सारथी लगामानें घोड्यांना जसें ताब्यांत ठेवितो, त्याप्रमाणें आपलीं स्वार्थी इंद्रियें विचारानें आपल्या अंकित ठेवावींत.

विषयोपभोगानें इंद्रियांची कधींहि तृप्ति होत नाहीं. अग्नींत हवनद्रव्य टाकिलें असतां तो अधिकच भडकतो.* इंद्रियांचे लाड न करतां त्यांचें नियमन करावें. एक इंद्रिय जरी बेताल झालें तरी माणसाची बुद्धि भ्रंश पावते. पखालीला खालीं एकादें भोंक पडलें तरी सर्व पाणी गळून जातें.

माणसाची किंमत त्याच्या वयावर नसते, त्याच्या विद्येवर असते. विद्यासंपन्न मनुष्य वयानें लहान असला तरी तो श्रेष्ठ होय. उलट वयानें मोठा, पण विद्या नसेल तर तो मनुष्य बालासारखा होय.§

जो आपलें मन व वाणी शुद्ध ठेवितो, त्यांची योग्य ती काळजी घेतो, तो विद्यार्थी सद्गतीला जातो. आपल्याला पीडा झाली तरी

---

* न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति । हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।

§ ' It is not growing like a tree.
In bulk doth make Man better be. '—Ben Jonson.

दुसऱ्याचा द्रोह करूं नये. दुसऱ्याला दुःख होईल असें भाषण कधींही करूं नये.

स्त्रियांचे बाबतींत फार जपून असावें, त्यांच्यांशीं एकान्तांत भाषण करूं नये. त्यांच्याकडे कधींही वांकड्या नजरेनें पाहूं नये. त्यांची चेष्टा करूं नये. त्यांना आपल्या आई–बहिणीप्रमाणें समजावें. *

विद्यार्थ्यानें कोणताही विलास करूं नये. राहणी अगदीं साधी ठेवावी. शीतोष्ण–निवारणापुरतेंच साधें वस्त्र वापरावें व शरीर-रक्षणाला योग्य असें साधें अन्न भक्षण करावें.


थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास विद्यार्थ्यानें **आहारविहार** ह्यांचे बाबतींत संयमानें राहून मन शांत राखावें म्हणजे विद्येकडे लक्ष लागून तिची प्राप्ति करून घेणें सुलभ होतें.

---

* ‘ एकांती लोकांती स्त्रियांशी भाषण । प्राण गेल्या जाण बोलो नये ॥ ’

—श्री तुकाराम.

‘ मातृवत्परदारेषु यः पश्यति स पश्यति ॥ ’ ( सं. श्लोक. )



## : १ : सृष्टिसौंदय

जीवमात्राची नेहमीं सुखाकरतां धडपड चालू असते. आपण निरनिराळ्या उपायांनीं सुख [illegible] प्रयत्न करीत असतों. नेत्रांना सुंदर वस्तु, कानांना मधुर ध्वनि, जिव्हेला गोड रस, नाकाला सुवासिक द्रव्यें व त्वचेला मऊ पदार्थ लाभले असतां सुख होतें. सुखाचीं साधनें सर्वांना सारखींच मिळत नाहींत. श्रीमंत माणसांना केवळ पैशामुळें जीं सुखें लाभतात तीं गरिबांना मोठ्या प्रयासानेंहि प्राप्त होत नाहींत. तथापि दयाळु परमेश्वरानें अशीं कांहीं सुखें निर्माण केलीं आहेत कीं, तीं श्रीमंत व गरीब ह्या उभयतांनाहि प्राप्त करून घेतां येतात. ह्या सुखांपैकीं सृष्ट्यवलोकनापासून प्राप्त होणारें सुख विशेष आहे.

आपली ही भरतभूमि म्हणजे सृष्टिसौंदर्याची केवळ खाणच आहे; असें असतां सृष्ट्यवलोकनापासून प्राप्त होणाऱ्या निष्पाप सुखाचा आस्वाद घेउन तल्लीन होणारे लोक आपणांत फारच थोडे आढळतात. बापानें अलोट सुखसाधनें जमवावीत व मुलाला त्यांचा उपयोग कसा करावा इतकेंहि कळूं नये अशासारखी ही शोचनीय स्थिति आहे.

विद्यार्थीमित्रहो, मी म्हणतों ह्याचा अनुभव पहा. तुम्हीं जेथें रहात असाल त्या गांवाच्या किंवा शहराच्या बाहेर जा, आणि लगेच तुमच्या वृत्तींत फरक पडतो कीं नाहीं तें पहा. बाहेरची मोकळी हवा व

उत्साह देतील. आणि ह्यांत जर सृष्टिसौंदर्याची भर पडली तर किती मौज होईल बरें? गाईचें वांसरूं गोठ्याच्या बाहेर मोकळ्या जागेंत काढल्याबरोबर आनंदानें उड्या मारूं लागतें; त्याला इतका आनंद होतो कीं तें त्या भरांत सैरावैरा धावूं लागतें व त्याला इजा पोंचूं नये म्हणून आपण आंवरून धरितों. आपणांत जर रसिकतेचा अभाव नसेल तर आपली सुद्धां कांहीं अंशीं अशीच स्थिति होईल. लहान मुलें समुद्रकिनाऱ्यावर गेलीं म्हणजे अशींच नाचूं लागतात हें कित्येकांनीं पाहिलेंच असेल.

वर्षाऋतु संपत येण्याचे सुमारास सकाळचे प्रहरीं एकाद्या टेकडीवर जाऊन उभे रहा आणि काय मौज दिसते ती पहा. जिकडे तिकडे हिरवेंगार गवत उगवलेलें असतें. झाडेंझुडपें अगदीं टवटवीत दिसत असतात; स्वच्छ व मधुर पाणी ठिकठिकाणीं वहात असतें, आणि त्यावर सूर्याचा प्रकाश पडून त्याला रजतरसाची शोभा येते. अशा रीतीनें नेत्रांनीं सुखास्वाद घेऊन मनाचें समाधान होतें तोंच सभोंवतालच्या झाडांवरून पक्ष्यांचें मधुर गान चाललेलें असतें तिकडे आपलें लक्ष जातें. ह्या गाण्यांत इतकी विविधता असते कीं, तितकी विविधता मोठ्या प्रयासानेंसुद्धां आपणांस निर्माण करितां येईल कीं नाहीं याची मला शंका वाटते.

पक्ष्यांचें गाणें चालू असतांना मधूनच उत्कृष्ट प्रकारचा सुगंध बरोबर घेऊन वायु वाहूं लागतो. आपणांस हा कोणत्या फुलांचा सुगंध आहे व तो कोठून आला हें जाणण्याची इच्छा होऊन आपण इकडे तिकडे शोध करूं लागतों. तो कोठून आला ह्याचा पत्ता तर सहसा लागत नाहींच, परंतु आपण त्याचा तपास करीत असतां दुसरा एकादा सुगंध येऊन आपण पहिल्याचा तपास

करण्याचें सोडून देतों; असें कांहीं वेळां झाल्यावर आपण कारणांचा तपास करण्याचें सोडून देऊन कार्याच्या मौजेंतच रंगून जातों.

मित्रांनो, सृष्टिसौंदर्यामध्यें इतकी विविधता असते कीं, निरनिराळ्या देखाव्यांत तर भिन्नता असतेच, परंतु एकच देखावा निरनिराळ्या वेळीं पाहिला तर भिन्न दिसतो. वर वर्णन केलेला तोच देखावा तुम्ही संध्याकाळीं पहा. तुम्हांला निराळाच चमत्कार दिसेल. त्यावेळीं पाणी, वनस्पती वगैरे सर्व वस्तूंवर तांबुस रंगाची छटा दिसेल. पश्चिम क्षितिजाकडे नजर फेंका आणि तेथें कशा प्रकारचें इन्द्रजाल पसरलें आहे तें पहा! तेथें सृष्टिदेवता सुवर्णाच्या व रजताच्या रंगांनीं मेघफलकांवर अनेक प्रकारच्या आकृती काढून आपणांतील कुशल चित्रकारांस जणूं काय चित्रकलेचे धडे देत आहे असें दिसेल. आपल्या प्रिय पत्नीचें हें कौशल्य पाहूनच कीं काय भगवान् सूर्य नारायण आरक्त झालेला आपल्या नजरेस पडेल! सकाळच्यापेक्षां शांतताहि जास्त प्रतीत होउन आपणांस असें वाटेल कीं, सृष्टिदेवता सर्व दिवसभर उद्योग करून भागल्यामुळें आतां विसांवा घेण्याच्या तयारीस लागली असावी व झोपीं जातां जातां, आपल्या लाडक्या मुलांना चित्रकलेचें ज्ञान व्हावें म्हणून प्रयत्न करीत असावी. हे देवि, ही तुझी हंसत खेळत शिकविण्याची पद्धति पाहून कुशल शिक्षकांना सुद्धां माना खालीं घालाव्या लागतील.

मित्रांनो, ही सृष्टिदेवी इतकी संपन्न व इतकी प्रेमळ आहे कीं आपल्याला सुख व्हावें, ज्ञान मिळावें म्हणून ती क्षणोक्षणीं निराळा देखावा दाखवीत असते. एका ऋतूंत तिचें जें स्वरूप आढळेल तें दुसऱ्या ऋतूंत आढळणार नाहीं! एका दिवशीं जें आढळेल तें दुसऱ्या दिवशींच्याहून निराळें असेल. फार काय, आपण तिच्या-

कडे पाहतों न पाहतों तोंच आपला डोळा चुकवून तीं निराळें रूप धारण करिते. क्षणोक्षणीं नवता धारण करणारी ही देवी म्हणजेच मूळ काव्य व आपण वाचतों तें काव्य ह्या काव्याची नक्कल असते.

ही देवता असंख्य रूपें धारण करिते म्हणून जें सांगितलें त्यांतलीं एक दोन रूपें आपण वर पाहिलींहि. आणखी एकाद-दुसरें तिचें रूप पाहूं या. आपण आतां तिचें वसंत ऋतूंत दर्शन घेऊं. या ऋतूंत झाडांचीं पूर्वींचीं सर्व पानें गळून जाऊन तांबुस रंगाचीं कोंवळीं कोंवळीं पानें सर्व झाडांवर दिसूं लागतात. अशा वेळीं या पानांकडे तुम्ही निरखून पहाल तर त्यांचा नाजुकपणा व सौंदर्य हीं तुम्हांला थक्क केल्यावांचून रहाणार नाहींत. पानांचा रंग तांबुस असतो म्हणून म्हटलें, परंतु तो निव्वळ तांबुस नसून लाल, तांबुस, हिरवी व निळसर अशी निरनिराळी छटा त्यावर असते. अर्थात् पर्णसृष्टि म्हणजे वर्णसृष्टिच असते.

बहुतेक झाडांवर मोहोरहि आलेला असून प्रत्येक झाडाच्या मोहोराचा रंग व गंध निराळा असतो. कित्येक झाडांवर फुलांना बहर आलेला असतो. पानें व फुलें यांचे अलंकार धारण करणारी ही सृष्टिदेवी आपल्या स्वरूपाचा गर्व वाहणाऱ्या कोणाहि व्यक्तीला लाजविल्याशिवाय रहाणार नाहीं. 'जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतें' ह्या कविकुलगुरूच्या वचनाचें यथार्थत्व आपणांस ह्या देवीकडे पाहतांच बरोबर पटतें.

अशावेळीं एकाद्या आमराईंत शिरा आणि कशी मौज होते पहा! त्या राईमध्यें विलक्षण सुगंध सुटलेला असून भ्रमर व कोकिल मधुर गाणें गात एका झाडावरून दुसऱ्या झाडावर घिरट्या घालीत असतात. आपलीहि तशीच स्थिति होते. घ्राणेंद्रियाचें कांहीं

केल्या समाधानच होत नाहीं. तिथेंच बसून रहावें असें वाटूं लागतें.

मुलांनो, सृष्टिदेवता ही प्रेमळ असते म्हणून सांगितलें, परंतु प्रेमळ आईसुद्धां आपल्या मुलांना शिस्त लागावी म्हणून कधींकधीं उग्रस्वरूप धारण करिते; त्याचप्रमाणें सृष्टिदेवताहि वर्षाकालीं भीषण स्वरूप धारण करिते. पावसाळा सुरूं होण्याच्यापूर्वी आकाश मेघांनीं व्याप्त होतें, गार वारा वाहूं लागतो व नंतर मेघांचा गडगडाट सुरू होतो. लहान मुलें घाबरून जातात व आपली आई किंवा वडील माणसें ह्यांना घट्ट धरून बसतात. गडगडाट थांबून प्रत्यक्ष पाउस पडूं लागला म्हणजे त्यांची भीति हळूहळू कमी होऊन तीं दारांत किंवा खिडकींत उभीं राहून पावसाची मजा पाहूं लागतात. पावसाचा जोर कमी झाला म्हणजे तर अंगणांत जाऊन आनंदानें नाचूं लागतात. व 'ये रे ये रे पावसा, तुला देईन पैसा' इत्यादि गाणीं गाऊं लागतात. पागोळ्या जोरानें पडूं लागल्या म्हणजे पडवींत किंवा सज्जांत (व्हरांड्यांत) उभें राहून हात पुढें करून तें पाणी घेऊन तहान नसतांनाहि पाणी पिण्याची त्यांना मोठी गम्मत वाटते. पावसाच्या माऱ्यानें पशु व पक्षी हत-बल होऊन आपापल्या गुहेंत व घरट्यांत दडून बसतात. वृक्ष व लता आपापलीं मस्तकें नमवून निमूटपणें धारांचा मार सहन करितात. कदाचित् सत्पुरुषांप्रमाणें हाल अपेष्टा सोसूनच आपला उत्कर्ष होणार असें त्यांस वाटत असेल!

कांहीं दिवस पाऊस पडल्यावर जिकडची तिकडची बरीचशी घाण धुवून जाते. उन्हाळ्याचा सर्व ताप शांत होतो. वृक्षांना नवी टवटवी येते, व कित्येक नवीन वनस्पति उगवतात. आपण नुसतें आपल्या घराच्या भोंवतालीं हिंडलों तरी आपणांस माहीत

नसलेलीं अशीं कितीतरी लहान लहान रोपें आपल्या नजरेस पड-तील. एखाद्या अरण्यांत किंवा डोंगरावर तर इतकीं नवीन झाडें दिसतात कीं, त्यांची ओळख करून घेण्यास आपणांस कित्येक वर्षें लागतील. कांहीं नवीन किडेहि पावसाळ्यांत उत्पन्न होतात. त्यांत मृगाच्या किड्यासारखे कांहीं फारच सुंदर असतात. कधीं कधीं पाउस पडून गेल्यावर थोडासा प्रकाश पडतो व इन्द्रधनुष्य दिसूं लागतें. इन्द्रधनुष्याचे रंग पाहून कोणाची वृत्ति प्रफुल्लित होत नाहीं ? पावसाळ्यामध्यें घरांत किंवा कचेरींत बसून काम करणारांस फारसा त्रास होत नाहीं. परंतु प्रवासी, टपालवाहक, व शेतांत काम करणारे गरीब शेतकरी ह्यांचे फार हाल होतात. परंतु रात्रीच्या काळोखानंतर जसा दिवसाचा उजेड येतोच त्याच-प्रमाणें पावसाळ्याच्या हालअपेष्टा संपून नितांत रमणीय असा शरद्ऋतु येतोच.

मित्रांनो, इतकें हें सौंदर्य सृष्टिदेवीनें आपणांकरितां वाढून ठेवलें असतां तिकडे डोळेझांक करून नाटकें, चलच्चित्रपट ( सिनेमा ) यांच्या साहाय्यानेंच आपण आपली सौंदर्यतृष्णा भागविण्याचा प्रयत्न करावा हें आपणांसारख्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांस शोभतें काय ? फक्त डोळे उघडा म्हणजे तुम्हांला प्रत्येक फुलांत, प्रत्येक पानांत, प्रत्येक गवताचे काडींत सौंदर्य ओतप्रोत भरलेलें आढळून येईल. मग वृक्षवल्ली, नद्या, समुद्र, पर्वत त्यांची गोष्टच कशाला? फाजील शृंगारिक नाटकें, चलच्चित्रपट ह्यांच्या नादानें आपल्या पैशाची शरीराची व नीतीची राखरांगोळी करून घेण्यापेक्षां फुकट लाभणाऱ्या सृष्टिसौंदर्याचा पोटभर आस्वाद घेऊन आपलें शरीर व मन तेजस्वी बनवाल तर त्यांत तुमचा फायदा नाहीं का ?

: १० :

# आरामरचना

आश्रमाच्या सभोंवतीं लाविलेल्या ‘ वृक्षकांना ’ तपस्व्यांच्या मुली पाणी घालीत असून गृहस्थाश्रमाला सुरवात होण्यापूर्वीच ‘ अपत्यस्नेहाचा ’ अनुभव घेत आहेत, ही कल्पना कविश्रेष्ठ कालिदासाच्या विशेष आवडीची असावी असें त्याच्या ग्रंथांतील वर्णनावरून वाटतें. खरेंच आहे. वृक्षसंवर्धनापासून जो आनंद प्राप्त होतो, तो बऱ्याच अंशीं बालकसंवर्धनापासून होणाऱ्या आनंदासारखा असतो. आपण लाविलेल्या झाडांना कोणीं दुखापत केली; त्यांचीं पानें किंवा फांद्या कोणीं तोडिल्या तर आपणांस वाईट वाटतें. त्यांना फुलें व फळें आलेलीं पाहून आपणांस धन्यता वाटते. त्या फुलांफळांपासून जें सुख होतें तें विकत घेतलेल्या चांगल्या व मोठ्या फुलांफळांपासूनहि होत नाहीं. मातेचें जसें प्रेम आपल्या मुलांवर त्याचप्रमाणें झाडें लावणाराचें प्रेम आपण लाविलेल्या झाडांवर असतें.

वृक्षाच्या शीतल छायेंत, फळांफुलांच्या सांनिध्यांत, खगगणांच्या मधुर गीतांचा आस्वाद घेण्यांत ज्यांचें बालपण गेलें असेल, त्यांना शहरांतल्या घाणेरड्या, धुरकट, धूलीमय व रूक्ष वातावरणांत आयुष्याचे दिवस काढणें झाल्यास फारच मोठें संकट वाटतें. व शहरांत पैशामुळें लाभणाऱ्या सुखाचा वीट येऊन आपल्या बागेंत किंवा शेतांत कष्ट करून निसर्गाच्या संगतींत लाभणाऱ्या आरोग्ययुक्त सुखाकडे मन धांव घेतें. मुंबई पुण्या-

सारख्या शहरांत दिवस काढणाऱ्या लोकांचा असा अनुभव आहे कीं, वर्षांतून एकादा महिना खेड्यांतील बागेंत जाऊन राहिल्यास, त्यांचें आरोग्य वाढून मनहि सुप्रसन्न होतें. दिवसाचे काबाडकष्ट संपल्यावर संध्याकाळीं तास अर्धा तास एकाद्या बागेंत काढल्यासहि शरीर व मन ह्यांना किती तरी प्रसन्नता वाटते.

बागेंत आनंद वास करितो; बागेंत सुख नांदतें; बागेंत सौंदर्य वसतें, बागेंत ( वाच्यार्थानें व व्यंग्यार्थानें ) जिकडे तिकडे शरीरास व मनास प्रफुल्लता देणारें जीवन आढळून येतें. म्हणून सुख व आरोग्य ज्यांना पाहिजे असेल, त्यांनीं शक्य असल्यास आपल्या घरांभोंवतीं स्वतः झाडें लावून बाग तयार करावा. मुलांकरितां पुष्कळ श्रम करूनहि मातेला जसा शीण वाटत नाहीं, त्याप्रमाणेंच बागेंत फळांफुलांच्या सांनिध्यांत केलेले श्रम आपणांस कळून येत नाहींत.

बागेंतलें सात्त्विक सुख श्रीमंत व गरीब ह्या उभयतांनाहि मिळवितां येण्यासारखें आहे. किंबहुना श्रीमंतांपेक्षां गरीबांनाच तें अधिक लाभण्याचा संभव आहे. ज्याच्या ज्याच्या घराभोंवतीं मोकळी जागा व पाणी असेल, त्याला त्याला ह्या स्वर्गीय सुखाचा आस्वाद घेतां येईल. आज आपल्या देशांत जर आपण हिंडलों, तर कितीतरी घरें अशीं आढळून येतील कीं, सभोंवतीं जागा व पाणी असूनहि शपथेला एक झाडहि मिळावयाचें नाहीं ! ह्याचें कारण आपणांत सौंदर्यप्रीति व शुद्ध सुखाचा आस्वाद घेण्याची अभिरुचि हीं बऱ्याच कमी प्रमाणांत आढळून येतात.

वृक्ष हे मुलांप्रमाणें सुखदायक असतात असें वर म्हटलें. परंतु एका दृष्टीनें ते मुलांपेक्षांहि जास्त आल्हाददायक असतात. कारण,

मुलांमध्यें कित्येक मुलें कृतघ्न निघण्याचा संभव असतो. पण वृक्षांत एकहि वृक्ष तसा निघत नाहीं! आपण त्यांना वाढविलें कीं, ते फळांफुलांच्या रूपानें आमरण आपली व आपल्या पुढल्या पिढीची पण सेवा करीत राहतात.


घराभोंवतीं उद्यानरचना करणें खर्चाचें नसून उलट फायदेशीर आहे. कित्येक घरांशेजारीं वापराचें पाणी मोकळें सोडलेलें असल्या-मुळें तें कुजेंत व रोग उत्पन्न करितें. हेंच पाणी जरा बाजूला काढून जर चार झाडें लाविलीं आणि घरांतील राख, शेण वगैरे पदार्थांचा खत म्हणून त्यांस उपयोग केला तर अमृतासारखीं गोड फळें आपणांस चाखावयास मिळणार नाहींत का ?

उद्यानरचना हा एक असा व्यवसाय आहे कीं त्यांत कुटुंबांतील सर्व माणसांना भाग घेतां येतो. अगदीं लहान मुलांपासून तों वृद्ध आजोबापर्यंत प्रत्येकाला [illegible] शक्तीप्रमाणें बागेंत कांहीं तरी काम करितां येतें. बागेमुळें रिकाम्या वेळेचा सदुपयोग होऊन शिवाय आरोग्य व आनंद ह्यांचा लाभ होतो. मुलांना कित्येक वनस्पतींची सहज माहिती होऊन त्यांच्या ज्ञानांत भर पडते व लहान-पणापासून शारीरिक श्रम करण्याची संवय होऊन आरोग्याची किल्ली त्यांच्या हातीं राहते.

वृक्षसंवर्धन हें उत्तम प्रकारचें शिक्षण आहे. त्यापासून शरीर निरोगी राहातें, मनांतील कोमल भाव व निरीक्षणशक्ति जागृत होतात. शाळेच्या सभोंवतीं मुलांकडून बाग तयार करवून घेत-ल्यास मुलांना ह्या तिन्ही गोष्टींचा लाभ होऊन शिवाय शाळेच्या मंदिराला अप्रतिम शोभा पण येईल.

या पृथ्वीवर बागा जितक्या वाढतील तितक्या प्रमाणानें येथील

आरोग्य व निष्पापवृत्ति वाढेल ! व त्या जितक्या कमी होतील तितक्या प्रमाणानें येथील भयाणता व दुःख दुणावेल ! भगवान् श्रीकृष्णाचें बालपण निसर्गांतल्या बागेंतच गेलें ! बायबलांतील कथेंत परमेश्वरानें मनुष्यजातीच्या मूळ मातापित्याला सर्व प्रकारचें सुख प्राप्त व्हावें म्हणून ' एडन् ' नांवाच्या रम्योद्यानांत ठेविलें होतें. परंतु त्यांच्यांत पापवृत्तीचा अंकुर उद्भवतांच त्यांना शिक्षा म्हणून तेथून घालवून दिलें, असें जें वर्णन आहे, त्यांत फार खोल अर्थ असावा, असें वाटतें. मनाला आराम पाहिजे असेल तर आपल्या घराभोंवतीं ' आराम ' निर्माण करणें हा एक आपल्या स्वाधीनचा उपाय आहे.



## : ११ : शीलपालन

शील म्हणजे सद्वर्तन. एकाद्या माणसाचें वर्तन निर्दोष असलें म्हणजे आपण तो मनुष्य शीलसंपन्न आहे असें म्हणतों. विवाहादि कायमचे संबंध जोडतांना शहाणीं माणसें कुलशील पहात असतात, म्हणजे ज्यांच्याशीं संबंध जोडावयाचा तीं माणसें सुवृत्त आहेत कीं नाहींत ह्याची चौकशी करीत असतात; व असें करणें हें फार शहाणपणाचें आहे. कारण एकाद्या माणसावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचें सुख त्याच्या वर्तनावर अवलंबून रहातें.

विद्यार्थ्यांचें शील बनविणें हा सुशिक्षणाचा मुख्य हेतु असला पाहिजे. अलीकडच्या शिक्षपद्धतींत ह्या महत्वाच्या गोष्टीकडे फारच दुर्लक्ष केलें जातें. एकाद्या विद्यार्थ्यानें परीक्षेंत चांगले गुण मिळविले म्हणजे त्याची सर्वत्र वाहवा होते. त्याचें वर्तन कशा प्रकारचें आहे ह्याची कोणी चौकशीहि करीत नाहीं. ह्याच्या उलट एकादा विद्यार्थी कितीहि नेकीनें वागणारा, प्रेमळ व कष्टाळु असला आणि बुद्धिमांद्यामुळें, दारिद्र्यामुळें किंवा भराभर अभ्यासक्रम संपवावा लागल्यामुळें जर त्याला परीक्षेंत गुण कमी मिळाले तर त्याच्याकडे सहानुभूतीनें पाहून त्याच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न क्वचितच केला जातो.

एकाद्या कुलाचा किंवा देशाचा उत्कर्ष त्यांतील माणसांच्या वर्तनावर अवलंबून रहातो. मूठभर इंग्रजलोक हिंदुस्थानासारख्या

प्रचंड देशावर आज १००।१५० वर्षे राज्य करीत आहेत, ह्याचें कारण त्यांच्या व आमच्या वर्तनांतील भेद हें मुख्य होय. ते एकजुटीनें रहातात, साहसी आहेत व राष्ट्रीय हिताचा प्रश्न उपस्थित झाल्यास वैयक्तिक स्वार्थ झुगारून देतात. आमच्यामध्यें ह्या गुणांचा जवळजवळ अभाव असल्यामुळें सामुदायिक दृष्ट्या आम्ही फारच कमकुवत ठरतों.

आपला देश एके काळीं सर्व सुधारलेल्या देशांच्या अग्रस्थानीं होता. तोच आतां सर्व सुधारलेल्या देशांत अगदीं खालच्या प्रतीचा ठरला आहे. त्यास त्याचें पूर्वीचें वैभव प्राप्त करून देणें हें त्यांतील व्यक्तींच्या सद्वर्तनावर अवलंबून आहे. सत्यनिष्ठा, बाणेदारपणा, बंधुभाव व राष्ट्रभक्ति या गुणांची तरुण पिढींत वाढ झाल्याशिवाय मोठमोठ्या पदव्या मिळवून व बक्षिसें पटकावूनहि देशाची प्रगति काडीमात्र होणार नाहीं. विद्वत्तेला शीलाची जोड असल्यावांचून राष्ट्रसंवर्धनाला तिचा कांहींएक उपयोग होत नाहीं. उलट ती राष्ट्राचें नुकसान करण्यास मात्र कारणीभूत होईल.

शील बनविण्यास लागणाऱ्या गुणांपैकीं सत्यनिष्ठा हा गुण मुख्य होय. सत्याकरितां कांहींहि नुकसान सोसावें लागलें तरी बेहत्तर, पण सत्य सोडावयाचें नाहीं अशा बाण्याचे लोक फारच थोडे आढळतात. सत्यावांचून खरा मोठेपणा नाहीं. वाशिंग्टनप्रमाणें आपल्या हातून झालेली चूक कबूल करणारीं किती मुलें आढळतील? आपल्या हातून चुका झाल्यास आपण होऊन कबूल करणारीं मुलें शाळांतून फारच क्वचित् आढळून येतात व असा एकादा मुलगा आढळून आल्यास त्याला शिक्षा न करितां त्याच्यावर प्रेम करणारे शिक्षकहि फारच दुर्मिळ !

मनुष्याला शोभा आणणारा दुसरा गुण म्हटला म्हणजे बाणेदारपणा हा होय. सत्यनिष्ठेवांचून हा गुण उत्पन्न होऊं शकत नाहीं. चतकोर भाकरीकरितां वरिष्ठांची हांजी हांजी करणें, त्यांची मर्जी फिरेल त्याप्रमाणें आपलें वर्तन बदलणें, आणि स्वदेश व स्वजन यांच्यांशीं बेइमान होणें, ही नीचपणाची परमावधि होय. पण दुर्दैवानें ह्या कोटींतलीं बरींच माणसें आपल्या समाजांत उघडपणें वावरूं शकतात. ह्या गोष्टीवरून आपल्या समाजांत बाणेदारपणाचा कसा लोप होत चालला आहे ह्याची कल्पना येईल.

शीलसंपन्न माणसें एकमेकांशीं बंधुभावानें वागतात. आपल्या हातून होईल तितकें दुसऱ्याचें बरें करावें म्हणून त्यांचा प्रयत्न चालू असतो. आज आपल्या समाजांत आपण व आपलें कुटुंब इतक्याच पुरतें पाहणारीं माणसें फार आढळून येतात. खेडेगांवांत पूर्वीं जी जूट व एकमेकांच्या उपयोगीं पडण्याची प्रवृत्ति आढळून येत असे ती हल्लीं नाहींशी होत चालली आहे. शहरांमध्यें तर कधीं कधीं एका खोलींत मर्तिक झाल्यास शेजारच्या खोलींतील माणसें कोणत्याहि प्रकारची मदत करीत नाहींत. एकंदरींत आपल्या समाजांत बंधुभाव नाहींसा होत चालला असून बेपर्वाई वाढत चालली आहे. शिक्षणानें बंधुभाव उत्पन्न न झाल्यास शिक्षित आणि अशिक्षित यांत फरक तो काय राहिला ?

शील या शब्दानें सर्व सद्‌गुणांचा बोध होतो. सद्‌गुणी माणसालाच शीलसंपन्न म्हणतात. सद्गुणांची वाढ करणें हेंच खरें शिक्षण होय. रामलक्ष्मणांसारखे बंधु, भीष्मासारखे सत्यप्रतिज्ञ, धर्मराजासारखे सत्यनिष्ठ, भीमार्जुनासारखे आज्ञाधारक, श्रीकृष्णासारखे परहितरत, हनुमानासारखे स्वामिसेवातत्पर, विदुरासारखे विनयशील

व्यासवसिष्ठजनकादिकांसारखे ज्ञानी पुरुष या भरतखंडांत पूर्वीं होऊन गेले म्हणून त्याची भरभराट झाली. त्याच आपल्या मातृभूमीची पुन्हा भरभराट व्हावी अशी इच्छा असेल तर सद्गुणांची जोपासना केली पाहिजे. नुसत्या पुस्तकी ज्ञानाला महत्त्व देऊन कांहींएक कार्य होणार नाहीं.

# : १२ : वक्तृत्व

—१—

वक्तृत्व हा शब्द संस्कृत 'वच्' धातूपासून झालेला आहे. हें भाववाचकनाम असून वक्त्याची क्रिया तें वक्तृत्व असा त्याचा अर्थ आहे. वक्ता म्हणजे आपल्या मनांतील भाव दुसऱ्याला पटेल अशा रीतीनें सांगणारा जो पुरुष तो. आपले हेतु दुसऱ्याला पटवून देण्याची जरूरी आपणांस खाजगी नित्याच्या व्यवहारांत तर भासतेच, परंतु सार्वजनिक व्यवहारांत तर ती जास्तच भासते. म्हणून शिक्षक, वकील, न्यायाधीश व राजकारणी पुरुष ह्यांचें यश बरेंचसें त्यांच्या वक्तृत्वशक्तीवर अवलंबून असतें. विद्यार्थ्यांनीं लहानपणापासून ह्या कलेकडे लक्ष द्यावें. कांहीं शाळांमधून वादविवादाच्या सभा असतात त्यांत विद्यार्थ्यांनीं अवश्य भाग घ्यावा व आपली बोलण्याची शक्ति वाढवावी. तिचा त्यांना पुढील आयुष्यांत फार उपयोग होईल.

इतर कलांप्रमाणें ही कलाहि मनुष्यास अभ्यासानें बरीच आत्मसात् करितां येते. मोठ्या सभेंत उभें राहून भाषण करण्यास अंगीं एक प्रकारचा धीटपणा लागतो व संवयीनें हा धीटपणा आपणांस प्राप्त करून घेतां येतो. कित्येक माणसें चारचौघांत सफाईदार बोलतात, परंतु सभेंत भाषण करण्याची पाळी आल्यास

त्यांची फारच त्रेधा उडते. अशीं माणसेंहि कांहीं दिवसांच्या अभ्यासानें चांगलीं भाषणें करूं शकतात.

एकादा विषय दुसऱ्यास पटेल अशा रीतीनें सांगण्याकरितां तो विषय बोलणारास आधीं पटलेला पाहिजे. ह्याकरितां तो विषय आपणांस चांगलाच अवगत असला पाहिजे. विषय आपणांस जितक्या तीव्रतेनें पटलेला असेल तितका तो दुसऱ्यास पटवून देणें सुलभ जाईल. रोजच्या व्यवहारांत अशीं कांहीं माणसें आपण पाहतों कीं, त्यांच्यांत बोलकेपणा फारसा नसूनहि त्यांचें म्हणणें आपणांस पटतें. ह्याचें कारण त्या माणसांचा त्या विषयाचा अभ्यास व त्यामुळें उत्पन्न झालेली निष्ठा हें मुख्यत्वेंकरून होय.

आपला हेतु दुसऱ्यास पटवून देण्याकरितां आपणांस व्यवहारांतील निरनिराळीं उदाहरणें घ्यावीं लागतात व आपलें म्हणणें सुसंबद्ध रीतीनें मांडावें लागतें. त्याकरितां आपणांस भाषाशास्त्र व तर्कशास्त्र ह्यांचा चांगला अभ्यास केला पाहिजे. त्याशिवाय निरनिराळीं उदाहरणें घेऊनहि आपला विषय आपणांस विशद करितां यावयाचा नाहीं. त्यावरून वक्तृत्वाला विद्वत्तेची किती आवश्यकता आहे हें लक्षांत येईल.

आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ वक्त्यानें मधून मधून थोर पुरुषांचीं वचनें जर उद्धृत केलीं तर त्यांचा श्रोत्यांच्या मनावर अनुकूल परिणाम होतो, व भाषणालाहि विशेष प्रकारची शोभा येते. ह्याकरितां वक्तृत्वाचा अभ्यास करूं इच्छिणारांनीं आपल्या वाचनांत येणारीं थोर पुरुषांचीं उत्कृष्ट वचनें पाठ करण्याची संवय ठेवावी. अशा वचनांचा लेखन व भाषण ह्या दोन्ही कलांत चांगलाच उपयोग करून घेतां येईल.

बोलणाऱ्याच्या उपदेशाचा श्रोत्यांच्या मनावर टिकाऊ परिणाम व्हावयास वक्ता सच्छील असला पाहिजे. आपण सांगतों तें सत्य व हितकर आहे, अशी त्याची ठाम समजूत असून तदनुरोधानें त्याचें वर्तन असल्याशिवाय लोकांचा त्याच्यावर विश्वास बसणें शक्य नाहीं. तथापि कित्येक वक्ते आपल्या अस्खलित भाषणानें व नाटकी हावभावानें लोकांच्या तात्कालिक मनोवृत्तींचा फायदा घेऊन लोकांना आपल्या बाजूला वळवून घेतात. परंतु हा त्यांचा लोकांच्या मनावरील ताबा फार दिवस टिकत नाहीं. जे लोक एक वेळ त्यांची प्रशंसा करितात, तेच त्यांचा खोडसाळपणा लक्षांत आला म्हणजे त्यांचे निंदक बनतात.

वक्त्याला श्रोत्यांच्या मनोवृत्ति व भावना ह्यांचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे. एकादी गोष्ट जरी खरी असली तरी तिचा खरेपणा ग्रहण करण्याइतकी लोकांच्या मनाची तयारी आहे कीं नाहीं ह्याचा वक्त्याला अवश्य विचार केला पाहिजे. आपण सांगतों तें सत्याला धरून तर असलेंच पाहिजे परंतु तें लोकांच्या बुद्धिकक्षेच्या पलीकडे असूनहि चालणार नाहीं. बहुजनसमाजावर ताबा मिळविण्यास वक्त्याला त्या समाजांतील लोकांच्या भावनांचीहि चांगली ओळख पाहिजे. प्रत्येक समाजाला कांहीं प्रिय व कांहीं अप्रिय अशा बाबी असतातच. प्रिय कोणत्या व अप्रिय कोणत्या ह्यांची वक्त्याला नीट जाणीव पाहिजे. लोकांच्या कांहीं भावना चुकीच्या असल्या तरी त्या हळूहळू युक्तीनेंच काढून टाकिल्या पाहिजेत. लहान मुलांना सन्मार्गाला लावूं इच्छिणाऱ्या शिक्षकाच्या अंगीं जसा प्रेमळपणा असावा लागतो तद्वत् तो बहुजनसमाजाला मार्ग दाखवूं इच्छिणाऱ्या वक्त्याच्या अंगींहि जरूर असला पाहिजे. नाहीं तर बाकीच्या सर्व

गोष्टी अनुकूल असूनहि वक्त्याला आपल्या कार्यांत मिळावें तसें यश मिळणार नाहीं.

वरील गोष्टी वक्त्याच्या ठिकाणीं असल्यास वक्त्याला शेंकडा ७५ टक्के यश खास मिळेल. यशाचा राहिलेला भाग मात्र कांहीं बाह्य गोष्टींवर अवलंबून राहातो. त्या बाह्य गोष्टी म्हणजे मोठा व मधुर आवाज, शरीराची भव्य व सुंदर ठेवण व भाषणानुरोधानें केलेले योग्य असे हावभाव. ह्या गोष्टी बऱ्याचशा ईश्वरदत्त असतात. आवाज सुधारण्याचा मात्र वक्त्यानें कसून प्रयत्न करावा; कारण ह्या बाह्य गोष्टींत आवाजाला फारच महत्त्व दिलें पाहिजे. सुप्रसिद्ध वक्ता डेमास्थेनीस हा मूळचा तोतरा असून प्रयत्नानें त्यानें आपला आवाज चांगलाच सुधारला होता असें इतिहासावरून कळतें.

योग्य व्यायाम व योग्य आहार यानें शरीरही सुंदर नसलें तरी बरें दिसेल.

वक्त्यास जे गुण पाहिजेत त्यांत कार्यनिष्ठा व तीमुळें उत्पन्न होणारी कळकळ हे गुण प्रमुख होत. कळकळीनें केलेलें भाषण श्रोत्यांच्या मनावर टिकाऊ परिणाम करितें. लो. टिळक, म. गांधी व प्रो. कर्वे यांचीं भाषणें ज्यांनीं ऐकिलीं असतील त्यांना वरील विधानाची सत्यता ताबडतोब पटेल. ह्या तिन्हीहि पुरुषांपेक्षां मोहक भाषणें करणारे दुसरे कांहीं लोक आहेत, परंतु त्यांच्या बोलण्याला कृतीची तशी जोड नसल्यामुळें त्यांच्या भाषणांचा परिणाम टिकाऊ होत नाहीं.

# : १३ : वक्तृत्वकलेचा अभ्यास करूं इच्छिणारांस कांहीं सूचना

—२—

मित्रांनो, मागील विवेचनावरून वक्तृत्वकलेचें महत्त्व तुमच्या लक्षांत आलेंच असेल. तुमच्या शाळेंत एकादी 'वक्तृत्व-सभा' असेलच. तुम्हीं तींत जरूर भाग घेऊन ही अत्यन्त उपयुक्त कला हस्तगत करून घ्या. ह्या कलेचा अभ्यास करितांना खालील गोष्टींकडे लक्ष दिल्यास तुमचा पुष्कळ फायदा होईल.

१ ज्या विषयाची तुम्हांला माहिती नाहीं त्या विषयावर बोलूं नका. पुष्कळांना अशी खोड असते कीं, आपणांस एकाद्या विषयाची माहिती नसली तरी कोणी बोलावयाचा आग्रह केला कीं बोलावयाचें ! ह्याचा परिणाम असा होतो कीं कांहीं तरी बोलण्याची संवय जडते व अशा बोलण्याला श्रोते कंटाळतात. आपणांस एकाद्या विषयावर बोलावयाचें असल्यास त्याचा अभ्यास करून एक टांचण तयार करावें व नंतर बोलावें. एकाद्या विषयाचा अभ्यास आपण जितका चांगला करूं तितकें जास्त सफाईनें आपणांस त्या विषयावर बोलतां येतें. प्रारंभीं प्रारंभीं तर समग्र भाषण लिहून काढावें. तें दोन चार वेळां वाचून त्यांतील मुद्द्यांचें टिपण

करावें, व हें टिपण समोर ठेवून बोलावें. मुद्द्यांचें टिपण अशा रीतीनें करावें कीं एका मुद्द्यावरून दुसरा मुद्दा स्वाभाविकपणें सुचावा.

२ कोणत्याही भाषणाचे सामान्यतः तीन भाग पडतात. प्रथमतः विषयप्रवेश, नंतर विषयाचें प्रतिपादन व शेवटीं उपसंहार. उत्तम वक्ते विषयप्रवेशांत विषयाचा खुबीनें निर्देश करून त्याचें महत्त्व वर्णन करितात. प्रतिपादनांत विषयाचें शक्य तितकें स्पष्टीकरण करितात व उपसंहारांत आपणांस जी गोष्ट विशेषेंकरून सांगावयाची असते ती थोडक्या, जोरदार व मार्मिक शब्दांत सांगून भाषण संपवितात. वक्त्यानें ह्या शेवटच्या भागावर विशेष नजर ठेवावी. हा जितका चांगला वठेल तितका एकंदर भाषणाचा परिणाम जास्त अनुकूल होईल.

३ प्रत्येक मुद्द्याचें विवेचन शक्य तितकें स्पष्ट करावें. तें स्पष्ट होण्याकरितां जरूर त्या दंतकथा, उपमादि अलंकार, ऐतिहासिक गोष्टी व आवश्यक अंगविक्षेप यांचा उपयोग करावा. पण या गोष्टी ओढून ताणून आणिल्या असतां हंशाला कारण होतात हें विसरूं नये. मुख्य लक्ष मुद्द्यावर असावें. आम्ही एका प्रसिद्ध वक्त्याचें भाषण ऐकावयास गेलों होतों. हे गृहस्थ फार मोठे वक्ते म्हणून त्यांची सामान्य लोकांत प्रशंसा होत असे. सर्व भाषण ऐकल्यावर आमचें सदरहू गृहस्थांच्या वक्तृत्वाविषयीं फारच प्रतिकूल मत झालें. हे गृहस्थ कोट्या करून सामान्य लोकांना भुरळ पाडतात. परंतु ह्यांच्या बोलण्यांत तर्कशुद्ध प्रतिपादन फार कमी. कोंड्याच्या पोत्यांत जसे मोठ्या मिनतवारीनें चिमूटभर दाणे सांपडावे तशी यांच्या भाषणाची तऱ्हा ! अशा भाषणानें सामान्य लोक फसतात परंतु सुज्ञ फसत नाहींत. आपल्या भाषणाचा परिणाम

टिकाऊ व्हावा अशी ज्याची इच्छा असेल त्यानें तर्कशुद्ध व मुद्देसूद व्हावें म्हणून प्रयत्न करणें आवश्यक आहे. विषयाची माहिती भरपूर असूनहि भाषा पुरेशी न पडल्यामुळें कित्येक बोलणारांची त्रेधा उडते. ह्याला उपाय आरंभीं कांहीं दिवस सर्व भाषण लिहून काढणें हा होय. ह्यानें भाषेकडे लक्ष देण्यास भरपूर अवसर सांपडतो व हळुहळु ती सुधारत जाते. कांहीं दिवस असें केल्यावर सबंध भाषग लिहून काढण्याची आवश्यकता राहणार नाहीं.

५ कांहीं लोक आपलीं भाषणें वाचून दाखवितात. ही तऱ्हा अगदींच कंटाळवाणी होते. भाषणांत श्रोत्यांचें लक्ष वक्त्यानें आपल्या नजरेनें, हावभावादिकांनीं आपणांकडे वेधून घेतलें पाहिजे. भाषण वाचून दाखवितांना यांतील कांहींच साध्य होत नाहीं. त्यामुळें श्रोते कंटाळून जातात. विद्यार्थ्यांनीं पहिल्यासून ही तऱ्हा टाळावी. आरंभीं भाषण लिहून काढावें व तें पुष्कळदां वाचावें म्हणजे भाषेची अडचण पडणार नाहीं. जवळ मुद्द्यांचें टांचण असलें म्हणजे विषयान्तर होणार नाहीं. प्रारंभीं थोडी भाषेची अडचण पडली व विषयान्तर झालें तरी हरकत नाहीं. पण भाषण वाचून दाखवूं नये.

६ सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें भाषण कंटाळवाणें होऊं देऊं नका. श्रोते कंटाळलेले दिसतांच आवरतें घ्या. तुम्ही आणखी बोलावें अशी श्रोत्यांची इच्छा असेतोंपर्यंतच तुमचें भाषण संपलें पाहिजे. कांहीं लोकांना लांबच लांब भाषणें करण्याची संवय असते. बोलणारा फारच मोठा माणूस असल्यास लोक ऐकून घेतात. परंतु तोच सामान्य माणूस असल्यास गडबड करितात हें विसरूं नका. ह्मणन भाषण लांब होऊं देऊं नये.

७ ( अ ) बोलतांना आपल्या मनोवृत्तीप्रमाणें हावभाव व भाषा ह्यांत फरक पडला पाहिजे. एकच सुरांत केलेलें भाषण कंटाळवाणें होतें.

( ब ) कित्येकांना भाषणाच्या आरंभापासून ओरडण्याची संवय असते. असे लोक लवकर दमून जातात व ज्यावेळीं जोरानें बोलण्याची आवश्यकता असते, त्यावेळीं त्यांचा आवाज चढत नाहीं, म्हणून ओरडूं नका.

( क ) पण तुमचें भाषण सर्वांना ऐकूं गेलें पाहिजे हें लक्षांत ठेवून अगदीं हळूहि बोलूं नका. आपणांपासून दूर असलेल्या लोकांकडे नजर ठेवून त्यांचें लक्ष आपणांकडे आहे कीं नाहीं हें पहात जा. त्यांचें लक्ष नसेल तर जरा मोठ्यानें बोला.

८ वक्तृत्व ही एक अवघड कला आहे. अभ्यासानें ती साध्य होते, म्हणून निराश होऊं नका. तुमचें भाषण सर्वांना पसंत पडलें नाहीं म्हणून निराश होऊं नका व धीर सोडूं नका. उत्तम भाषण-सुद्धां रुचिवैचित्र्यामुळें सर्वांनाच पसंत पडेल असा भरंवसा नाहीं. कांहीं लोकांना तें पसंत पडलें तरी तें बरें झालें असें समजून त्यांत काय सुधारणा करितां येईल त्याचा विचार करा व पुढील खेपेस त्याप्रमाणें सुधारण्याचा प्रयत्न करा. अशा रीतीनें प्रयत्न करीत राहिल्यास तुम्हांला ही कला बरीचशी साध्य करून घेतां येईल.

## : १४ : वेळाचा सदुपयोग.

‘ कायरे रामा, आज अभ्यास कां केला नाहींस ? ’

‘ बाबांनीं बाजारांत भाजी आणावयास पाठविलें होतें म्हणून वेळ झाला नाहीं, मास्तर. ’

‘ आणि तूं ग सखू, आज उदाहरणें कां केलीं नाहींस ? ’

‘ आईनें घरांतलें काम सांगितलें होतें, म्हणून वेळ झाला नाहीं मास्तर. ’

माझ्या विद्यार्थि मित्रांनो, वरील तऱ्हेचीं किंवा अशाच प्रकारचीं दुसरीं उत्तरें तुम्ही अमुक गोष्ट कां केली नाहीं म्हणून विचारलें असतां कित्येक वेळां दिलीं असतील. वेळ झाला नाहीं, हें शेंकडा ७५ किंवा अधिक प्रश्नांचें उत्तर ठरून गेल्यासारखें आहे. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, हें उत्तर तुम्हीच देतां असें नाहीं तर मोठमोठे लोक सुद्धां हेंच उत्तर पुष्कळ वेळां देतांना आढळतात.

मित्रांनो, ‘ वेळ झाला नाहीं’ हें तुमचें उत्तर शेंकडा नव्याण्णव वेळां खोटें असतें असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. थोडासा विचार कराल तर, या म्हणण्याची सत्यता तुम्हांस पटेल अशी खात्री वाटते. ज्या दिवशीं वेळ झाला नाहीं हें उत्तर तुम्ही गुरुजींस द्याल त्याच दिवशीं तुमचा वेळ फुकट किती गेला याचा विचार करूं लागलांत तर तुम्हांस असें आढळून येईल कीं, गुरुजींनीं दिलेल्या अभ्यासापेक्षां जास्त अभ्यासही, तुम्हांला आईला किंवा वडिलांना थोडीफार मदत करूनही, करितां आला असता.

तुमच्या वेळापैकीं नुसत्या टिवल्या—बाव्हल्या करण्यांत उगाच इकडे तिकडे हिंडण्यांत, गप्पा मारण्यांत, तुमचे वडील आपल्या स्नेह्यांशीं बोलत बसले असतां आणि तुमचा त्या गोष्टींशीं कांहीं एक संबंध नसतां, त्या आडून ऐकत बसण्यांत किंवा अशाच अन्य प्रकारांत किती वेळ फुकट जातो, ह्याचा तुम्ही कधीं तरी विचार केला आहे का?

बरें, वेळ झाला नाहीं अशी तुम्ही तक्रार करितां, तर माझा तुम्हांस असा प्रश्न आहे कीं तुम्हांपैकीं सकाळीं लौकर किती जण उठतात? 'लौकर निजे, लौकर उठे, त्यासी आरोग्य, विद्या, धन भेटे' हें सद्वचन तुम्ही सर्वांनीं ऐकलें असेलच. हें वचन तुम्ही कृतींत उतरविल आहे का? बाकीच्या गोष्टी राहूं द्या. फक्त तुम्ही लौकर उठण्याचा व वर सांगितलेल्या वायफळ गोष्टींत वेळ व्यर्थ न दवडण्याचा निश्चय केलात तर तुम्हांस वेळ झाला नाहीं अशी तक्रार करण्याचें कधींच कारण पडणार नाहीं.

एकाद्या दरिद्री माणसानें आपल्या लहानशा प्राप्तीचा अर्धा-अधिक भाग जर निरुपयोगी किंवा अपायकारक गोष्टींत खर्च केला तर तुम्ही त्याला बिनदिक्कत मूर्ख म्हणाल कीं नाहीं? मग वेळ नाहीं म्हणून उठल्या बसल्या तक्रार करणारा व वर वर्णन केल्या-प्रमाणें वेळाचा दुरुपयोग करणारा मुलगा मात्र शहाणा ना?

मित्रांनो, आयुष्य फार अल्प आहे. तें सार्थकीं लावावयाचें असल्यास त्याच्या प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला पाहिजे. वेळेची काटकसर करण्यास जो शिकेल तोच सत्कृतिरूप ठेवा इतरांच्या उप-योगाकरितां आपल्या मागें ठेवूं शकेल.

माझ्या मित्रांनो, माझ्या म्हणण्याचा अर्थ तुम्ही सदासर्वदा अभ्यास केला पाहिजे असा नाहीं, तर तुम्ही आपल्या वेळाचा चांगला उपयोग

केला पाहिजे इतकाच आहे. आजचीं तुमचीं कर्तव्यें म्हणजे वडील माणसांचा मान राखून त्यांना थोडी फार मदत करणें, पुढील आयुष्यांत कर्तबगारी करून दाखवितां यावी म्हणून उत्तम प्रकारचें शरीर संपादन करणें व विद्या मिळविणें हीं मुख्य होत. तुमचा वेळ ह्या गोष्टींत गेला म्हणजे तो सार्थकीं लागला असें समजा.

मनुष्यास करमणूक ही सुद्धां पाहिजे ; पण ती अपायकारक किंवा निरुपयोगी नसावी. गप्पा मारणें, पत्ते कुटीत बसणें अशासारख्या गोष्टींत तुम्ही कालाचा अपव्यय करूं नये. मोकळ्या हवेंत निरनिराळें खेळ खेळणें, सृष्टींतील सुंदर देखावे पाहणें, आपल्या घराभोंवतीं झाडें लावणें, घरांत लागणाऱ्या साध्या लांकडी जिनसा तयार करणें, मुलींनीं रिकाम्या वेळांत कपडे शिवणें, कलाकुसरीचें विणकाम शिकणें, चित्रें काढणें, गायन शिकणें अशा अनेक उपयुक्त गोष्टींत मनाची करमणूक होऊन फायदाही होतो. तेव्हां अशा साध्या व उपयुक्त गोष्टींचें ज्ञान लहानपणींच मिळवून तुम्ही एक चांगलें करमणुकीचें साधन तयार करून ठेवा.

ह्यांशिवाय आणखीहि एक करमणुकीचें उत्कृष्ट साधन आहे. तें म्हणजे शाळेच्या पुस्तकांशिवाय इतर चांगलीं पुस्तकें वाचणें. हल्लींच्या मुलांना त्यांच्या क्रमिक पुस्तकांपलीकडे फारसें ज्ञान नसतें, अशा प्रकारचा पुष्कळ विचारी लोकांचा आक्षेप आहे. हा आक्षेप खरा आहे व त्याचें कारण एकच कीं, तीं इतर पुस्तकें वाचीत नाहींत. रामायण महाभारतासारखीं ज्ञान देणारीं व नीतिमार्गाकडे वळविणारीं पुस्तकें तुम्ही करमणूक म्हणून फावल्या वेळांत वाचलींत तर तुमचा पुष्कळ फायदा होईल. न्या. रानडे, लो. टिळक, डॉ. भांडारकर, रवींद्रनाथ टागोर, मुसोलिनी, मॅझिनी वगैरेंचीं मराठींतील चरित्रें वाचावीं. थोर

लोकांनीं लिहिलेले ग्रंथ हे सन्मित्र होत. ते आपलें मन रिझवून आपणांस योग्य तो सल्ला देतात.

ह्याशिवाय आणखी एक चांगलें करमणुकीचें साधन आहे. तें म्हणजे निरनिराळ्या आश्चर्यकारक वस्तूंचा संग्रह करणें हें होय. सृष्टि हा एक अजबखाना आहे! तुम्ही नुसते दगड गोळा करूं लागलात तर तुम्हाला कितीतरी निरनिराळ्या रंगाचे व आकाराचे दगड सांपडतील! शिंपाहि किती प्रकारच्या असतात! कीटक तरी किती जातींचे व रंगांचे असतात. हें जर तुम्ही पहाल तर आश्चर्यांत बुडून जाल! वनस्पतींचा संग्रह करण्याचें मनांत आणिल्यास तुम्हांस अनेक जन्म घ्यावे लागतील! अशा निरनिराळ्या रीतींनीं तुमची करमणूकच्या करमणूक होऊन शिवाय तुम्हांला ज्ञानलाभ होईल—नाहीं का?

पाश्चात्य लोकांस कोठला तरी नाद असतो. आपल्याकडे निरनिराळे गोरे अधिकारी येतात, ते आपलें काम सांभाळून इतर गोष्टींत मन रिझवितात. मागें खानदेशच्या एका कलेक्टरानें भिल्लांचीं गाणीं जमविलीं व तीं प्रसिद्ध केलीं; किंकेड साहेबांनीं महाराष्ट्रांतील व सिंधमधील लौकिककथा इंग्रजींत लिहिल्या. असे त्यांचे लोक असतात. परंतु आपले मामलेदार, मुनसफ, फॉरेस्टमधील अधिकारी पाहिले तर स्तुति करणारांच्या घोळक्यांत बसून गप्पा फक्त मारतात. ते नवीन ज्ञान मिळवितील असें नाहीं. कारण त्यांच्या ठरलेल्या कामाव्यतिरिक्त दुसरा नादच त्यांना नसतो.

तुम्ही कोणता तरी नाद स्वतःस लावून घ्या, ज्यामध्यें तुमचा रिकामा वेळ तुम्हांस घालवितां येईल व त्याचा चांगला उपयोग करतां येईल. लहानपणापासूनच या गोष्टीकडे लक्ष पाहिजे. मोठेपणीं शिकण्यास फार वेळ मिळणार नाहीं.

## : १५ : 'वक्तशीरपणा'

इंग्रज लोक आपलीं कामें ठरलेल्यावेळीं करितात अशी त्यांची प्रसिद्धि आहे. लग्नकार्यांत, मेजवानीचे प्रसंगीं, व्याख्यानाचे वेळीं जेव्हां जेव्हां हे लोक एकत्र जमतात तेव्हां कार्यक्रमास वेळेवर सुरवात करण्याची त्यांची पद्धति आहे. आपलें वर्तन ह्या बाबतींत फारच ढिलें आढळून येतें. लग्नकार्यांत जेवणाचें आमंत्रण १२चें दिलें तर प्रत्यक्ष जेवणास सुरवात दोन वाजतां किंवा केव्हां केव्हां त्याहूनहि उशीरां होते. सांगितलेल्या वेळीं आलेले लोक वाट पाहून पाहून कंटाळून जातात; व यजमानानें जरी त्यांस प्रेमानें जेवावयास बोलाविलें असलें तरी त्याचा खर्च होऊनहि उशीर झाल्यामुळें लोकांना सुख होत नाहीं. व्याख्यानाच्या जाहीर झालेल्यावेळीं वक्ता हजर नसावयाचा किंवा वक्ता असला तर श्रोते नसावयाचे. शाळेंत मास्तर वेळेवर नसावयाचे किंवा ते असले तर मुलें आलेलीं नसावयाचीं. कोणीकडून काय, ठरलेल्या कामाला वेळेवर सुरवात व्हावयाची नाहीं व सर्वांनाच त्रास पडावयाचा व त्यांचा वेळ फुकट जायचा. मुलांनो, आपण आपलीं कामें वेळेवर करण्यास शिकलें पाहिजे. लवकर उठून वेळेवर शाळेंत गेलें पाहिजे. शाळेंत अभ्यासाशिवाय जे इतर कार्यक्रम ठरविले जातील, तेहि वेळचेवेळीं पार पाडण्याकरितां झटलें पाहिजे. वेळचेवेळीं कामें केल्यानें आपला व दुसऱ्यांचा वेळ व्यर्थ जात नाहीं व कामहि अधिक होतें.

आपण गाडीच्या वेळेवर स्टेशनवर गेलों नाहीं तर गाडी आपली वाट पाहत नाहीं व आपणांस दुसरी गाडी येईपर्यंत कित्येक वेळां तासन्तास तिष्ठत बसावें लागतें, शाळेंत वेळेवर गेलों नाहीं तर शिक्षकांनीं समजावून दिलेला धडा आपणांस नीट येत नाहीं. तुम्हीं समाजाचे पुढारी झालांत तर तुमच्या अनियमितपणामुळें हजारों लोकांचा वेळ फुकट घालवाल. डॉक्टर झालांत तर तुमच्या रोग्याचा जीव धोक्यांत घालाल. वकील झालांत तर एखाद्याचा खटला बुडवाल व शिक्षक झालांत तर मुलांना अनिष्ट वळण लावाल.

मुलांनों, आपले पूर्वज आपलीं कामें वेळेवर करण्याविषयीं फार दक्षता बाळगीत. सूर्योदय व सूर्यास्त या उपासनेच्या वेळा चुकल्या तर प्रायश्चित्त घेत. उपनयन—विवाहादि कार्यें ठराविक दिवशीं ठराविक घटिका-पळांवर झालींच पाहिजेत. यज्ञयागादि कर्मे अगदीं वेळच्यावेळीं होत. महत्त्वाच्या सर्व कामांत मुहूर्त म्हणजे ठरवलेली वेळ चुकतां कामां नये असा त्यांचा दंडक असे. अजून आपण कांहीं धर्मकृत्यांत नाइलाजानें वेळ पाळतों, पण सर्व महत्त्वाच्या गोष्टी वेळेवर करण्याची आपण खबरदारी घेतली पाहिजे.

ज्यांना पुष्कळ काम करावयाचें असतें ते आपल्या कामाच्या वेळा ठरवितात, व ठरविलेल्या वेळीं तीं तीं कामें करतात. त्यामुळें त्यांचा वेळ फुकट जात नाहीं व कामांत गोंधळ होत नाहीं. ज्यांच्याशीं त्यांचें काम असेल ते लोकहि लवकर मोकळे होतात.



## : १६ : एका विद्वान पदवीधराचें स्वगत विचार.

दोन वर्षांपूर्वी माझी एम्. ए. ची परीक्षा झाली. यंदा एल्. एल्. बी. चीहि झाली. पहिल्या वर्गांत पास झालों. बरींचशीं परितोषिकेंहि मिळविलीं. सर्व आप्त व मित्रमंडळी माझ्या हुशारीचें कौतुक करितात. माझ्या सर्व प्रोफेसरांचीहि माझ्यावर फार मर्जी! पण कधीं कधीं अशा कांहीं गोष्टी घडून येतात कीं, त्यांवरून स्वतःचें अज्ञान पाहून मनाला फार खेद होतो व असेंही वाटतें कीं सर्व जन्म विद्यार्जनांत घालवूनहि आपलें ज्ञान फारच कोतें रहाणार! ह्या विचारानें मन कांहीं वेळ फार खिन्नहि होतें. एकाद्या ग्रंथसंग्रहालयांत गेलों आणि एखाद्या विषयावरच्या ग्रंथांची यादी पाहिली कीं इतके ग्रंथ आपणांस सर्व आयुष्यांत वाचून पुरे करितां येतील कीं नाहीं याचीच शंका वाटूं लागते. नुसत्या वाङ्मयाचाच विचार करूं लागलों तर मला मराठी, इंग्रजी व संस्कृत या भाषांचें ज्ञान झालें आहे खरें, पण संस्कृत वाचीत असतांना पाश्चात्य लोकांनीं विशेषतः जर्मन लोकांनीं लाविलेले शोध आपणांस कळावेत म्हणून जर्मन भाषा शिकण्याची फार इच्छा होते. फ्रेंच भाषेंतही संस्कृत वाङ्मयावर टीकात्मक बरेच ग्रंथ झाले असल्यामुळें फ्रेंच भाषाहि शिकाविशी वाटते. पण इतक्यांत मनांत असा विचार येतो कीं, सर्व जग ज्याच्या काव्याची मुक्तकंठानें स्तुति करतें त्या महाकवि रवींद्र-

नाथांचें काव्य किंवा सुप्रसिद्ध कादंबरीकार बंकिमचंद्र चतर्जी यांच्या कादंबऱ्या तरी आपण कोठें वाचिल्या आहेत? आपल्या देशांतली सुसमृद्ध बंगाली तरी आपणांस कोठें येतें, तर परकी भाषेचें ज्ञान नाहीं म्हणून वाईट वाटावें? ज्या विषयाचा मी विशेष अभ्यास केला व करितों त्याची ही कथा! एका वेळीं श्रीमंत असलेल्या परन्तु आतां दरिद्री झालेल्या एखाद्या खानदानींतील गृहस्थाला सरकार दरबाराकरितां निमंत्रण यावें व मग कर्ज काढूनहि चांगला पोषाख करून त्यास तेथें जावें लागतें, त्या स्थितींत तो पुरुष स्वाभिमानी असला म्हणजे त्याच्या मनाची जी स्थिति व्हावी किंवा तिसऱ्या वर्गाचें तिकीट घेतलेला एकादा गृहस्थ दुसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या आपल्या मित्राशीं घटकाभर बोलण्याकरितां त्याच्या डब्यांत जाऊन बसावा व इतक्यांत तिकीटें तपासणारा तेथें यावा म्हणजे त्या सद्गृहस्थाच्या मनाची जशी स्थिति होते त्याप्रमाणें कित्येक प्रसंगीं स्वताचें अज्ञान पाहून माझ्या मनाची होते.

प्रथमतः माझ्या या शरीराविषयींचाच जर मी विचार करूं लागलों तर कोण विलक्षण अज्ञान आढळून येतें! बरेच दिवसपर्यंत मला यकृत् ( liver ) म्हणजे काय तें कोठें असतें, त्याचें काम काय हें माहीत नव्हतें. अलीकडे ह्या शहरांत हिंवताप बोकाळल्यापासून डॉक्टरांच्या तोंडून आमक्या तमक्याचें liver ( यकृत् वाढलें आहे असें वारंवार ऐकूं येतें. म्हणून मीं नुकतीच एका डॉक्टर मित्राकडून त्याबद्दल माहिती करून घेतली. अशा रीतीनें डॉक्टरांना अगदीं साध्या वाटणाऱ्या गोष्टीहि मला माहीत नाहींत! मी इंग्रजी ३ री ४ थींत असतांचा एक प्रसंग आठवतो. आमचे शिक्षक हिंदुस्थान व इंग्लंड यांचेमधील जलमार्गासंबंधानें बोलत

होते. एका मुलानें विचारिलें, "सर, पण समुद्रावर बोटींना जाण्याकरितां रूळ कसे टाकतात ?" आम्ही त्यावेळीं त्या मुलाला खो, खो हंसलों, पण मला असें वाटतें कीं डॉक्टरमंडळींत मी जर आज बसलों तर ह्याहूनहि जास्त अज्ञानदर्शक प्रश्न मी त्यांस विचारीन. त्या मुलांत आणि माझ्यांत जर कांहीं फरक झाला असेल तर इतकाच कीं त्यानें तो प्रश्न त्यावेळीं निर्भयपणें विचारिला; आज आपली फजिती होईल म्हणून मी गप्प बसेन ! बरें खुद्द डॉक्टरांचीच जर गोष्ट घेतली तर त्यांना पूर्वीं माहीत नसलेले इन्फ्ल्युएंझासारखे किती तरी नवेनवे रोग उघडकीला येत आहेत. त्यांची चिकित्साहि अजून नीटशी ठरली नाहीं. पूर्वीं ठरलेली कांहीं रोगांची चिकित्सा चुकीची ठरून तिच्या जागीं नवीन उपयोगांत आणिली जात आहे, ती तरी चुकीची न ठरो म्हणजे झालें !

वनस्पतिशास्त्राविषयींचें माझें अज्ञान तर पुसूंच नका ! तमालपत्र मसाल्यांत नेहमीं वापरण्यांत येतें; परंतु गेल्या उन्हाळ्याच्या सुट्टींत मी एका मित्राबरोबर माथेरानास गेलों होतों. तेव्हां तेथें त्यानें मला तमाल वृक्ष दाखविला. तसेंच एका मराठी शाळेच्या मास्तरांना घेऊन आम्ही फिरावयास गेलों असतां त्यांनीं एक वेल दाखविला. त्या वेलाचीं पानें प्रथम चावून नंतर तोंडांत साखर टाकिली तरी बिलकूल गोड लागत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. आम्ही कांहीं पानें घरीं नेलीं, प्रयोग करून पाहतां सांगितल्याप्रमाणें चमत्कार आढळून आला. वनस्पतिशास्त्रांत असे किती चमत्कार असतील कोण जाणे ! दुसऱ्या एका प्रसंगीं कोंकणांत एका स्नेह्याकडे रायगड पाहण्याकरितां गेलों होतों. प्रवासाच्या दगदगीनें माझें अंगजरा मोडून आलें. साधारण ताप आल्यास माझी आई गुळवेल, सुंठ व

असल्यास रिंगणमूळ ह्यांचा काढा करून देत असे. मी आपल्या मित्रास त्याप्रमाणें सांगितलें. पण लगेच माझ्या मनांत आलें कीं, एवढ्या संध्याकाळीं गुळवेल कोठें मिळणार? हें कांहीं शहर नव्हे कीं काष्ठौषधीच्या दुकानांत गेलें कीं झालें काम! हा विचार मनांत येतांच मी आपल्या मित्रास पुन्हा म्हटलें; 'नको आतां काढा, गुळवेल मिळण्यास पंचाईत पडेल.' तेव्हां माझ्या मित्रानें उत्तर दिलें, 'अहो गुळवेलीला काय तोटा? ती पहा आमच्या अंगणांतल्या आंब्यावर!" यापूर्वीं आम्हीं गुळवेल दुकानांतून आणीत असल्यामुळें गुळवेलीचा वेल मीं पूर्वीं कधींच पाहिला नव्हता!


मागच्या पिढींतील म्हणजे लो. टिळक, आगरकर, यांच्या बरोबरच्या एका गृहस्थांशीं बोलत असतांना ते मला म्हणाले, "आमच्या पिढींतील लोकांना भौतिक शास्त्रांचें ज्ञान फार कमी. आमच्या वेळीं रसायन, पदार्थ–विज्ञान वगैरे भौतिकशास्त्रांचें ज्ञान बहुतेक पुस्तकावरून दिलें जात असे. प्रोफेसरांनीं कांहीं प्रयोग करून दाखवावेत व आम्हीं ते दुरून पहावेत. आज तुम्हांला ते स्वतां हातांनीं करून पाहतां येतात. त्यामुळें अलीकडच्या पदवीधरांना भौतिक शास्त्रांचें ज्ञान बरेंच जास्त असतें." मला त्यावेळीं ह्या बोलण्यानें थोडीशी फुशारकी वाटली, परंतु आतां मी विचार करूं लागलों म्हणजे तो सर्व अभिमान पार मावळून जातो. कांहीं दिवसांपूर्वीं मी व माझे कांहीं मित्र खोपवली येथील टाटांचा वीज उत्पन्न करण्याचा कारखाना पहावयास गेलों होतों. तेथील एंजिनियरनें आम्हांस सर्व गोष्टी समजावून सांगण्याकरितां फारच तसदी घेतली; पण काय, आम्ही कारखान्याचे बाहेर पडलों तो कारखा-

न्यांतील यंत्राचा प्रचंडपणा व त्यामुळें उत्पन्न होणारी भीति ह्या-शिवाय आमच्या मनावर संस्कार शिल्लक राहिले असतीलसें वाटत नाहीं. असा विचार मात्र मनांत आला कीं, अशा कारखान्यांत एकदा तज्ज्ञ बरोबर नसला तर सुरक्षित बाहेर येणेंहि अशक्य! एकादें बोट सहज कोठें लागलें तर इच्छा नसतांहि मोक्ष मिळावयाचा!

एकाद्या रात्रीं आकाशाकडे पाहिलें म्हणजे तर आपलें अज्ञान लक्षांत येऊन निराशाच उत्पन्न होते. किती ग्रह आणि किती तारका! कांहीं ग्रह व नक्षत्रें यांची माहिती मीं एका ज्योतिःशास्त्रज्ञा-कडून बी. ए. झाल्यावर करून घेतली. पण ह्या अनंत आकाशांत कित्येक असे ग्रह असतील कीं त्यांचा अजून आम्हाला पत्ताहि नाहीं. हर्शल आणि नेप्च्यून यांचा तरी शोध अलीकडेच नाहीं लागला? शिवाय हे अनंत दीप कोणीं लाविले, ते तेथें अव्याहत प्रकाशतात कसे, त्यांच्या पलीकडे आणखी काय काय मौजा असतील वगैरेविषयीं विचार करूं लागलों म्हणजे बुद्धि गुंग होऊन जाते.

चमत्कार पहाण्यासाठीं लोक साधूंच्या मागें लागतात, व ह्या साधूं-पैकीं पुष्कळसे भोंदू निघून त्यांना फसवितात. विश्वांत नुसते डोळे उघडले कीं पुरे, मग किती चमत्कार नजरेस पडतात! पाणी, माती व घाण यांपासून सुंदर गुलाबाचें फूल निर्माण होतें हा चमत्कार नव्हे काय? ह्या लहानशा चमत्काराचें कारण कोणी सांगूं शकेल काय? बरें; कोणीं कारण सांगण्याचा प्रयत्न केला तरी त्यांतलें आश्चर्य नाहींसें होईल? लहानशा फुलाची ही गोष्ट, मग मूल जन्माला कसें येतें? आईच्या पोटांत असतांना त्याला काय वाटत असेल? मरणानंतर मनुष्याचें काय होत असेल वगैरे गोष्टी तर मनुष्याच्या बुद्धीला नेहमींच न सुटणारीं कोडीं रहातील असें वाटतें.

इतकें मनुष्याचें ज्ञान कोतें आहे, तरी आपण शहाणे असें प्रत्येकाला वाटतेंच. मला तर असें वाटतें कीं मनापासून ज्याला आपल्याला फार थोडें कळतें असें वाटत असेल तोच खरा शहाणा. परमेश्वरानें प्रत्येकाला थोडें बहुत ज्ञान दिलें असून सर्वज्ञ असा कोणीच नाहीं. " कस्यापि कोप्यतिशयोऽस्ति स तेन लोके। ख्यातिं प्रयाति, न हि सर्वविदस्तु सर्वे ॥ " एकाद्याला काव्यांत चांगली गति असते तर इतिहासांत कांहीं कळत नाहीं. एकादा गणित विषयांत पारंगत असला तर त्याला वाङ्मयाचें ज्ञान बेताचेंच. एकादा भौतिक शास्त्रांत निष्णात असला तर त्याला काव्यांत कांहीं कळत नाहीं. ह्या पृथ्वीरूपी विशाल क्षेत्रांत प्रत्येकाला थोडी थोडी जागा मिळत असून जो तिच्यांत नीट मेहनत घेऊन मशागत करितो, त्याला भरपूर मोबदला मिळतो. मात्र कोणालाहि अभिमान बाळगण्यास वाव मिळत नाहीं.



## : १७ : अशानेंच स्वराज्य गेलें!

रामा:—काय रे सदू, तो विठू साने मोठा हुषार दिसतो! त्याला वार्षिक परीक्षेंत शेंकडा ८० मार्क मिळाले म्हणे!

सदू:—न मिळायला काय झालं? नेहमीं पुस्तकांत गढलेला असतो. तूं सुद्धां मिळवशील.

रामा:—अरे पण तो खेळांत सुद्धां पुढें असतो म्हणे! गेल्या फुटबॉल मॅचमध्यें त्यानें किती चांगले किक्स मारले!

सदू:—नुसता किक्स् ठेवून देतो झालं! त्याला काय कौशल्य लागतें?

रामा:—पण म्हणे तो नसता तर त्या दिवशीं 'डिफीट' नक्की ठेवलेला होता!

सदू: – तें आपलें उगाच, तो नसता तर त्याचा 'काका' दुसरा उभा केला असता.

रामा:—मास्तर म्हणतात, विठूसारखा भला मुलगा क्वचितच सांपडेल.

सदू:—भला म्हणे! मला वाटतें 'शेळपट' म्हटलें तर योग्य होईल. मास्तरांनीं खरं सांग म्हटलं कीं उडाली ह्याची गाळण! नाहीं तर आम्ही! मास्तर पंचवीस वेळां खरें सांग म्हणून म्हणेनात. खरं सांगून मारच खायचा ना? मग खोटं सांगून निसटण्याचा तरी संभव कां गमवा! मला त्याचा नेभळेपणा अगदीं आवडत नाहीं.

अशानेंच तर स्वराज्य गेलें. ठकास महाठक असेल तरच ह्या जगांत निभाव लागेल, नाहीं तर बसा रडत !

रामाः काय रे पण महाठकानें मिळवलेलें स्वराज्य अतिठक लुबाडून घेऊन गेला तर ?

सदूः—यालाच म्हणतात नेभळट! तो नेईल तेव्हां पाहूं! आज कशाला उठाठेव !

रामाः—अरे पण तसं नेलंय म्हणून विचारतों. आतां तें मिळवणार कसें? ह्या स्वराज्याच्या गप्पा राहूं देत. पण काय रे सदू, गेल्या रविवारीं नदींत कोणी मुलगा बुडत होता तो वांचला म्हणे ?

सदूः—होय. गेल्या रविवारीं आम्ही १० मुलें नदींत पोहायला गेलो होतों, पोहतां पोहतां, तो भिक्या जोशी लागला कीं गटांगळ्या खायला. आमची उडाली घाबरगुंडी. त्या नेभळट विठ्यानें मात्र त्यावेळीं बाजू राखली. त्यानें त्याला आणला कीं ओढीत कांठावर. बरं झालं, नाहीं तर सगळ्यांनाच त्या दिवशीं मिळत होता खरपूस मार घरीं गेल्यावर.

रामाः—तूंच ही हकीकत सांगतोस आणि तूंच विठूला नेभळट म्हणतोस ?

सदूः—अरे असें एकाद्या वेळीं चुकून घडतें. बाकी तो नेभळट तो नेभळटच. कपडे काय जाडेभरडे घालतोय; आणि स्नानसंध्येचा आव आणतोय आणि रोज देवाला काय म्हाताऱ्यासारखा जातोय? आपल्याला नाहीं आवडत बुवा हें!

रामाः—कायरे, विठूला परवां कांहीं बक्षीस मिळालें म्हणे ?

सदूः—होय. बडबडीबद्दल !

रामाः—म्हणजे वर्गांत बडबड केल्याबद्दल ? बडबडीबद्दल बक्षीस देतात तुमच्या शाळेंत ?

सदूः—तसं नव्हे रे. भाषण केल्याबद्दल. आपल्याला नाहीं बाबा बडबड आवडत. करून दाखवावें. बडबडींत काय अर्थ? व्याख्यानं देऊन स्वराज्य मिळणार आहे फारच !

रामाः—सदू , तुला स्वराज्याची बरीच काळजी लागलेली दिसते ! स्वराज्य मिळावयाला तुझ्या मनांत तरी काय केलं पाहिजे तें तरी सांग.

सदूः—सांगू ? खावं, प्यावं, दांडगाई करावी, आणि चांगलं बलवान् व्हावें.

रामाः—बरं सांगितलंस. अरे पण हा बायकांसारखा केसांचा नोकझोंक आणि हे तलम कपडे तुझ्या ह्या बोलण्याला शोभत नाहींत.

सदूः—अंः ! त्यांत काय झालं ! ही लहानपणाची हौस आहे.

रामाः—बरं पण तें राहूं दे. तूं तालमींत रोज जात असशी-लच ! कुस्ती खेळतोस ? काय रे पण रामा, तें धांवून कोण येतंय ?

सदूः—न गेलों म्हणून काय झालं ? असा भिणार नाहीं कोणाला.

रामाः—अरे तें गणपतरावांचं कुत्रं. तूं मघांशीं तें बांधलेलें असतांना त्याला दगड मारलास ना ?

सदूः—अरे बाप रे ! ( पळून जातो. )

रामाः—काय शूर आहे ? लांब लांब गप्पा मात्र मारतोय स्वराज्याच्या !



## : १८ : 'दैनंदिनीचें महत्त्व.'

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत नरश्चरितमात्मनः ॥
किं नु मे पशुभिस्तुल्यं किं नु सत्पुरुषैरिति ॥ १ ॥

एकाद्या व्यापाऱ्यानें जर आपल्या दुकानाचा जमाखर्च नीटनेटका ठेवला नाहीं तर त्याला आपला आयव्यय बरोबर न कळून त्याच्या व्यवहाराचा गोंधळ होतो. व कदाचित् नुकसान होऊन दिवाळें काढण्याचीहि त्याच्यावर पाळी येते. हें आपणास माहीतच आहे. परंतु द्रव्यापेक्षांहि मौल्यवान् जें आयुष्य त्याचें बहुतेकांनीं दिवाळें काढिलें असतांहि आपण त्याचा हिशेब नीट ठेवित नाहीं. हा केवढा अक्षम्य प्रमाद आहे! आश्चर्य हें कीं, आपण अशा प्रकारची एक मोठी चूक करीत आहोंत, हेंहि पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं.

आयुष्य हें बहुमोल असून भंगुरहि आहे, हें बहुतेकांना माहीत असून त्याचा सदुपयोग करण्याचा मात्र फारच थोडे प्रयत्न करितात. कळत असूनसुद्धां वळत नाहीं अशी आपली स्थिति आहे. मग ही स्थिति सुधारावी कशी याचा विचार करणें जरूर नाहीं का?

प्रथम आपण आपला वेळ खर्च करितों कसा तें पाहूं या. एकाद्या शहरांतील सामान्य शिक्षित माणसाचा दिनक्रम जर लिहून काढला तर तो बऱ्याच अंशीं खालीलप्रमाणें आढळेल.

सकाळीं ७ वाजतां निजून उठणें.

७–८ शौचमुखमार्जन व चहापान.

८–९ एकदोन मित्र आल्यामुळें त्यांच्यांशीं भाषण.

९–१० बाजार.

१०–११ स्नान व भोजन.

११–६ कचेरी.

६–७ दमून आल्यामुळें चहापान व विश्रांति.

७–८॥ मित्रांबरोबर फिरावयास अगर क्लबमध्यें.

८॥–९। भोजन, इकडे तिकडे किरकोळ.

९।–१० वाचन. विशेषेंकरून गोष्टी, कादंबऱ्या.

१०–७ झोंप. सुटीच्या दिवशीं नाटक, सिनेमा इ०

आतां खेड्यांतील माणसाचा दिनक्रम पाहूं या.

७–८ वरीलप्रमाणें.

८–११ शेतकी वगैरे व्यवसाय.

११–१ स्नान, भोजन वगैरे.

१–३ वामकुक्षी.

३–७ पोटाचा व्यवसाय शेती इ०.

७–९ भोजन व इकडे तिकडे.

९–११ गप्पा व नुसत्या कुटाळक्या.

११–७ झोंप.

शहरांतील माणूस निदान देशांत काय चाललें आहे याची थोडीशी तरी माहिती मिळवितो. परंतु खेड्यांतील माणसाला शहरांतून गेलेला एकादा माणूस जी मोडकी तोडकी माहिती सांगेल तिच्यावर किंवा आठवड्यांतून एकादें वर्तमानपत्र येईल, त्यावरून जें काय समजेल त्यावर भागवावें लागतें.

ह्या दोन प्रकारच्या दिनक्रमांत एक सामान्य तत्त्व दिसून येतें. तें हें कीं, पोटाकरितां जें करणें अवश्य आहे किंवा फॅशन म्हणून

जें लोक करितात त्यापलीकडे सामान्य मनुष्य जात नाहीं. शहरांत वर्तमानपत्रें वाचणें ही फॅशन आहे. तर खेड्यांत चावडींत बसून गप्पा मारणें हें संभावितपणाचें लक्षण समजलें जातें.

ज्याला आपल्या जीविताचें सार्थक करावयाचें असेल त्यानें आवश्यक तितकाच वेळ वृत्तीकरितां खर्च करून बाकीचा जेणेंकरून आपल्या आयुष्याचें साफल्य होईल अशा रीतीनेंच खर्च करण्याचा निश्चय करून, तो निश्चय कृतींत उतरविण्याचा प्रयत्न कसून केला पाहिजे.

हा प्रयत्न आपणांस यशस्वी करावयाचा झाल्यास त्याला एक उत्तम साधन म्हणजे आपली दिनचर्या लिहीत जाणें हा होय.

रोजच्या रोज आपण काय करितों तें लिहीत गेल्यास आपले दोष आपणांस स्पष्ट दिसूं लागतील व ते तसे दिसूं लागले म्हणजे निश्चयानें ते आपणांस घालवितां येतील. दोष घालवावयाचे तर ते प्रथम आपणांस दिसले पाहिजेत.

रोजच्या रोज आपण काय करितों तें लिहीत गेल्यास आपला वेळ किती फुकट जातो तें कळून येईल व आपणास खरोखरच चांगलें होण्याची इच्छा असल्यास तसें होण्याकरितां योग्य तो आपल्या वर्तनांत फेरबदल करितां येईल. अर्थात् आपली सुधारणा व्हावी अशी तीव्र इच्छा असेल तरच रोजनिशी लिहिण्यापासून खरा उपयोग होईल.

वडील माणसें व शिक्षक लहानपणीं मुलांना त्यांचे दोष दाखवितात, व योग्य तें नियंत्रण त्यांचेवर घालितात. म्हणूनच मुलांची सुधारणा होऊन त्यांस कांहींतरी चांगल्या संवयी लागतात. पण मनुष्य मोठा झाल्यावर हें बाह्य नियंत्रण नाहींसें होतें व त्याची

स्वतःची जबाबदारी वाढते. अशा वेळीं आत्मनिरीक्षणाचा जर त्यानें अभ्यास केला, तरच त्याला आपले दोष कळून येतील व कळून आल्यावर ते घालविण्याचा प्रयत्न करितां येईल.

रोजनिशी ही आत्मनिरीक्षणाला मदत करिते. आरशांत जसें आपलें रूप यथार्थ दिसतें, त्याप्रमाणें रोजनिशींत आपले गुणदोष यथार्थ दिसूं लागतात. मनुष्याची प्रगति न होण्याचें मुख्य कारण स्वतःच्या दोषांची जाणीव नसणें हें होय. ज्याची मी शहाणा अशी ठाम समजूत झाली त्याचा शहाणपणा वाढणार कसा? म्हणून स्वतःच्या अज्ञानाची जाणीव असेल तरच शहाणपणाची वाढ होईल. साक्रेटिसाला कोणी एकानें विचारलें कीं, अथेन्स शहरांत शहाणा कोण? तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, ' मी शहाणा; कारण मला माझ्या अज्ञानाची जाणीव आहे तशी इतरांना नाहीं. ' हें उत्तर त्या तत्त्ववेत्त्यानें बढाईनें दिलें नसून खरोखर शहाणा कोण हें लोकांना कळावें म्हणून दिलें आहे. तात्पर्य काय, कीं दोषांची जाणीव झाल्याशिवाय गुणांची वाढ होणें शक्य नाहीं व मोठेपणीं ही दोषांची जाणीव होण्यास रोजनिशी लिहून आत्मनिरीक्षण करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

कोणी म्हणतील कीं, आमचे मित्र आम्हांस दोष दाखवितील. कांहीं अंशीं हें म्हणणें कबूल करितां येईल; परंतु एक तर खरे जिव्हाळ्याचे मित्र फारच दुर्मिळ! बरें एकाद्याला तसे लाभले तरी त्यांना दोष दाखवितांना संकोच हा वाटणारच; म्हणून आपले दोष समजण्यास आत्मनिरीक्षणाची संवय करणें हाच उत्तम उपाय.

आत्मनिरीक्षण करून आपली प्रगति करून घ्यावी हा रोजनिशी लिहिण्याचा एक प्रमुख हेतु असावा. दुसरा हेतु आपणास जें जें

आश्चर्यकारक आढळेल, जे जे स्फूर्तिदायक विचार सुचतील, जी जी उपयुक्त माहिती मिळेल, ती ती लिहून ठेवून आपला व इतरांचा फायदा करून घ्यावा हा होय.

आपले दोष आपणांस लवकर दिसत नाहींत. दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं. असें जरी आहे तरी आपल्या दोषांमुळें आपणांस जगांत 'धक्के चपेटे' खावे लागतात. म्हणून तसे प्रसंग लिहून ठेवून विचार केला तर आपले दोष आपणांस कळून येतील व सुधारणा करण्यास सोपें जाईल.

: १९ :

# उद्योग

ऐसें भाग्याचें लक्षण । वाया जाऊं नेदी क्षण ॥

ज्याला उद्योग करावा लागत नाहीं तो सुखी अशी सामान्य माणसांची सुखाची कल्पना असते; पण जो उद्योग सोडीत नाहीं तो सुखी असतो व निरुद्योगासारखें दुःख नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव नेहेमींचा आहे. उद्योगी माणसाला विश्रांति पाहिजे. पण ती व्यवसायाचा बदल करूनहि मिळूं शकते. अभ्यास करून मेंदूला शीण आला असतां, मोकळ्या हवेंत फिरावयास गेल्यानें तो नाहींसा होतो, खोलींत स्वस्थ बसून राहाण्याचें कारण नाहीं. शारीरिक कष्ट करून थकवा आला असतां, अंथरुणावर स्वस्थ पडून एकादें आवडत्या विषयाचें पुस्तक वाचण्यानें मनाला सुख होऊन शरीराचा थकवा निघून जातो. न्यायाधीश, शिक्षक, कारकून वगैरे व्यवसायांत मेंदूला मेहनत जास्त होते अशा लोकांनीं बागेंत काम करणें, फिरावयास जाणें, आवडीप्रमाणें खेळांत भाग घेणें, अशा रीतीनें व्यवसायांत बदल केला म्हणजे त्यांचा शीण नाहींसा होतो.

निरोगी माणसाला निसर्गनिर्मित झोंपेशिवाय विश्रांतीची आवश्यकता फारशी असत नाहीं. व्यवसायांत बदल करून पुष्कळ वेळां विश्रांति मिळूं शकते, पण असा बदल करून आपला फायदा कसा करून घ्यावा हें मात्र पुष्कळांना माहीत नसतें. शिवाय या गोष्टीचें लहानपणापासून शिक्षण हवें. नुसती माहिती असून भागणार नाहीं.

निरनिराळ्या उपयुक्त व्यवसायांची संवय लहानपणापासून लागली पाहिजे. मोठेपणीं ती लागत नाहीं.

शाळांमधून हस्तव्यवसायाचें शिक्षण देणें, मुलांना चांगले छंद लागण्यासारखे असल्यास उत्तेजन देणें, मुलांना खेळाची आवड असतेच, तिचा फायदा घेऊन नियमित खेळाची संवय लावणें ह्या गोष्टी, मुलांमुलींचें पुढील आयुष्य उपयुक्त उद्योगांत जाण्याचे दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत. अशा संवयी लहानपणीं जडल्या तर त्यांपासून विश्रांति मिळते, व फायदाही होतो.

मनुष्याला उद्योग नसला म्हणजे त्याच्या मनांत सैतानाला चाळे करण्यास संधि मिळते. श्रीमंत लोकांना उद्योग करणें आवश्यक नसल्यामुळें ते हलक्या लोकांची संगत करतात. व दारू, वेश्या, नाचरंग, तमाशे, जुगार इत्यादि अनेक ढंगांत कालाचा, वित्ताचा व चित्ताचा अपव्यय करतात. लहानपणीं त्यांनीं शिकार, गायन-वादन, चित्रलेखन, सृष्टिसौन्दर्याचा आस्वाद घेणें, देशान्तर करून ज्ञान मिळविणें इत्यादि संवयी लावून घेतल्या तर त्यांचा व इतर लोकांचा केवढा फायदा होण्यासारखा आहे! कलोपासकांना उत्तेजन मिळेल व त्यांचा वेळ भलत्याच उठाठेवींत फुकट जाणार नाहीं.

देशांत दारिद्य वाढत चाललें आणि आपण तर अधिकाधिक आळशी व चैनी बनत चाललों. आम्हीं इंग्रजांची दारू घेतली पण त्यांची उद्योगप्रियता घेतली नाहीं. जबरदस्त उद्योग केला पाहिजे, नाहीं तर आतां धडगत नाहीं. घरांत खायला मिळावयाची पंचाईत, पण चहा पाहिजे, तलम कपडे पाहिजेत, सिनेमा, नाटकें पाहिजेत, हें जमावें कसें? जमलें नाहीं म्हणजे कर्ज काढावें, लबाड्या कराव्यात, पण हौस पुरवावी! असे लोक वागूं लागल्यामुळें


आपला मोठा अधःपात झाला आहे. दीर्घोद्योग, सरळ नेकीची वागणूक व साधी राहणी यांची कांस धरल्याशिवाय आपली उन्नति होणार नाहीं.

शारीरिक कष्ट करण्याची आपली संवय गेली आहे. पोषाखीपणा फार वाढला आहे. इंग्रजी शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींना घरकामांत आईबापांना मदत करणें कमीपणाचें वाटूं लागलें आहे. ही स्थिति पार बदलली पाहिजे. सुस्थितींत असणारे साहेब लोक आपली सायकल किंवा मोटार स्वतः साफसूफ करितात. बंगल्याभोंवतीं स्वतः झाडें लावतात. त्यांस पाणी घालतात. यांत कमीपणा मानीत नाहींत. पडेल तें कष्टाचें काम लक्ष घालून करण्याची संवय ज्यानें लावून घेतली त्याला कोणत्याही धंद्यांत यशस्वी होतां येईल. धंद्याचा दर्जा वाढविणें किंवा उतरणें हें तो धंदा करणाराच्या वर्तनावर अवलंबून राहातें. एका टोंकाला धर्मोपदेशक व दुसऱ्या टोंकाला झाडूवाला असें जरी व्यवहारांत लोक मानीत असले तरी वस्तुतः तसें समजणें चुकीचें आहे. दोघांनींहि आपला धंदा प्रामाणिकपणें केला तर दोघेहि समाजाचे हितकर्तेच होत. व दोघांनाही समाजानें आपुलकीनें वागविलें पाहिजे. एकाला अस्पृश्य मानायचें व दुसरा दुराचारी असला तरी त्याला मान द्यावयाचा हा फार मोठा अन्याय आहे. हिंदु समाजांतील वर्णव्यवस्था उच्चनीचभाव निर्माण करण्याकरितां नव्हे तर गुणांचा अधिकाधिक विकास करण्याचे हेतूनें घालून दिलेली आहे.

दीर्घोद्योगानें पुष्कळ गोष्टी साध्य होऊं शकतात. बुद्धीला उद्योगाची जोड असल्याशिवाय तिचें साफल्य होत नाहीं. मोठीं कामें नुसत्या बुद्धीनें होऊं शकत नाहींत. बुद्धीला उद्योगाची जोड

पाहिजे. बुद्धिमान् व उद्योगी माणसेंच जगांत मोठीं कार्यें करूं शकतात. सामान्य माणसालासुद्धां उद्योगानें बरेंच यश मिळवितां येतें. ' उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ' हें अगदीं खरें आहे.

ज्यांना चांगलीं कामें करावयाचीं आहेत त्यांनीं आळस झाडून टाकला पाहिजे. तो रोगापेक्षांहि वाईट आहे. रोग बरा होऊन मनुष्य पूर्ववत् बलवान् होऊं शकतो, पण आळस एकदा जडला तर त्याच्या कचाटींतून सुटणें फार दुर्घट होऊन बसतें.



: २० :

# वाचन

जीं माणसें विद्वान् म्हणून प्रसिद्धीला आलीं त्यांचें वाचन दांडगें होतें. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं कॉलेजमध्यें अध्ययन करीत असतांनाच इतिहासावरचीं शेंकडों पुस्तकें काळजीपूर्वक वाचलीं होतीं. कै. माधवराव रानडे यांनीं बी. ए. च्या वर्गांत असतांनाच अर्थशास्त्राविषयीं कित्येक ग्रंथ पचविले होते. कै. हरिभाऊ आपटे यांनीं कॉलेजमध्यें जीं २—३ वर्षे काढलीं त्यांत डेक्कन कॉलेजमधील ग्रंथालयांतच बहुतेक वेळ खर्च करून नामांकित कादंबरीकार होण्याचीं साधनें हस्तगत करून ठेविलीं. कै. प्रि. वामनराव आपटे यांनीं हायस्कूल व कॉलेजमध्येंच संस्कृत वाङ्मयांतील काव्य-नाटकांचा सांगोपांग अभ्यास उरकला होता.

नुसतीं भाराभर पुस्तकें वाचून मात्र मनुष्य विद्वान् होत नाहीं हेंहि विसरतां कामा नये. जीं जीं पुस्तकें वाचूं त्यांवर आपण मनन केलें पाहिजे. आपण जितकें अन्न पचवूं त्या प्रमाणांतच शक्ति येते. जितकें खाऊं त्या प्रमाणांत नव्हे. वाचनालाहि तो नियम लागू आहे. मनन करून जितकें आपणांस पटेल तितकेंच आपल्या उपयोगी पडेल. बाकीचें व्यर्थ तरी जाईल किंवा अपाय करील.

थोर ग्रंथ म्हणजे थोर पुरुषांचे अनुभव असल्यामुळें, आपणहि सूक्ष्म निरीक्षण करून अनुभव घेतल्याशिवाय आपल्याला थोर ग्रंथ समजणार नाहींत. कालिदासानें केलेलें हिमालयाचें वर्णन ज्यानें

एकाद्या उत्तुंग पर्वताचें दर्शन घेऊन तेथील सौंदर्याचें आकंठ पान केलें नाहीं त्यास कसें समजणार? 'पण लक्षांत कोण घेतो?' ह्या कादंबरींत वर्णन केलेली स्त्रियांची दुःस्थिति हिंदू विधवांच्या करुण स्थितीचें ज्यानें अवलोकन केलें नाहीं व ज्याच्या मनांत कोमलता वास करीत नाहीं, त्याच्या अंतःकरणाला कसा द्रव फोडणार? ज्याचा एकहि दिवस लबाडी केल्याशिवाय जात नाहीं, पैशाशिवाय ज्याला जगांत श्रेष्ठ वस्तु आढळत नाहीं, 'हांजी हांजी' हाच ज्याचा पवित्र मन्त्र, त्या गुलामाला रामशास्त्र्यांच्या निःस्पृहतेचें व धैर्याचें कौतुक कसें वाटणार? चैन चालेपर्यंत ज्याचा स्नेह कायम, संकट येतांच जें सांपडेल तें घेऊन पसार होणार, अशानें तानाजीचें किंवा बाजीप्रभूनें स्वामिनिष्ठेकरितां दिलेल्या प्राणाहुतीचें वर्णन वाचलें तरी त्याला त्या सुहृत्स्नेहाचें पावित्र्य कसें समजणार? तात्पर्य, ग्रंथ समजण्याकरितां सहृदयतेची व सूक्ष्म निरीक्षणानें प्राप्त होणाऱ्या अनुभवाची आवश्यकता आहे. ह्यांच्याशिवाय विद्यादेवीच्या गाभाऱ्यांत प्रवेश मिळूं शकणार नाहीं. फार तर लांबून ओझरतें दर्शन घेतां येईल.

कांहीं लोक पुष्कळ पुस्तकें वाचतात, परंतु त्यांचें मन सुसंस्कृत झालेलें आढळून येत नाहीं. ह्याचें कारण वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. त्यांचें मन हें गाळण्यासारखें असतें—म्हणजे गाळण्यांत ज्याप्रमाणें मूळ पयार्थ मुळींच रहात नाहींत, फक्त गाळ मात्र शिल्लक राहातो, त्याप्रमाणें अशा वाचकांच्या मनांत सद्गुणांची जोपासना न होतां व्यर्थ अभिमान मात्र उत्पन्न होतो व ते लोकांची दिशाभूल करितात.

ग्रंथवाचनानें करमणूक तर होईलच, परंतु तो मुख्य लाभ

नव्हे. आपणांस नवीन नवीन माहिती मिळाली पाहिजे. संकट-काळीं थोर पुरुष कसे वागले तें समजून आपल्या अडचणीच्या वेळीं आपणांस धैर्य आलें पाहिजे. खरें सुख कशांत आहे हें कळूं लागून आपण मृगजलाच्या मागें धावण्याचें सोडून दिलें पाहिजे.

संसारांत उत्पन्न होणाऱ्या नानाप्रकारच्या प्रश्नांचें उत्तर आपणांस समाधानकारक मिळालें पाहिजे. मानव जातीची खरी उन्नति कशांत आहे, व अवनतीला कोणत्या गोष्टी कारणीभूत होतात हें आपणांस समजलें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास आपणांस नकळत पण खात्रीनें आपल्यामध्यें सद्गुणांची वाढ होऊन आपलें जीवित सुखी होऊन दुसऱ्यांना सुखी होण्यास आपणांकडून मदत झाली पाहिजे. तरच ग्रंथवाचनाचें सार्थक झालें असें समजावें.

थोर पुरुषांना आपल्या आयुष्यांत जो अनुभवाचा ठेवा लाभतो तो ते आपल्या बांधवांच्या कल्याणाकरितां ग्रंथाच्या रूपानें त्यांच्या हवालीं करितात. त्यांनीं अनेक ठेंचा खाऊन तो शहाणपणा मिळविलेला असतो. आपल्या हातून जे प्रमाद घडले, आपणांस ज्या अडचणींना तोंड द्यावें लागलें, त्यांतून पुढील पिढीची सुटका व्हावी ह्या थोर विचारानें प्रेरित होऊन लेखक ग्रंथ लिहीत असतो. म्हणून आपण त्यांतील विचार नीट समजावून घेऊन व मनन करून पचविल्याशिवाय ग्रंथवाचनापासून होणारा लाभ पूर्णपणें आपल्या पदरांत पडणार नाहीं.



: २१ :

# प्रेमबन्ध

माझे वडील एक सामान्य शेतकरी होते. सर्व दिवसभर कष्ट करून ५।६ माणसांच्या कुटुंबाचें पोषण जेमतेम करूं शकत. आमच्या गोठ्यांत ३–४ बैल, एखादी गाय व १–२ म्हशी इतकीं तरी जनावरें नेहमीं असत.

आमचा एक बैल जरा मारका होता. मारका म्हणण्यापेक्षां कोणी त्याच्या पुढें गेलें म्हणजे त्याला शिंगें हलवून मारण्याचा आव आणण्याची खोड होती. पण कामाला तो फार तलख होता. एकदां राहाटाला जोडून दिला कीं मलमूत्र–विसर्जनाशिवाय तो उभा राहात नसे. लहानपणीं त्याची शिंगें हालविण्याची खोड पाहून मला राग येई; व एका हातांत लहान काठी घेऊन तो बांधलेला असतांना त्याच्या पुढें जावें व त्यानें शिंगें हालवलीं म्हणजे त्याला तडाका द्यावा, असें मी केव्हां तरी करीत असें. बहुतेक हे माझे चाळे वडील जवळपास नसतांना चालत असत. एके दिवशीं हा प्रकार बाबांच्या नजरेस पडला. त्यांनीं पाहिलें मात्र व माझ्या आंगावर ओरडले, "काय रे मूर्खा, मोत्याला कां मारतोस?" मी हळूच उत्तर केलें, "मग तो मारायला येतो तो." "पण तूं त्याच्या वाटेला कां जातोस? तूं पुढें जातोस म्हणून तो शिंगें हालवतो. पुन्हां त्याच्या वाटेला गेलास तर मला खपणार नाहीं. बांधलेल्या जनावराला कधींच मारूं नये. काम करून घेतांना चुकारपणा

केला तरच फक्त जनावरांना मी मारतों, येरव्हीं कधींतरी मारतांना मला पाहिलें आहेस का? खबरदार पुन्हां मोत्याला मारशील तर!" बाबांनीं रागावून उत्तर दिलें.

माझे बाबा जनावरांवर फार प्रेम करीत. बैल कामावरून आल्यावर त्यांना स्वतां खाणें घालीत व त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत. बाबांनीं पाठीवरून हात फिरवितांच आमचा मारका मोत्यासुद्धां त्यांच्याकडे स्नेहपूर्ण नजरेनें पाहात राही. बाबा म्हणत, "माणसें एक वेळ केलेले उपकार विसरतील, पण जनावरें विसरत नाहींत." माणसामाणसांत फरक फार असतो. कांहीं थोडीं देवासारखीं चांगलीं असतात; पण पुष्कळशीं केलेले उपकार पार विसरतात. ते म्हणत, "मालकाकरितां जीव दिल्याचीं उदाहरणें कुत्रे व घोडे यांचीं जितकीं सांपडतील तितकीं माणसांचीं सांपडणार नाहींत, म्हणून निदान माणसांप्रमाणें जनावरांवर प्रेम करावें."

आमच्या बागेंत आंबे, फणस, केळीं, जांब वगैरे खाण्याच्या वस्तू तयार झाल्या तर ते शेजारच्या मुलांना बोलावून त्यांना थोड्याथोड्या देत, घरांत आम्हां मुलांकरितां भरपूर ठेवीत व नंतर घेवाऱ्याला विकीत. बाबा म्हणत, आपल्या कुटुंबांतील मुलेंमाणसें व शेजारींपाजारी यांना देण्यानें मला जें सुख वाटतें तें दोन पैसे अधिक सांठवून वाटत नाहीं.

माझे बाबा फारसे शिकलेले नव्हते पण त्यांच्या सभोंवतीं नेहमीं प्रेमाचें वातावरण ते उत्पन्न करीत. आमच्या गांवांत कोणीं माणूस आजारी पडलें आणि त्याला लागणारे जिन्नस आमचे घरांत असले तर ते त्याला मिळायचेच. कुटुंबांत कोणी आजारी असलें तर बाबा सर्व बाहेरचे व्यवसाय सोडून घरीं बसत व त्याची शुश्रूषा करीत.


गांवांत कांहीं सार्वजनिक काम कारावयाचें असलें तर बाबा सर्वांच्या पुढें होत व पडेल ती झीज सोशीत.

पंचवीस तीस वर्षांपूर्वी शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदत करण्याची बुद्धि आजच्यापेक्षां जास्त होती. एखादें कुटुंब, कर्ता पुरुष गेल्यामुळें, संकटांत सांपडलें तर त्याला शेजारी मदत करीत व त्याच्या मुलाबाळांचा सांभाळ करीत. आज कुटुंबांतील माणसेंसुद्धां एकमेकांना विचारीत नाहींत. आजच्या काळांतहि चांगलीं माणसें आढळतात, नाहीं असें नाहीं, पण एकंदर लोकसंख्येच्या मानानें त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. देशांत दारिद्र्य वाढत चाललें; पण एकमेकांविषयीं सहानुभूति कमी होत चालली. माणसें काय, किंवा जनावरें काय, त्यांना खायाला पाहिजे; पण खाण्यापेक्षां सहानुभूतीची, प्रेमाची अपेक्षा त्यांना जास्त असते. सुखाचा शब्द, प्रेमाचा हात व सहानुभूतीची नजर हीं प्राण्यांचीं अंतःकरणें ओढून घेण्याचीं खरीं साधनें होत. पैशानें कामें होतात असें म्हणतात. कांहीं होतील; पण जिवावरचीं होणार नाहींत. शिवाजी महाराजांच्या करितां शेंकडों लोक प्राण अर्पण करण्यास तयार असत; तें पैशाकरितां खास नव्हे. प्रेमासारखें बळकट बंधन नाहीं. प्रेमानें सर्व प्राणी वश करून घेतां येतात. प्रेम करावयास शिका. कोणालाही निष्कारण दुःख देऊं नका.

खरा शिक्षक विद्यार्थ्यांना प्रेमानें वागवितो. चांगला मालक नोकरांना अडचणीच्या वेळीं मदत करितो. संकटकाळीं थोडी मदत दिली तरी तिची किंमत फार मोठी असते. पावसाळ्यांत गरीब शेतकऱ्यांच्या जवळील धान्य संपतें. अशा वेळीं माझे बाबा त्यांना धान्य देत. ह्या उपकारामुळें त्यांना शेतीचे कामाकरितां वाटेल तेवढीं

माणसें वाटेल त्यावेळीं मिळूं शकत. दुसऱ्या कोणी त्यांना जास्त मजुरी देऊं केली तरी लोक ती नाकारीत.

प्रेम ही फार मोठी शक्ति आहे. बायबलांत म्हटलें आहे कीं, प्रेमानें पर्वतसुद्धां इकडचे तिकडे करतां येतात. प्राणिमात्रावर प्रेम करावयास शिका; तुम्हांला कांहीं कमी पडणार नाहीं.



: २२ :

# आईचें मुलास पत्र

इचलकरंजी,

ज्येष्ठ शु॥ १० शके १८६०.

श्री.

चि. वसंतास अनेक उत्तम आशीर्वाद वि. तुझें पत्र पोंचलें. मजकूर समजला. तूं आनंदांत असल्याचें वाचून मनास फार समाधान झालें. तुला येथून जाऊन अवघा एक महिना झाला, परंतु आम्हां सर्वांना वर्ष निघून गेल्यासारखें वाटतें. चि. शांता व मनोहर यांना तुझी फार आठवण होते. 'आई, दादा ग केव्हां येणार?' असें विचारल्याशिवाय त्यांचा एक दिवसहि जात नाहीं. तुझे मामा तेथें असल्यामुळें आमची काळजी बरीच कमी झाली आहे. व यांनीं कांहीं आढेवेढे न घेतां तुला वैद्यकीच्या शिक्षणाकरितां मुंबईस पाठवून दिलें.

वसंता, मला तुझ्या जेवणाखाणाबद्दल अगर अभ्यासाबद्दल कांहींच काळजी वाटत नाहीं. तूं मामाच्या घरीं असल्यामुळें तुझी खाण्यापिण्याची व्यवस्था मामी नीट ठेवीलच. अभ्यासाच्या बाबतींतहि तुझी आतांपर्यंतची महत्त्वाकांक्षा लक्षांत घेतली म्हणजे आम्हांला कांहींच काळजी करण्याचें कारण नाहीं.

पण, बाबा, एका गोष्टीबद्दल मात्र मला फार काळजी वाटते. शहरांत नाना प्रकारचे मोह उत्पन्न करणाऱ्या वस्तू हरघडी नजरेस

पडतात. चैनी माणसेंहि तेथें पुष्कळ आढळतात. त्यांची संगत एकदा का जडली, म्हणजे जन्माचें मातेरें झालेंच. मुंबईत जरा घराबाहेर पडलें म्हणजे चहाकॉफीचीं, फराळाचीं, सोडा वगैरे पेयांचीं विड्या–सिगारेटचीं दुकानें तरुणांस वेळोवेळीं मोह पाडतात. या सर्वांपासून अगदीं दूर रहा. एखाद्या वेळीं सहज गमंत म्हणून मित्रांच्या आग्रहानें तुला त्यांचें सेवन करण्याचा मोह होईल, त्यावेळीं तूं मन घट्ट करून त्यांना साफ नाहीं म्हणून सांग; कारण गडकऱ्यांनीं दाखविल्याप्रमाणें ' एकच प्याल्यां 'त जसें दारूबाजाचें मरण असतें, त्याप्रमाणें कोणत्याहि दुर्गुणाचा उगम एखाद्या सहज घडणाऱ्या चुकीपासून असतो. बाबा रे, हीं हॉटेलें आणि हीं दुकानें म्हणजे नरकाचीं द्वारेंच! या चहासिगारेटपायीं किती तरुणांनीं आपलें जीवित दुःखमय केलें आहे. देशांत दारिद्य सारखें वाढत चाललें आहे, पण चहा-सिगरेटनां मात्र दरवर्षीं अधिकाधिक उतच येत चालला आहे! आवश्यक गोष्टींना पैसा नाहीं आणि अनवश्यक व अपायकारक वस्तूंना मात्र पैशाची तूट नाहीं! काय मूर्खपणा हा!

शहरांतला आणखी मोठा मोह म्हणजे नाटकें-सिनेमा. वडिलांनी पोटाला चिमटा घेऊन मुलांना शहरांत शिक्षणाकरितां ठेवावें आणि मुलांना मात्र नाटकेंसिनेमा पाहतांना दिक्कत वाटूं नये ही किती शरमेची गोष्ट. वसतिगृहाच्या व्यवस्थापकांनीं मुलांना नाटकेंसिनेमांना जाण्याची बंदी केली, तर कित्येक विद्यार्थी (विशेषतः कॉलेजचे) म्हणे नजर चुकवून निघून जातात. वर्षांतून एकादे वेळीं वडीलमाणसांचे परवानगीनें एकादें चांगलें नाटक किंवा सिनेमा पाहिला तर गोष्ट निराळी. परंतु उठल्या सुटल्या नाटक आणि सिनेमा म्हणजे पैशाची, कालाची व आरोग्याची फार मोठी हानि होय!

'बाबा रे, शिक्षणानें मनुष्य जर संयमी झाला नाहीं तर तें शिक्षण कसलें ? एकादें मूल जें दिसेल तें मागतें, तेव्हां आपण तें लहान आहे त्याला समजत नाहीं, असें म्हणून कधीं धाक दाखवून तर कधीं त्याचें लक्ष दुसरीकडे वेधून त्याला अहितापासून परावृत्त करितों; पण मोठ्या माणसांना तसें कसें करतां येणार ? त्यांचा त्यांनींच विचार करून ज्यांत आपलें हित असेल तें स्वीकारलें पाहिजे. त्यावरच मन स्थिर केलें पाहिजे. नुसतीं भाराभर पुस्तकें वाचून काय उपयोग ? थोर पुरुषांचे विचार वाचून ते कृतींत उतरविले तरच आपण थोर होण्याचा संभव. नाहीं तर नर्मदेंतील गोटे ! किती धुतले म्हणून काय त्यांत फरक होणार—पण चुकलें. ते गोटे बरे; कारण त्यांच्यावर कांहींच परिणाम होत नाहीं, पण शिक्षणानें मनुष्य सद्गुणी तरी होईल नाहीं तर दुर्गणी तरी होईल. त्याला मधली स्थिति नाहीं.


वसंता, हें तुझें वय अत्यंत महत्त्वाचें आहे. आतांपर्यंत तुझ्या वडिलांनीं अत्यंत काळजी घेऊन तुम्हां मुलांना चांगल्या संवयी लाविल्या, त्या टिकवून आपणांला व इतरांना सुख देण्याचा तुम्हीं प्रयत्न कराल तर आम्हां दोघांना फार आनंद होईल. आम्हांला आमचीं मुलें सद्गुणी निघालीं म्हणजे पूर्ण समाधान आहे. सद्-गुणांवाचून शिक्षणाला काडीइतकी किंमत नाहीं. वसंता, मी इतकें लिहिलें यावरून तूं रागावूं नकोस. तूं सद्गुणी नाहींस असा माझ्या म्हणण्याचा भावार्थ समजूं नकोस. तूं सुशील आहेस हें मला ठाऊक आहे; परंतु तुझ्या वयांत माणसाचें पाऊल वाकडें पडण्याचा फार संभव. ती मुंबई ! तेथें क्षणोक्षणीं मोहजालांत सांपडण्याची भीति असते म्हणून हा इशारा दिला आहे इतकेंच. मुंबई तर मोहमयी आहेच, पण अशा ठिकाणींहि ज्याचें मन चळणार नाहीं तोच खरा

धीर पुरुष. ‘विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः’ असें कविकुलगुरूनें म्हटलें आहे ना?

बरेंच दिवस मनांत होतें म्हणून लिहिलें. त्याचा राग मानूं नकोस. प्रेमाच्या माणसाशिवाय असें कोणी लिहिणार नाहीं व तुझ्यासारख्या समंजस माणसाशिवाय इतरांस लिहून उपयोगहि होणार नाहीं.

पत्र बरेंच लांबलें म्हणून पुरें करतें. चि. शांता व मनोहर यांचेकरितां येणाऱ्या जाणाऱ्याबरोबर एकेक चांगलें पुस्तक पाठवून दे. बाकी विशेष नाहीं. कळावें, हे आशीर्वाद.

तुझी आई.



## : २३ : रत्नाकर

थोड्या दिवसांपूर्वी मी माझ्या जन्मभूमीचें दर्शन घेऊन आलों. कोंकणांत दापोलीनजीक समुद्रकांठीं हर्णैबंदरापासून २।३ मैलांवर ' मुरूड ' म्हणून जो गांव आहे तीच माझी जन्मभूमि.

आमचा गांव अगदीं समुद्रालगत वसलेला असून तो विपुल जलानें, नारळीपोफळीच्या मोठमोठ्या बागांनीं, घरांच्या व्यवस्थित रचनेनें व समशीतोष्ण हवेनें ' सुखभूमि ' झाला आहे.

माझ्या मुक्कामांत पुष्कळवेळां सकाळीं मी समुद्रकांठीं एकटाच फिरावयास जात असें. तें लांबच लांब वाळवंट, तो अपार जलाचा सांठा, व त्याच्या पृष्ठभागावर वेगानें व डौलानें चालणारीं गलबतें व होड्या पाहून मनाला किती आनंद होई! किनाऱ्याकडे एकामागून एक लाटा अव्याहत वाहात असलेल्या पाहून माझ्या मनांतही उत्साहाच्या लहरी उत्पन्न होत. वाळवंटावरील मऊ वाळू—शपथेलासुद्धां दगड सांपडायचा नाहीं—पाहून लहान मुलांच्याप्रमाणें उड्या माराव्यात व लोळावें असें मनांत येई.

लहानपणीं आम्हीं ह्याच वाळवंटावर कितीकदा खेळलों, कितीक धांवलों, वाळूचे किल्ले व घरें बांधिलीं. त्या सर्व स्मृति जागृत होत. आपल्याला पुन्हा एकदा लहान होतां आलें तर किती मौज होईल असें मनांत येई!

एका बाजूला तो अमर्याद जलौघ, दुसऱ्या बाजूला नारळी-पोफळीच्या दाट बागा व मध्यें वाळवंट, मागें पुढें पहावें तर टेकड्या, वर पाहिलें तर निळें स्वच्छ आकाश असा तो नितांत–रमणीय देखावा होता.

समुद्रकिनाऱ्यावरील हवेसारखी स्वच्छ हवा दुसरीकडे कोठेंच मिळावयाची नाहीं. आपल्या जवळपास केव्हांहि घाण शिल्लक राहूं द्यावयाची नाहीं असें ह्या सागरानें एकदा व्रत घेतलें व तें अखंड चालविलें आहे. त्यानें आजवर कोट्यवधि जीवांच्या पापाचा नाश केला असूनहि स्वतांला त्याचा लेशहि लागूं दिला नाहीं.

केव्हां केव्हां किनाऱ्यावरून सूर्यास्ताचे वेळचा देखावा मी पाहात बसें. रोज त्याच्यांत कांहीं तरी नाविन्य आढळे. कधीं भगवान् सूर्यदेव आपल्या अनेक हस्तांनीं आकाशांत सुवर्णधूलि फेंकीत आहे असें वाटे. क्षितिजप्रांतीं रजतरसाचे ओढे वहात असल्याचें दिसून येई. व ह्या ओढ्यांतून अनेक लहान लहान ओहोळ बाहेर पडत. कधीं स्वर्णरस फेंकणारें प्रचंड कारंजें उडत असल्याचें दृश्य नजरेस पडे. सूर्यबिंबाचेहि अनेक आकार दिसत. व ते क्षितिजावरील ढगांच्या कमी जास्त प्रमाणावर अवलंबून असत. ह्यावेळीं सूर्यबिंबाकडे पहात असतांना कधीं सोन्याचा मोठा गोळा, कधीं राजाचा मुकुट, कधीं साहेबाची टोपी तर कधीं बुद्धविहारांतील स्तूप, ह्यांच्या कल्पना मनापुढें उभ्या रहात.

प्राचीन ऋषींनीं सूर्योदय व सूर्यास्त या प्रार्थनेच्या वेळा ठरविल्या व प्रार्थना होतां होईतों नदीकांठीं किंवा समुद्र किनाऱ्यावर करावी असा दण्डक घालून दिला. शांतता, स्वच्छता व सौन्दर्य हीं

जेथें एकत्र आढळतात त्या ह्या स्थळापेक्षां प्रार्थनेला अधिक अनुकूल स्थळ दुसरें कोणतें ?

सागरांत सर्व तीर्थें **अन्तरित** होतात, अशी आपली कल्पना असून समुद्र-स्नानाचें महत्त्व हिंदुधर्मशास्त्रांत वर्णिलें आहे. या स्नानानें त्वचेचे पुष्कळसे रोग बरे होतात, व भूक वाढते, असा स्नान करणारांना प्रत्यय येतो. देशावरील माणसें समुद्रांत पोहण्यास भितात, पण थोड्या संवयीनें समुद्रांत पोहणें अवघड नाहीं असें त्यांना दिसून येईल.



## २४

# भाऊबीज

मी माझ्या ताईकडे आज ३।४ वर्षांनीं भाऊबिजेला गेलेला. नोकरीमुळें फार दूर रहात असल्यानें मला दरवर्षी कोंकणांत जाऊन बहिणीला भेटणें अशक्य झालें आहे. मला तिची नेहमीं आठवण होते. व मला जरी तिच्या भेटीस जातां आलें नाहीं तरी मला नोकरी लागल्यापासून दरवर्षी मीं तिला प्रेमाची आठवण म्हणून कांहीं ओवाळणी नियमित पाठवीत असतों. पण यंदा प्रत्यक्ष भेटीचा योग आल्यामुळें माझ्या ताईला किती आनंद झाला हें शब्दांनीं सांगतां येणार नाहीं. तिची घरकामांतून मोकळीक झाल्यावर दुपारीं व रात्रीं तास दोन तास आम्हीं गोष्टी बोलत बसूं.

माझ्या ताईला माझ्या वडिलांनीं चांगलें सुखवस्तु घर पाहून दिलें होतें. पण विवाह झाल्यावर ८।१० वर्षांतच हळुहळू तिला गरीबी आली; व हल्लीं तर तिची स्थिति फारच हलाखीची झाली होती. तिचे एक दीर मुंबईत नोकरीवर होते. ते फार सज्जन होते. ते वर्षांतून एकदा घरीं जात व २।४ महिन्यांना पुरे इतकें सामानधान्यधुन्य घेऊन देत. माझे मेहुणे आपल्या लहानशा जमिनींत बहुत कष्ट करून कसें तरी कुटुंबाचें पोषण करीत. कुटुंबांत ५ मुली, २ मुलगे व नवरा-बायको. त्यांना नको काय? पण माझी ताई

कधीं रागवावयाची नाहीं. शांतपणें असेल त्यांत मुलांचा प्रेमानें सांभाळ करी व पतीला सुखी ठेवण्याचा प्रयत्न करी.

मागील आठवणी येऊन ताई म्हणाली, "भाऊ, तूं बी. ए. होऊन तुला चांगली नोकरी लागली हें पाहाण्यास आज आई पाहिजे होती. तिला किती धन्यता वाटली असती! भाऊ, बाबा तर तूं लहान असतांनाच वारले. पण आईचा आपणाला आधार होता. तिनें आपणाकरितां किती कष्ट केले! पण सुखाचे दिवस पाहाण्यास ती जगली नाहीं; जणूं काय फक्त आपले कष्ट करण्याकरितां तिनें जन्म घेतला होता."

"ताई, तूं म्हणतेस तें अगदीं खरें! आई मला घेऊन पुण्याला गेली. तिनें माझ्या शिक्षणाकरितां लोकांकडे कामें केलीं. त्यांचें प्रेम संपादन केलें. तिनें कोणाकडून पैसा घेतला नाहीं. केवळ माझें शिक्षण व्हावें व मीं मार्गाला लागावें एवढाच हेतु तिनें मनांत बाळगिला होता. आम्हांला कांहीं माणसेंहि फार चांगलीं भेटलीं. कांहींनीं मला वार दिले. शिक्षकांचें माझ्यावर प्रेम होतें. शाळेंत मला फीची माफी मिळाली. माझे मित्र मला पुस्तकें देत. या-सर्वांच्या मदतीनें माझें शिक्षण झालें."

" भाऊ, तुला फार कष्ट पडले. तूं शिकायाला लागलास आणि आमचीहि स्थिति फार खालावत चालली. ह्यांचीसुद्धां इच्छा तुला मदत करावी अशी फार होती. अनेक वेळां बोलून दाखवीत पण प्रपंच मोठा तोच चालविणें कठीण होत चाललें, हें मला दिसत असे. ते तरी काय करणार? आमची इच्छा मनांतच राहिली. "

" ताई, मला तुमचें अंतःकरण ओळखतां येत असे. मीं सुटींत तुमच्याकडे आल्यावर तुम्हीं मला किती प्रेमानें वागवीत होतां हें मला

आठवतें. ताई, देवदयेनें सर्व ठीक झालें आहे. आतां देवानें तुम्हांला आयुष्य द्यावें म्हणजे आईच्या मागूनहि मला मोठा आधार वाटेल. ताई, कठीण दिवसांतहि कांहीं प्रेमळ माणसें व मित्र लाभल्यामुळें मला पुष्कळ धीर आला. दारिद्र्यांत कष्ट पडतात हें खरें—पण प्रेमळ माणसें भेटलीं तर ते कष्ट असह्य होत नाहींत. दारिद्र्यांतून गेलेल्या माणसाला फार मोठें शिक्षण मिळतें. मनुष्य-स्वभावाची फार चांगली जाणीव होते. शाळा-कॉलेजांत शिकून हें ज्ञान मिळणार नाहीं. मागें पाहिलें म्हणजे मला थोडें दुःख होतें, पण दारिद्र्यानें मला सुविचार शिकविला याबद्दल मी परमेश्वराचे नेहमीं आभार मानतों."

"भाऊ, 'दारिद्र्य मरण यांतुनि मरण बरें, बा दरिद्रता खोटी' असें जें चारुदत्तानें म्हटलें आहे त्याच्याविरुद्ध तूं बोलतोस हें पटावें कसें?"

"ताई, चारुदत्त प्रथम धनवान् असून मागाहून दरिद्री झाला. माझे पहिले दिवस अडचणींत जाऊन आतां मला बरे दिवस लाभले आहेत. प्रथम शत्रूचा मार खावा लागला तरी शेवटीं विजयी होणाऱ्या वीराप्रमाणें माझा उत्साह व सामर्थ्य वाढलीं आहेत."

"भाऊ, लहानपणापासून तुझी उमेदच दांडगी म्हणून तुला देवानें हे दिवस दाखविले. भाऊ, तुझ्या हातून फार मोठीं कामें होतील असें मला वाटतें."


"ताई, माझ्या हातून मोठीं कामें होतील कीं नाहीं कोणास ठाऊक? पण मला जें मिळेल त्यांतूनच गरीब व होतकरू मुलां-मुलींना पुढें आणण्याकरितां मी माझी शिकस्त करीन. त्याकरितांच मी शिक्षकाचा पेशा पत्करला आहे. सुदैवानें माझ्याबरोबर आनं-

दांत राहून ह्या माझ्या पवित्र कार्यांत मला मनापासून मदत करील अशी थोर मनाची पत्नीहि मला लाभली आहे."

"पण, भाऊ, अडचण आली तर तुला मदत कोण करील? संकटांत ज्याचा तो म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. म्हणून मिळेल तें सर्वच खर्च करीत जाऊं नकोस. अडचणीकरितां कांहीं शिल्लक ठेवीत जा."

"ताई, मी तीन हजारांचा विमा उतरला आहे. माझी पत्नी सुविद्य व विचारी आहे. आणि मी ज्या मुलांमुलींना मदत करीन त्यांतील थोडीं तरी संकटकाळीं मला विसरणार नाहींत असा मला विश्वास वाटतो. माझ्या विद्यार्थिदशेंत मला दुसऱ्यांनी मदत केली नाहीं का?"

"भाऊ, तुझ्या शुभ निश्चयाच्या मी मुळींच आड येणार नाहीं. ईश्वरानें तुला आतांपर्यंत साहाय्य केलें. तशीच त्याची कृपा तुझें पुढेंहि बरें करील. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान्! सर्व करी पूर्ण मनोरथ!' मला असा थोर भाऊ देवानें दिला हें मी माझें मोठें भाग्य समजतें."



: २५ :

# ' सौजन्य '

' सौजन्यं यदि किं गुणैः ' ' अंगीं सुजनता असल्यावर इतर गुणांची मातब्बरी काय ?' —भर्तृहरि.

मुलांनो, तुम्हांला जगांत भलें म्हणून घ्यावयाचें असेल तर सर्व सद्गुणांना शोभा देणारें जें सौजन्य तें अंगीं बाणविण्याचा प्रयत्न करा. सौजन्यानें दोष झांकले जातात व गुण उठावदार दिसतात. ह्याच्या उलट अंगीं सौजन्य नसलें तर इतर गुण असूनहि मनुष्य लोकांना नकोसा होतो.

सौजन्य म्हणजे मनाचा प्रेमळपणा अथवा कोंवळिक. आपल्या बांधवांबद्दल प्रेम वाटणें, त्यांचीं दुःखें कमी करण्याचा प्रयत्न करणें, त्यांच्यांशी आदरानें वागणें, प्रेमानें बोलणें, हीं सौजन्याचीं लक्षणें होत. अन्तःकरणांत सौजन्य असलें तर तें बोलण्यांत प्रगट होत असतें; म्हणून सौजन्य ओळखण्याची बाह्य खूण मधुर भाषण ही होय.

ह्या जगांत मनुष्यास जीं दुःखें भोगावीं लागतात, त्यांतील निम्मे तरी आपण एकमेकांशीं भलेपणानें वागल्यास नाहींशीं होतील, असें निःसंशय म्हणतां येईल. एका निष्ठुर शब्दानें जितकें दुःख होतें तितकें अंगांत शल्य रुतल्यानेंहि होत नाहीं. ह्याच्या उलट दोन गोड, खऱ्या प्रेमाचे शब्द ऐकून जसें समाधान होतें, तसें कोणी पैसे दिल्यानें होत नाहीं.

मुलांनो, तुम्हीं आपल्या वडील माणसांना किंवा गुरूला उपमर्द-कारक शब्द बोललांत तर त्यांना किती दुःख होतें ह्याची आज तुम्हांला कल्पना करितां येणार नाहीं. परंतु इतकें सांगितलें असतां पुरे कीं, तुमचे शब्द त्यांना मरणापेक्षांहि दुःखदायक होतात. तुम्ही मोठे व्हाल, तेव्हां तुम्हांलाहि मी म्हणतों याचा अनुभव येईल. कर्णपर्वांत असा एक प्रसंग आला आहे कीं, धर्मराज घायाळ होऊन आपल्या शिबिरांत गेले असतांना कर्णवधाचें काम बाजूला सारून, अर्जुन आपल्या दादांची चौकशी करण्याकरितां त्यांच्या शिबिरांत गेला. कर्णाचा वध न करितां, अर्जुन आपल्या भेटीस आला आहे असें पाहून धर्मराजांनीं त्याच्या पराक्रमाची फार निंदा केली व 'व्यर्थ तुझें हें गांडीव धनुष्य, हें दुसऱ्याला देऊन टाक' असेंहि ते रागाच्या भरांत अर्जुनाला बोलले. अर्जुनाची अशी प्रतिज्ञा होती कीं, 'गांडीव दुसऱ्याला दे' असें जो म्हणेल त्याचा शिरच्छेद करावयाचा. त्याप्रमाणें प्रथम गांडीव घेऊन अर्जुन धर्मराजाच्या अंगावर धावून गेला. तेव्हां श्रीकृष्णांनीं त्याला मागें ओढलें व प्रतिज्ञेंतून सुटण्यास युक्ति सांगितली. ते म्हणाले, "अर्जुना, वडील माणसांचा अपमान करणें हें त्यांचा वध करण्यासारखेंच आहे. 'गुरूणामवमानो हि वध इत्यभिधीयते'; तेव्हां तूं धर्मराजाला टाकून बोल, म्हणजे प्रतिज्ञेंतून मुक्त होशील व भ्रातृवधाचें पातकही तुला लागणार नाहीं." मुलांनो, हा लहानसा प्रसंग काय सांगतो तें तुमच्या लक्षांत आलेंच असलें पाहिजे. वडील माणसांचा अपमान करणें हें त्यांची हत्या करण्याइतकें घोर कर्म आहे!

वडील माणसांशीं जसें आदरानें वागलें पाहिजे तसेंच इतर लोकांशींहि प्रेमानें वागावें. रस्त्यानें जात असतांना कोणी कांहीं

विचारल्यास क्षणभर उभें राहून सरळ उत्तर द्यावें. आपणाला कोणी उर्मटपणानें उत्तर दिलें तर जसें वाईट वाटतें तसें आपण दुसऱ्यास दिलें तर त्यास वाटणार नाहीं का? शक्य तितकें करून कधींहि कोणालाहि लागेल असें बोलूं नये. गोड बोलण्यानें आपलें काम पुष्कळ वेळां सोपें होतें. ज्यांना टाकून बोलण्याची संवय असते त्यांचा लोक तिटकारा करितात.

गोड बोलावें ह्याचा अर्थ सत्य सोडून गोड बोलावें असा मात्र मुळींच नाहीं. सत्य कटु असल्यास मधुर भाषणानें त्याचा कडूपणा कमी करण्याचा प्रयत्न करावा. कुशल वैद्य ज्याप्रमाणें गुणकारी औषध कडू असलें तरी तें रोग्याला देतोच; फक्त तें घेण्याला फार त्रास पडूं नये, किंवा घेतल्यावर ओकून पडूं नये म्हणून साखरेंत घोळून देतो. एका सुभाषितांत कसें बोलावें हें फार मार्मिकपणें सांगितलें आहे.

**सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।**
**प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥**

म्हणजे सत्य बोलावें, तें दुसऱ्याला आवडेल अशा रीतीनें बोलावें; दुसऱ्याला आवडणार नाहीं असें सत्य असलें तरी बोलूं नये. असा हा सर्वकाळीं उपयोगी पडण्यासारखा नियम आहे.

हा नियम सामान्य व्यवहारांत फारच उत्तम मार्गदर्शक आहे. परंतु आईबाप व गुरु ह्यांचे संबंध अशा प्रकारचे असतात कीं, त्यांना मुलांचें कल्याण व्हावें म्हणून कधीं कधीं अप्रिय भाषण करणें भाग पडतें. ते तसें न बोलतील तर मुलांचें कल्याण होणार नाहीं. कारण जगन्नाथ पंडितांनीं म्हटलें आहे:—

**गीर्भिर्गुरूणां परुषाक्षराभिस्तिरस्कृता यान्ति नरा महत्त्वं ।**
**अलब्धशाणोत्कषणा नृपाणां न जातु मौलौ मणयो वसन्ति ॥**


म्हणजे, "हिरा ज्याप्रमाणें घांसून काढल्याशिवाय राजाच्या मुकुटावर धारण करण्यास योग्य होत नाहीं, त्याचप्रमाणें वडील माणसांच्या कठोर बोलांनीं शहाणे झाल्याशिवाय पुरुष उच्च पदाला चढत नाहींत." आईबाप व गुरु ह्यांना आपलें कर्तव्य बजावण्याकरितां म्हणजे मुलें दुर्मार्गाकडे जाऊं नयेत म्हणून नाइलाजानें क्वचित् प्रसंगीं कडू बोलावें लागतें.

कांहीं माणसांना दुसऱ्याला लागेल अशा रीतीनें तोडून बोलण्याची फार वाईट संवय असते. अशा माणसाच्या हाताखालीं काम करण्यास कोणीहि स्वाभिमानी माणूस राजी नसतें. शिक्षकांना अशी संवय असल्यास, मुलांना त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाहीं व अशा शिक्षकांच्या हाताखालीं शिकण्यास, मुलें फार नाखूष असतात. अशा तोडून बोलणाऱ्या माणसांत पुष्कळ वेळां आणखी एक मोठा दोष असतो. त्यांना वाटतें कीं, आपण फार निःस्पृह भाषण करणारे आहोंत; व सौम्यपणें बोलणारे जे लोक, त्यांना हे लबाड समजतात. पण अशा लोकांची परीक्षा करण्यास वेळ लागत नाहीं. ह्यांना कोणी सडेतोड उत्तर दिलें कीं, हे लगेच संतापतात व आपलें मनोदौर्बल्य प्रगट करितात. खासा निःस्पृहपणा!

गोड बोलणें हें सौजन्याचें एक निदर्शक आहे. अन्तःकरण प्रेममय असलें म्हणजे त्यांतून प्रेमळ शब्दच बाहेर पडतात. पण ह्याशिवाय खरें सौजन्य उपकृतीनेंहि व्यक्त झालें पाहिजे. उपकृतीवांचून जें गोड बोलणें ती लबाडी आहे असें समजावें. वर भर्तृहरीनें सौजन्याला सर्व गुणांत जें प्रमुख स्थान दिलें आहे तें योग्य

ठरण्यास सौजन्याचा उगम अन्तःकरणांत होऊन तें सत्कृति व मधुर भाषण ह्यांच्या रूपानें बाहेर पडलें पाहिजे.

दरिद्री व दुःखी प्राण्यांना पाहून ज्यांचें अन्तःकरण द्रवतें व जे नुसतें गोड बोलून स्वस्थ बसत नाहींत तर स्वसुखाचा त्याग करूनहि दुःखितांचा दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न करितात तेच खरे सुजन. नुसतें गोड बोलणें हें सौजन्याचें खरें लक्षण नव्हे. स्वार्थसाधु लोक आपलें काम साधण्याकरितां गोड बोलतात; परंतु झीज सोसण्याची वेळ आली कीं, लगेच माघार घेतात. खरे सुजन कोण व नुसतें गोड-बोल्ये कोण हें आपण नीट ओळखलें पाहिजे.



## : २६ : झोंप

'भुकेला कोंडा व निजेला धोंडा' अशी ज्याची स्थिति असेल तो खरोखरीच सुखी होय. परंतु हें भाग्य फारच थोडक्यांस लाभतें; कारण झोंप स्वस्थ लागणें हें नुसतें शरीरस्वास्थ्या-वर अवलंबून नसून त्यास मनःस्वास्थ्याची जास्त आवश्यकता असते. दुराचारी, खुनी माणसास स्वस्थ झोप केव्हांहि लागणार नाहीं. प्रेमळ, शान्त, विचारी व निष्पाप माणसांकरितांच हें सुख परमेश्वरानें राखून ठेविलें आहे. दुसऱ्याचा खून करणारा मनुष्य न कळत स्वतःच्या झोंपेचाहि खून करीत असतो.

एक रात्र झोंप लागली नाहीं तर दुसऱ्या दिवशीं वेड्यासारखें होतें. कोणत्याच कामांत लक्ष लागत नाहीं, कांहीं केल्या चैन पडत नाहीं. झोंप न लागणें ही निसर्गाची पापी माणसांकरितां योजलेली जबर शिक्षा आहे. संशयित माणसांकडून अपरांधाची कबुली मिळविण्या-करितां पोलिस अधिकारीहि निसर्गाच्या ह्याच शिक्षेचा विशेष प्रसंगीं उपयोग करितात. इतकी ती कडक आहे.

निष्पापवृत्ति व झोंप यांचा अन्योन्य संबंध लक्षांत घ्यावयाचा असल्यास लहान मुलांकडे पहा. अगदीं थोडीं रोगी मुलें सोडलीं तर मुलांना किती गाढ झोंप लागते ! भूक लागल्याशिवाय किंवा शरिराला इजा पोंचल्याशिवाय तीं जागीं होत नाहींत. सामान्य हालचालीला तीं बिलकूल दाद देत नाहींत. त्यांना स्वप्नें सहसा पडतच

नाहींत. सकाळीं उठल्याबरोबर उल्लसित वृत्तीनें खेळूं लागतात; व सर्व दिवस क्षणभर निश्चल बसत नाहींत.

ज्यांना झोंप गाढ लागते अशीं माणसें सर्व दिवसभर सुखानें काम करूं शकतात. पण कांहीं कारणानें पुरेशी झोंप न मिळाल्यास त्यांचा काम करण्याचा उत्साह लगेच कमी होतो. परलोकवासी सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपल्या आठवणींत लिहून ठेविलें आहे कीं, नियमित व्यायाम व भरपूर आठ तास झोंप या दोन गोष्टींमुळें त्यांचा उत्साह वृद्धपणींहि चांगला टिकला.

झोंप घेण्याची स्वाभाविक वेळ रात्र होय. त्यांतहि रात्रीच्या पूर्वभागांतील झोंप विशेष आरोग्यावह होते. म्हणजे रात्रीं लवकर निजून, पहाटे उठणें आरोग्याच्या दृष्टीनें हितकर आहे. ' लवकर निजे, लवकर उठे। त्यासि आरोग्य-विद्या-धन भेटे ' हें वचन अनुभवसिद्ध आहे.

पहाटेची वेळ कोणतेंहि काम करण्यास फार चांगली. पहाटे व्यायाम घेतल्यास चांगला मानवतो. पठन व मनन करण्यास ही वेळ फारच अनुकूल आढळून येते; म्हणून प्राचीनकाळीं अध्ययन व अध्यापन करणारे द्विज नियमानें पहाटे उठत. मुखमार्जन व स्नान करून परमेश्वराची प्रार्थना करीत व नंतर अध्ययनास सुरवात करीत.

झोंप पुरेशी न मिळाल्यास जसें आरोग्य बिघडतें, त्याप्रमाणें जरूरीपेक्षां जास्त झोंप घेतल्यास सुस्ती येते. सुस्तीमुळें मेद वाढतो व मेद वाढला कीं, उत्साह अथवा धमक कमी होते. उजाडलें तरी निजून राहणारीं सूर्यवंशी माणसें व दिवसा झोंप घेणारीं माणसें आळशी बनतात.

पशुपक्ष्यांकडे पाहून निसर्गाचा काय बोध आहे, तो लक्षांत घेऊं

या. पहाट होतांच पक्ष्यांची किलबिल सुरू होते व सूर्योदयापूर्वींच ते आपापल्या उद्योगास लागतात. पशुहि लवकर उठून भक्ष्य-शोधार्थ हिंडूं लागतात. तुम्हांस पहाटे उठण्यापासून किती उत्साह व आनंद वाटतो हें अनुभवावांचून कळणार नाहीं. एक महिनाभर पहाटे नियमानें उठून मानवेल तो व्यायाम घ्या व तुमच्या उत्साहांत किती फरक पडतो तो पहा! पहाटेची वेळच अशी विलक्षण आहे कीं, ती सर्व प्राणिमात्रांस जीवन देते; म्हणूनच वैद्य-शास्त्रांत ऋषींनीं असा उपदेश केला आहे कीं, आजारी माणसें सोडून बाकीच्यांनीं पहाटे उठावें म्हणजे त्यांच्या आरोग्याचें रक्षण होईल. 'ब्राह्मे मुहूर्ते उत्तिष्ठेत् स्वस्थो रक्षार्थमायुषः।'

रोगी व दुःखशोकार्त ह्यांना झोंपेसारखें औषध नाहीं. आजारी माणसांना गुण पडूं लागला म्हणजे झोंप वाढूं लागते. शोकहि झोंप लागल्यावर कमी होतो. दिवसा कांहीं तरी कुवार्ता ऐकून मनुष्यास वेड्यासारखें होतें; परंतु रात्रीं जरा झोंप लागली तर तें दुःख दुसरे दिवशीं हलकें होतें म्हणून अशा माणसांनीं येईल त्या-वेळीं रात्र-दिवस न मोजतां झोंप घ्यावी अशी वैद्यशास्त्राची अनुज्ञा आहे.

झोंपेनें मेंदू शान्त होऊन नवीन विचार करण्यास सामर्थ्य येतें. एका अर्थानें झोंप ही विचारांची जननी आहे. एखादा अवघड न सुटण्यासारखा प्रश्न उत्पन्न झाल्यास विशेष डोकेंफोड न करतां झोंप घ्या. उठल्यावर कित्येक वेळां त्या प्रश्नाचें उत्तर तुम्हांला सहजच सुचेल.

फाजील झोंप, कमी झोंप किंवा अस्वस्थ झोंप, शरीर किंवा मन यांचा बिघाड झाल्याचें दर्शविते. झोंप नीट येईनाशी झाली

म्हणजे कोठें बिघाड झाला आहे हें शोधूं लागावें, वैद्याचा सल्ला घ्यावा, चित्त शान्त राखावें म्हणजे पुन्हा शान्त झोंप लागेल. निद्रा ही धनाला किंवा रूपाला न भाळणारी गुणलुब्ध वधू आहे. ती सदाचारी पुरुषास स्वखुषीनें तत्काळ माळ घालते, परंतु दुर्गुणी पुरुषानें कितीहि विनवण्या केल्या तरी ती वश होत नाहीं.

## : २७ : संस्कृत भाषा

संस्कृत ही भाषा सर्व भाषांमध्यें जास्त प्राचीन असून ‘ ऋग्वेद ’ हा जगांतील उपलब्ध ग्रंथांत पहिला ग्रंथ होय. हा ग्रंथ लो. टिळकांच्या मताप्रमाणें इ. सनापूर्वी निदान ४५०० वर्षांच्या आधीं लिहिला गेला असावा. भारतीय आर्यलोक इतक्या प्राचीन काळीं ‘ ऋग्वेद ’ रचण्याइतके सुधारलेले होते.

मुलांनो, आपले पूर्वज बुद्धिमान्, साहसी व दीर्घोद्योगी होते. त्यांनीं संस्कृत भाषेमध्यें नानाविध विषयांवर उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले. मलाया, इंडोचायना, जावा, सुमात्रा, बाली, सिलोन, अफगाणिस्थान इत्यादि देशांत जाऊन राज्यें कमाविलीं. तेथील लोकांना आपला धर्म व संस्कृति यांचें ज्ञान दिलें व शेंकडों वर्षे त्या ठिकाणीं त्यांनीं राज्य केलें. आजहि वरील देशांत आर्यसंस्कृतीचे पुष्कळ अवशेष दिसून येतात. शिवाय ब्रम्हदेश, तिबेट, चीन व जपान या देशांतील संस्कृति बहुतांशीं भारतीयच आहे.

अगदीं प्राचीन कालापासून आपल्या पूर्वजांनीं खोल विचार करून तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिले. विचार करण्याकरितां ते घरदार सोडून अरण्यांत जाऊन रहात. ग्रंथ वाचीत, यात्रा म्हणून लांब-लांबचे प्रवास करीत, व आपापसांत चर्चा करीत. उपनिषदें हीं त्या प्रयत्नांचीं फलें होत.

सर्व उपनिषदें तत्त्वज्ञानपर असून हीं जीवात्मा, परमात्मा व

जगत् यांचें कोडें उकलण्याचे पहिले जोराचे प्रयत्न होत. ह्या ग्रंथांत तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांचीं उगमस्थानें आढळतात. उपनिषदांनंतर ब्रह्मसूत्रें व ब्रह्मसूत्रांनंतर गीता व निरनिराळ्या आचार्यांचीं भाष्यें लिहिलीं गेलीं. त्यांत श्रीशंकराचार्यांचें भाष्य विशेष प्रसिद्ध आहे. आर्यांचें तत्त्वज्ञान वाचून जर्मन पंडित मॅक्समुल्लर व पॉलडायसन् ह्यांनीं आपल्या पूर्वजांच्या बुद्धिमत्तेविषयीं प्रशंसोद्गार काढिले आहेत. हिंदुतत्त्वज्ञानांतील आत्म्याचें अमरत्व व सर्वभूतात्मभाव हे दोन सिद्धांत म्हणजे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतील ऋषींच्या दीर्घ प्रयत्नांचीं सुमधुर फलें होत. हीं उपनिषदें इ. स. पूर्व १२०० ते ६०० वर्षांचे दरम्यान लिहिलीं गेलीं असावींत असें तज्ज्ञांचें मत आहे. हे ग्रंथ वाचून जर्मन तत्त्वज्ञ शौपेनहोर ह्यानें जे प्रशंसोद्गार काढले ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत, 'हे उपनिषिदांनो, तुमच्या वाचनानें माझ्या आयुष्यांत मला खरीखुरी शांति लाभली आहे व मृत्युसमयींहि ती तशीच लाभेल ह्याविषयीं मला संदेह वाटत नाहीं.'

भाषेला व्यवस्थितपणा येण्याकरितां व्याकरणाची फार आवश्यकता असते. इ. स. पूर्वी ८०० वर्षांच्या सुमारास उपलब्ध असलेल्या ग्रंथांचा अभ्यास करून महर्षि पाणिनींनीं संस्कृत भाषेच्या व्याकरणावर अष्टाध्यायी नांवाचा ग्रंथ लिहिला. ह्यांत सूत्रमय भाषेंत म्हणजे अगदीं थोडक्या शब्दांत त्या कालच्या संस्कृत—भाषेचें समग्र व्याकरण सांगितलें आहे. हा ग्रंथ म्हणजे सूक्ष्म बुद्धिमत्तेचें व रचनाकौशल्याचें जगांतील एक नवलच होय. त्यानंतर ह्या ग्रंथावर विस्तृत टीका लिहून व नवीन माहितीची भर घालून पतञ्जलींनीं आपलें 'महाभाष्य' लिहिलें. अष्टाध्यायी व कात्यायनांचीं वार्तिकें मिळून संस्कृतभाषेचें समग्र व्याकरण होतें. ह्यांच्या

स्पष्टीकरणार्थ अनेक विद्वानांनीं ग्रंथ लिहिले. त्या टीकाग्रंथांमध्यें भट्टोजी दीक्षितांची 'कौमुदी' सर्वत्र प्रसिद्ध आहे.

आपल्या पूर्वजांनीं गणित व त्यावर अवलंबून असणारें ज्योतिःशास्त्र यांतही चांगली प्रगति केली होती. वराहमिहिर व भास्कराचार्य यांचे शोध अर्वाचीन शोधांशीं जमते आहेत. अंक-गणित, बीजगणित व भूमिति हीं मूळ भारतीय शास्त्रें असून पुढें तीं इ० स० च्या आठव्या शतकांत अरबस्थानांत व तेथून युरोपांत गेलीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. इ० सनापूर्वीं आजच्या सारखीं संशोधनांचीं साधनें नसतांनाहि गणित व ज्योतिःशास्त्र ह्यांत आर्यांनीं महत्त्वाचे सिद्धांत स्थापित केले होते. कोपरनिकसानें सूर्यमालेचा शोध लाविला, त्याच्या पूर्वीं ७०० वर्षे, पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते असा शोध भारतीय आर्यांनीं लाविला होता.

वैद्यकांतहि आर्यांनीं बहुमोल शोध लाविले होते. चरक व सुश्रुत या प्राचीन ग्रंथांत औषधी-विज्ञान व शस्त्रक्रिया यांची उपयुक्त माहिती मिळते. वैद्यकाचें अंग म्हणून रसायनशास्त्रांतहि आर्यांनीं बरीच खटपट करून शोध लाविले होते. कृषि व वनस्पतिशास्त्रां-चाही त्यांनीं अभ्यास केला होता. आर्यवैद्यकांतील प्राचीन चिकित्सा वनस्पति-ज्ञानावरच आधारलेली आहे.

आज ज्या शास्त्रांच्या प्रगतीमुळें युरोपमधील देशांची भरभराट झाली आहे, तीं भौतिक-शास्त्रें होत. कित्येकांची अशी समजूत आहे कीं, तत्त्वज्ञानाच्या मागें लागून आर्यांनीं भौतिक-शास्त्रांकडे दुर्लक्ष केलें, पण ही समजूत चुकीची आहे. आर्यांनीं भौतिक-शास्त्रांकडेहि दुर्लक्ष केलें नव्हतें हें अनेक गोष्टींवरून सिद्ध करतां येईल. युरोपखंडांतील लोक कातडीं पांघरीत होते त्या वेळीं भारत-

वर्षांत तलम कापड तयार होत असे. शिकंदर बादशहा हिंदुस्थानावर चाल करून आला त्या वेळीं भारतवर्षांत बंदुका व तोफा यांचा उपयोग चांगला माहीत होता. फार प्राचीनकाळापासून आर्यांना नौकानयनशास्त्र अवगत होतें, व परदेशीं जाऊन ते आपल्या धर्माचा व सत्तेचा विस्तार करीत. ह्या व इतर गोष्टी भौतिकशास्त्राच्या ज्ञानाविना होऊं शकतील का ?

वेदांच्या खालोखाल ज्यांना आपण महत्त्व देतों ते ग्रंथ म्हणजे वाल्मीकींचें रामायण व व्यासाचें महाभारत हे होत. हे विशाल ग्रंथ असून ह्यांत काव्य तर आहेच, पण त्याशिवाय अनेक उद्बोधक कथा असून त्यांच्या द्वारें विविध विषयांची माहिती आली आहे. रामचरित्र उदात्तता शिकवितें तर महाभारत जगांतल्या व्यवहाराचें व मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म अवलोकन करून व्यवहार–चातुर्य व धर्म यांची सांगड कशी घालावी हें सांगतें. ह्या दोन प्राचीन ग्रंथांवर पुष्कळसें संस्कृत व देशी भाषांतील वाङ्मय आधारलें आहे. म्हणून ह्या ग्रंथांची राष्ट्रीय ग्रंथांत गणना केली पाहिजे. रामायण व महाभारत यांची योग्यता इतकी मोठी आहे कीं, रामायणाला आदिकाव्य व महाभारताला पांचवा वेद असें आपण मानतों.

साहित्यशास्त्रांत आपल्या पूर्वजांनीं उत्तमोत्तम ग्रंथ निर्माण केले. साहित्याचीं उपांगें–गायन, वादन, आणि नर्तन ह्यांना आज जें हीनत्व प्राप्त झालें आहे तसें प्राचीनकालीं नव्हतें. या कलांचा कुलिन स्त्रिया व पुरुष अभ्यास करीत असत. फार काय, पण जीवनोपयोगी जें पाकशास्त्र तें आज आपण उपेक्षणीय समजतों. पण पूर्वी त्यांत बुद्धिमान माणसें लक्ष घालीत असत. नलराजा व भीम ह्या शास्त्रांत

प्रवीण होते असें महाभारतांत वर्णन आहे. आज मात्र आचारी व त्यांची विद्या यांना आपण फार हलकें लेखतों.

साहित्य-क्षेत्रांत भास, कालिदास, भवभूति, शूद्रक व विशाखदत्त ह्यांनीं उत्तम नाटकें लिहिलीं आहेत. कालिदासाचें शाकुंतल, भवभूतीचें उत्तररामचरित व शूद्रकाचें मृच्छकटिक हीं जगांतील कोणत्याही उत्कृष्ट नाटकाची बरोबरी करूं शकतील. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षसांत राज-नीतींतील कुशल डावपेंचांचें मार्मिक दिग्दर्शन केलें आहे. काव्यक्षेत्रांत कालिदासाचें रघुवंश व मेघदूत व भारवीचें किरातार्जुनीय व माघाचें शिशुपालवध हीं उच्च दर्जाचीं काव्यें होत. चाणक्य, भर्तृहरि व जगन्नाथ पंडित यांनीं सामान्य नीतीवर उत्कृष्ट पद्यें लिहिलीं आहेत. अलंकार-शास्त्रावर अनेक ग्रंथ असून त्यांत मम्मटाचा काव्यप्रकाश व जगन्नाथ पंडिताचा रसगंगाधर ह्या ग्रंथांत विशेष प्रकारचें पांडित्य व सूक्ष्मबुद्धि प्रत्ययास येतात.


सामान्य लोक व बाल यांना मोठीं प्रमेयें समजण्यास कठीण जातात म्हणून तीं सुलभ करण्याकरितां गोष्ठी सांगण्याची पद्धत फार प्राचीनकालापासून उपनिषदें व आरण्यकें या ग्रंथांत ऋषींनीं अवलंबिली होती. तीच पुढच्या काळांत पंचतंत्र, हितोपदेश, व कथासरित्सागर ह्या ग्रंथांत स्वीकारली गेली. युरोपियन भाषांत इसापच्या गोष्टींना मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. पण आपल्या पूर्वजांनीं त्याच्याहि पूर्वीं वाङ्मयाच्या ह्या प्रकाराचें महत्त्व ओळखलें होतें. पंचतंत्र—हितोपदेशांतील कथा इसापच्या गोष्टीइतक्याच चमत्कारपूर्ण व उद्बोधक आहेत. भगवान् बुद्ध गोष्ठी सांगून सामान्य जनानांहि गहन तत्त्वें पटवून देत असत. बुद्धधर्मग्रंथांत जातकग्रंथ अशा उपदेशपर गोष्ठींकरितां प्रसिद्ध आहेत.

मुलांनो, आपल्या बुद्धिमान् पूर्वजांनीं ज्ञान मिळविण्याकरितां अविश्रांत श्रम करून मिळालेलें ज्ञान ग्रंथरूपानें आपणांकरितां जतन करून ठेविलें आहे. तें समजून घेऊन आपण त्यांत भर घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसा प्रयत्न आपल्या देशांत मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊं लागल्यापासून गेल्या कित्येक शतकांत केला गेला नाहीं. म्हणून युरोपांतील लोक शास्त्रांत आपल्या पुढें गेले. आपल्या ऋषींनीं जे शोध लावले ते त्या काळाकडे लक्ष दिलें तर खरोखर कौतुकास्पद होते. आपण मात्र त्यांचे वंशज त्यांना शोभत नाहीं. तुम्ही हा काळिमा धुवून काढला पाहिजे.

हिंदु-संस्कृतीचें मूळ संस्कृत ग्रंथांत आहे. तेथेंच तिचा बराचसा विकासहि झाला आहे. शिवाय संस्कृत भाषेपासून बहुतेक सर्व देशी भाषांच्या उद्गम झाला असून त्यांना पुष्कळ वेळां संस्कृत भाषेची मदत घ्यावी लागते. संस्कृत भाषेची लिपि, त्यांतील समासांची योजना व उच्चारानुसारी लेखन-पद्धति यांचा देशी भाषांनीं स्वीकार केला असून त्या भाषांना नवीन शब्दयोजना करतांना संस्कृत भाषेचें फार मोठें साहाय्य होतें. तुम्हांला मराठीचा चांगला अभ्यास करण्याकरितां देखील संस्कृत-भाषेचें सामान्य ज्ञान अवश्य करून घेतलें पाहिजे.

अलीकडे महाराष्ट्रांत, भांडारकर, शंकर बाळकृष्ण दीक्षित, टिळक, चिंतामणराव वैद्य वगैरे आधुनिक विद्वानांनीं संस्कृत भाषेचा दीर्घ व्यासंग करून तींतील ज्ञानसंपत्ति किती विविध प्रकारची आहे हें वाचकांच्या नजरेस आणून दिलें आहे. तुमचें काम संस्कृत भाषेचें अध्ययन काळजीपूर्वक करून आपली उज्ज्वल परंपरा समजून घ्यावयाची तर आहेच ; पण तेवढ्यानें भागणार नाहीं. तुमच्यांपैकीं

ज्यांना बुद्धीची अनुकूलता असेल त्यांनीं अर्वाचीन शास्त्रें अभ्यासून आपल्या जुन्या परंपरेंत भर घालून पाश्चात्य पंडितांची बरोबरी केली पाहिजे. एक वेळ आपले पूर्वज आधिभौतिक व आध्यात्मिक विद्येंत इतर सुधारलेल्या देशांतील पंडितांच्या पुढें होते, हें विसरूं नका. ज्ञानोपासनेंत हिंदुस्थान ऋषिकालाप्रमाणें इतर देशांचे पुढें गेला पाहिजे.



## : २८ : दुराग्रह सोडा !

मुलांनो, तुम्हीं सर्वजण ज्ञान मिळविण्याकरितां झटत आहांत हें पाहून कोणाला बरें आनंद होणार नाहीं ? प्राचीन कालीं ह्या आर्यावर्तांत जसे ज्ञानी पुरुष व विदुषी स्त्रिया झाल्या व त्यांनीं आपलें नांव या भारत भूमीच्या इतिहासांत अजरामर करून ठेविलें, त्याचप्रमाणें तुम्हीहि ह्या कालीं ज्ञान संपादन करून ह्या भारतभूस अलंकृत कराल अशी मला आशा आहे.

ज्ञान संपादन करण्याकरितां वाचन, निरीक्षण, मनन, विद्वानांशीं संभाषण, देशपर्यटन इत्यादि गोष्टी आवश्यक असतात हें तुम्हांस ठाऊक आहेच. ह्यांविषयीं मी विशेष कांहीं आज सांगत नाहीं. पण ह्या-शिवाय एक गोष्ठ महत्त्वाची आहे ती सहसा पुष्कळ लोकांच्या लक्षांत येत नाहीं. मात्र ती गोष्ठ ह्या सर्व साधनांपेक्षां जास्त महत्त्वाची आहे. त्या गोष्ठीच्या अभावीं एकाद्या विवाद्य वस्तूच्या सत्यासत्यते-बद्दल तुम्हांला कधींहि अचूक निर्णय देतां येणार नाहीं.


एकदा दोन सरदार एका मोठ्या रस्त्यावर समोरासमोरून येत होते. ते एका चौकाजवळ आले. त्या चौकांत एका खांबावर एक मोठी ढाल बसविलेली होती. ते सरदार त्या ढालीजवळ आले. त्या ढालीकडे पाहून एक जण म्हणतो, “ ही ढाल किती सुंदर दिसते ! किती बावन्नकशी सोनें हें ! ही कोणाच्या विज-याचें चिन्ह म्हणून येथें बसविली आहे कोणास ठाऊक ? ” दुसरा

म्हणतो, "अहो राव, ही ढाल सोन्याची नाहीं! ही रुप्याची आहे. भर दिवसा येवढेंहि तुम्हांला दिसत नाहीं का?" झालें. एक म्हणतो सोन्याची! एक म्हणतो रुप्याची! प्रत्येकाला खात्री होती कीं, आपण म्हणतों तेंच बरोबर. एकमेकांची तोंडातोंडी होऊन दोघेहि रागावले व हातघाईवर आले, दोघांनींहि लढण्यास सुरवात केली. बराच वेळ लढून दोघेहि जखमी होउन त्या चौकांत निश्चेष्ट पडले. इतक्यांत एक संन्यासी त्या मार्गानें जात होता त्यानें त्यांची ती स्थिति पाहिली; त्याला दया आली. त्यानें त्यांच्या जखमा बांधल्या व मस्तकावर पाणी शिपडलें. थोड्याच वेळानें दोघेहि शुद्धीवर आले.

संन्याश्यानें त्यांना कोणी दुखापत केली तें विचारलें. तेव्हां आपल्या वादाचें कारण सांगून आपणच एकमेकांशीं कसे लढलों ती हकिगत त्यांनीं त्या संन्याशाला सांगितली. तो संन्यासी ढाली-जवळ गेला व त्यानें तिच्या दोन्ही बाजू पाहिल्या. एक बाजू होती रुप्याची व एक होती सोन्याची. तेव्हां त्याला हसूं कोसळलें व तो त्या सरदारांजवळ जाउन त्यांना म्हणाला; "बाबांनो, तुमचें दोघांचेंहि म्हणणें बरोबर आहे; पण दोघेही अविचारी आहांत. ही ढाल सोन्याची आहे व रुप्याची पण आहे. हिची एक बाजू सोन्याची आहे; तर—दुसरी बाजू रुप्याची आहे. तुम्ही प्रत्येकानें जर दोन्ही बाजू पाहाण्याची तसदी घेतली असतीत तर गोष्ट ह्या थरावर आली नसती. असो, झालें तें झालें. अतःपर तुम्ही असें करूं नका. दुसरा माणूस काय म्हणतो तें शांतपणें ऐकून घेऊन त्याचा आग्रह सोडून विचार करा. व नंतर तुमच्या बुद्धीला योग्य वाटेल तो निर्णय करा. आग्रहास किंवा हट्टास पेटून सत्यासत्याचा

निर्णय कधींहि होत नाहीं." हें संन्याशाचें बोलणें ऐकून ते दोघेहि सरदार खजिल झाले.

मुलांनो, मला जी गोष्ट तुम्हांला सांगावयाची होती ती तुमच्या लक्षांत आलीच असेल. ज्यांना ज्ञान पाहिजे असेल त्यांनीं आग्रह सोडला पाहिजे, चित्त शांत ठेविलें पाहिजे. प्रत्येक प्रश्नाचा त्यांनीं अनेक बाजूंनीं विचार केला पाहिजे. मोठमोठे लोकसुद्धां एकमेकांशीं जेव्हां भांडतात तेव्हां भांडणांचें मूळ बहुशः गैरसमजुतींत असतें असें तुम्हांला आढळून येईल. उत्तम पीक येण्याकरितां जशी जमीन नांगरलेली मऊ असावी लागते, खडकावर जसें धान्य नीट उगवत नाहीं, त्याचप्रमाणें ज्ञानाचीहि स्थिति आहे. त्याची आग्रही मनांत चांगली वाढ होत नाहीं. त्याला मनःसमता अथवा समतोल बुद्धि हीच अनुकूल भूमि पाहिजे.



## : २९ : साधुपुरुष कसे ओळखावेत ?

मित्रांनो, आपल्या ह्या देशांत साधूंचीं सोंगें घेऊन भोळ्या लोकांना फसविणाऱ्या भोंदूंचा फारच सुळसुळाट झाला आहे. अशा लोकांच्या जाळ्यांत सांपडून कित्येक लोक पारमार्थिक हित तर राहू द्याच, परंतु ऐहिक सुखालासुद्धां आंचवले आहेत. ह्या ढोंगी, आपमतलबी लोकांमुळें आपल्या देशाचें अपरिमित नुकसान झालें आहे व अजूनहि होत आहे, अशा स्थितींत खरे साधु अथवा सत्पुरुष कसे ओळखावेत हें समजणें अत्यंत अगत्याचें आहे.

भगवीं वस्त्रें, लांब लांब जटा, टिळेमाळा, व मायावी गोड गोड भाषणें ह्यानीं फसून जाऊं नका. साधुत्वाचा आव आणून भोळ्या लोकांना फसविण्याचें आणखी एक साधन आहे तें म्हणजे चमत्कार करून दाखविणें हें होय. एक तर हे चमत्कार म्हणजे जादुगाराप्रमाणें हातचलाखीचा खेळ असतो; किंवा कुडबुड्या जोश्याच्या भविष्याप्रमाणें काकतालीय न्यायानें शेंकडा दहापांच वेळां खरीं ठरणारीं भविष्यें असतात.

" तर मग खरे साधु जगांत नाहींतच कीं काय ? असल्यास ते कसे ओळखावेत ते आतां सांगा " असा साहजिकच तुम्ही प्रश्न विचाराल. तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्याचाच मी आतां प्रयत्न करणार आहें.

सत्पुरुष ह्या जगांत खास होते व आहेत. ते झाले नसते तर आज जगांत आहे त्यापेक्षां किती तरी जास्त अज्ञान व दुःख आपल्या

वाट्याला आलें असतें. सत्पुरुष सध्यांहि आहेत. म्हणूनच आपल्याला चांगले दिवस येण्याची आशा आहे. फक्त सामान्य लोक ज्यांना सत्पुरुष समजतात ते सत्पुरुष असतीलच असा नियम नाहीं. कारण सत्पुरुष ओळखण्याच्या खुणा बाह्य नसून आंतर आहेत. साधु व भोंदु ह्यांतील फरक समजण्यास बरेंच सूक्ष्म अवलोकन करावें लागतें. 'साधूची ते खूण साधू जाणे' ह्या न्यायानें सर्वांच्या कसोटीला उतरलेले असे सत्पुरुष साधूचीं कोणतीं लक्षणें सांगतात तें पाहूं या. भगवद्भक्त तुकाराम महाराज यांनीं साधूचें लक्षण एका अभंगांत स्पष्टपणें सांगितलें आहे. ते म्हणतात :—

**जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥**

दुःखितांचें दुःख तेंच आपलें दुःख समजून तें हलकें करण्याचा कसून प्रयत्न करतो तोच साधुपुरुष ! तो परमेश्वरच आहे असें समजावें !

दुसऱ्याचें दुःख पाहून थोर पुरुष स्वतःचें दुःख विसरून जातात, उपभोगाचीं अनेक साधनें अनुकूल असतांना सुद्धां त्यांत त्यांना सुख वाटत नाहीं. आपल्या हातून दुसऱ्याचें दुःख हलकें झालें तर त्यांत त्यांना सुख होतें. आपलें ऐश्वर्य परहित साधण्याच्या आड येत आहे असें त्यांना आढळून आल्यास ते आपल्या ऐश्वर्याचा त्याग करण्यास मागें पुढें पाहात नाहींत. चंदनाप्रमाणें दुसऱ्याकरितां झिजणें हा त्यांचा स्वभावच असतो.

श्रीरामचंद्र, भगवान् बुद्ध, रामदास, तुकारामादि भक्त व हल्लींचे महात्मा गांधी हीं ह्या कोटींतील ठळक उदाहरणें होत. श्रीरामचंद्र नीतिमान् पितृभक्त, मातृवत्सल, एकपत्नीक, मित्रकार्यतत्पर असे

होते हें सर्वांना माहीतच आहे. पण ह्या सर्व गुणापेक्षां त्यांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे लोकहिताविषयींची त्यांची कळकळ हा होय. ‘ लोकाराधनेकरितां मी प्रेम, दया, सौख्य इतकेंच काय पण जानकीचा सुद्धां त्याग करीन ’ असा जो त्यांनीं वसिष्ठ गुरूंना निरोप पाठविला त्यांत त्यांच्या वागणुकीचें सर्व रहस्य भरलेलें आहे.

भगवान् बुद्ध राजपुत्र होते. त्यांना सर्व प्रकारचीं सुखें अनूकूल होतीं. ते विवाहपाशांत बद्ध झालेले होते. परंतु जगांतील नश्वरता व दुःख पाहून त्यांचें अंतःकरण कळवळलें, त्यांनीं ऐश्वर्याला लाथ मारिली मोठ्या कष्टानें कौटुंबिक पाशहि तोडले. तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. आणि अवशिष्ट आयुष्य लोकांना सन्मार्गाचा उपदेश करण्यांत व जनसेवा करण्यांत घालविलें. समाजसेवा हा परमेश्वरप्राप्तीचा श्रेष्ठ मार्ग आहे असें त्यांनीं आपल्या कृतींनीं लोकांना शिकविलें.

छत्रपति श्रीशिवाजी महाराज यांनीं हिंदूंची मुसलमानांच्या धार्मिक छळापासून मुक्तता केली. राज्य मिळविलें; पण त्याचा लोभ न धरितां प्रजेच्या सुखाकडे नजर ठेविली. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांशीं सलोख्याचें वर्तन ठेविलें.

रामदास–तुकारामसारख्या साधूंनीं वाटेल तसले अपमान व छळ सोसले. लोकांना खऱ्या धर्माचें ज्ञान करून दिलें. स्वतःच्या प्रेमळ वर्तनानें जनतेला सर्वांशीं समबुद्धीनें वागण्यास शिकविलें.

म० गांधींचें लक्ष मुख्यत्वेंकरून समाजांतील अत्यंत दरिद्री व दुःखी लोकांकडे अधिक असतें हें आपणांस दिसतच आहे. अस्पृश्योद्धाराकरितां त्यांचें अंतःकरण किती तळमळतें हें कोणालाहि सांगण्याची जरूरी नाहीं.

रोगी, दुःखी, कष्टी, समाजानें तिरस्कृत केलेले अशा लोकांकडे साधूंचें लक्ष विशेष जातें. बरोबरच आहे; आईचें मन जसें कमकुवत लुल्यापांगळ्या मुलाकडे प्रथम धांव घेतें त्याचप्रमाणें थोर लोकांचीहि स्थिति असते. अथवा असें मन ज्यांचें असेल तेच खरे थोर !

मित्रांनो, वरील विवेचनावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल कीं, दुसऱ्याचें दुःख हलकें करण्याकरितां तळमळ, व दुसऱ्याचें सुख तेंच आपलें सुख समजणें हें सत्पुरुषाचें प्रमुख लक्षण होय. भगवद्गीतेंत ‘ सर्व-भूत-हिते रतः ’ असें अशा थोर पुरुषांचें वर्णन केलें आहे. असे पुरुष लोककल्याण साधण्याकरितां वेळीं आपला देहहि खर्ची घालण्यास कचरत नाहींत. दुसऱ्याचें सुखदुःख तें आपलें सुखदुःख वाटणें हें थोर मनाचें लक्षण आहे. ह्यासच आपल्या तत्त्वज्ञानांत ‘ सर्वभूतात्मभाव ’ असें म्हणतात. आणि हा भाव ज्यांच्या अंतःकरणांत उदित झाला व ठरला त्यांसच श्रेष्ठ पुरुष, अथवा ज्ञानी पुरुष अथवा साधुपुरुष असें म्हणतात.

हा सर्वभूतात्मभाव कसा उत्पन्न होत असेल ह्याची थोडीशी कल्पना देतां येईल. आई आपल्या मुलांवर उत्कट प्रेम करते. तिच्या ठिकाणीं आपल्या मुलांपुरता हा आत्मभाव वसत असतो. आपल्या मुलांचा जीव वांचविण्याकरितां ती स्वतःचा जीव खर्ची घालण्यास तयार असते. थोर पुरुष सर्व भूतांच्या ठिकाणीं ( विशेषेंकरून रंजलेगांजलेल्यांच्या ठिकाणीं, तितकेंच) उत्कट प्रेम करितात. म्हणून त्यांच्या ठिकाणीं हा सर्वभूतात्मभाव दिसून येतो. वृत्र प्रबळ होऊन देवांचा व ऋषींचा छळ करूं लागला. तो कांहीं केल्या इंद्राला आवरेना. तेव्हां देवांसहित इंद्र श्रीविष्णूकडे गेला.

श्रीविष्णूंनीं सांगितलें कीं दधीचि ऋषींच्या हाडांचें वज्र तयार करून वृत्रावर टाकल्यास तो खास मरेल. इंद्रादि देव दधीचि ऋषीकडे गेले. ऋषींनीं आनंदानें देहत्याग केला. व देवाचें काम केलें.

तात्पर्य, पोषाखांत साधुत्व वसत नसतें. साधुपुरुषाचे ठिकाणीं दया व दाक्षिण्य उत्कटत्वानें आढळून येतात. तो समाजाचें हित तें आपलें हित मानतो; व तें साधण्याकरितां स्वहिताचा आनंदानें त्याग करतो. भूतानुकंपा व स्वार्थनिरपेक्षता हीं साधुत्वाचीं खरीं लक्षणें होत.

## : ३० : एक अर्वाचीन संत

भारतीय महिला विद्यापीठाचे संस्थापक प्रो. धोंडो केशव कर्वे यांना मी महाराष्ट्रांतील अर्वाचीन संत समजतों. माझें हें वर्णन वाचून पुष्कळांना विस्मय वाटेल व रागहि येईल; कारण अण्णा लौकिकार्थानें धार्मिक नाहींत; उलट ते सुधारक आहेत. ते तर्कगामी ( Rationalist ) आहेत. आमच्या ( हिंदूंच्या ) कित्येक जुलमी रुढींमुळें त्यांच्या मनांत सात्त्विक संताप उत्पन्न झाल्यामुळें, त्यांनीं विवेकानंद-रामतीर्थ-टिळकांप्रमाणें आर्य-धर्माचा आपुलकीनें अभ्यास केलेला नाहीं. हें जरी खरें, तरी मी त्यांची संत-मालिकेंतच गणना करितों. "दया धर्मका मूल है" ह्या संत वचनानुसार त्यांची वागणूक असते. हिंदु स्त्रियांचें व त्यांतल्या त्यांत विधवांचें जीवित परावलंबी, दुःखमय व निराशामय झालेलें पाहून, अण्णांच्या अन्तःकरणांत कालवाकालव सुरू झाली. व त्यांनीं आपलें आयुष्य, त्यांचें दुःख हलकें करण्याच्या कार्यास वाहिलें. पंचवीस वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत विधवांची जी स्थिति होती तिच्यापेक्षां आज ती बरीच सुधारली आहे. या श्रेयाचा बराचसा मोठा वांटा अण्णांच्या परिश्रमांना दिला पाहिजे. अण्णांनीं अलीकडे खेड्यांतील शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला आहे. त्यावरून त्यांची दृष्टि नेहमीं रंजल्या-गांजल्याकडे कशी धांव घेते हें स्पष्ट दिसून येईल; म्हणून मी त्यांची 'साधूंत' गणना करतों.

साधुत्वाचें आणखी एक विशेष लक्षण अण्णांच्या ठिकाणीं आढळून येतें. ते स्वार्थनिरपेक्ष आहेत. स्वतःकरितां किंवा कुटुंबाकरितां कोणाजवळ कांहीं मागणार नाहींत. त्यांची राहणी साधी व संयम जबर असल्यामुळें त्यांना कशाचीच ददात भासत नाहीं. त्यांच्या कष्टाळू वृत्तीमुळें त्यांना खर्च कमी लागून, शिवाय त्यांचें शरीर निरोगी राहिलें आहे. संस्थेकरितां याचना करणेसुद्धां त्यांच्या जिवावर येतें. पण नाइलाजानें त्यांना तसें करावें लागतें. स्वार्थाची पूर्णाहुति देऊन खरेखुरे संन्यासी बनलेले महात्मा गांधी हरिजनांचे मदतीकरितां बडे भिकारी नाहीं का झाले? भारतभूषण पण्डित मालवीयजींनीं हिंदुविश्वविद्यालयाकरितां अखिल आर्यभूची भिक्षुकी नाहीं का पत्करली?

अण्णांचें मन कुसुमकोमल आहे; तसेंच तें वज्रकठोरहि आहे. आपलें ध्येय निश्चित केल्यावर तें साधण्याकरितां अण्णांनीं लोकनिंदेची भीति बाळगली नाहीं; लौकिकाची पर्वा केली नाहीं; अविरत श्रम करण्यास ते डगमगले नाहींत. त्यांचें काम सामान्य लोकांना मदत करण्याचें, पण त्यांच्याच समजुतीच्या उलट जाणारें असल्यामुळें, त्यांना त्याच लोकांचे शिव्याशाप घ्यावे लागले. हे सर्व शिव्याशाप अण्णांनीं सामान्य जनतेवर चिडून न जातां उदार मनानें सहन केले व आपलें कार्य सतत पुढें चालविलें. आज त्यांच्याबद्दल जो सार्वत्रिक आदर दिसून येतो, त्याचें मुख्य कारण त्यांची ही सहिष्णु वृत्ति होय असें मला वाटतें. कांहीं लोकांत काम करण्याची धमक जरी असली, तरी ही सहिष्णु वृत्ति फार थोड्या लोकांत आढळून येते. काम करणाराला असें वाटतें कीं, मी जर चांगलें कार्य करतों तर लोकांनीं माझे उपकार मानावयाचे सोडून

ते मला शिव्या कां देतात? पण सामान्य लोक हे संकुचित विचाराचे असल्यामुळें एखादें कार्य जरी पवित्र असलें तरी आरंभीं त्यांना तें पटत नाहीं. तें त्यांना पटूं लागेपर्यंत कार्यकर्त्याला निंदा सहन करावी लागते, व ती त्यानें लोकांबद्दल प्रेम बाळगून सहन केली, तरच लोकांना त्याचें कार्य अधिक लवकर पटूं लागतें व त्यांचा विरोध तीव्र न होतां हळूहळू कमी होऊं लागतो.

अण्णांची सहिष्णुता फार श्रेष्ठ प्रतीची आहे. विरुद्ध मनाच्या माणसाबद्दलहि ते आदर बाळगतात. व म्हणूनच विरुद्ध मताचे लोकहि त्यांच्या कार्याबद्दल त्यांना योग्य मान देतात. कै. आगरकरांच्या आठवणी काढून 'सनातनी' मंडळीसुद्धां अश्रु ढाळतांना आम्ही पाहिली आहे. अण्णांनीं आगरकरांना गुरु केलें असण्याचा संभव आहे. एकदा डॉ. अप्पासाहेब परांजप्यांचे वडिलांजवळ बोलत असतां सहज अण्णांविषयीं बोलणें निघालें. अण्णा आप्पासाहेबांना मुंबईस घेऊन गेले, म्हणूनच त्यांचें पुढचें शिक्षण झालें व आजची स्थिति त्यांना लाभली वगैरे सांगून ते सहज म्हणाले, 'एक पुनर्विवाह सोडला तर आमच्या अण्णासारखा माणूस लाखांत मिळणार नाहीं!' अप्पासाहेबांचे वडील अगदीं जुन्या कल्पनांत वाढलेले पण त्यांना अण्णांबद्दल केवढें प्रेम व आदर वाटत असे हें एकाच वाक्यानें मला समजून आलें. विरुद्ध मताच्या माणसांना आदर वाटण्यास भाग पाडणारा मनाचा थोरपणा अण्णांच्या ठिकाणीं आहे. म्हणूनच आज त्यांच्याविषयीं सर्व मताचे लोक आदर बाळगतात.

## : ३१ : धर्म व 'उपवास'

रामभाऊः—काय हो गणपतराव, येतां का फिरायला? आज टेकडीवर जाऊं या.

गणपतरावः—येतों, पण आज टेकडीवर नको बुवा. आजच्या उपवासानें बराच थकवा आला आहे. आज सकाळपासून नुसतें पाणी पिउनच आहें.

राम०ः—खरेंच गणपतराव, मी तुम्हांला बरेच दिवस विचारणार होतों कीं, तुम्हीं सुशिक्षित, विचारी असून कांहीं कांहीं बाबतींत इतके भोळसट कसे? तुम्हीं पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचें अध्ययन केलें आहे, तेव्हां विचारतों कीं, उपवासानें आपणास वैकुंठांत नेण्याकरितां विमान उतरेल असें तुम्हांस वाटतें का? आणि मग 'ज्ञानान्मोक्षः' असें जें तत्त्वज्ञानांतील वचन आहे त्याचा अर्थ कसा लावावयाचा? आमचा देश आधींच भोळसटपणामुळें अधोगतीला गेला आहे. त्यांत तुमच्यासारख्या विचारी व सुशिक्षित माणसांनीं असल्या खुळ्या कल्पनांना थारा दिला म्हणजे तर अडाणी माणसांचें फारच फावतें व ते आमच्यासारख्या शिक्षितावर जास्तच टीका करूं लागतात.

गण०ः—पण शिक्षितांनीं तरी विचार न करितां धर्माची मनास मानेल तशी थट्टा कां करावी? त्यांना तरी तसें करण्याचा अधिकार कसा पोंचतो?

रामः—पण आम्हीं विचार करीत नाहीं कशावरून? पंधरा-वीस वर्षें अध्ययन केलें तें फुकटच?

गणः—फुकट नाहीं तर काय? त्यांत तुम्हीं कांहीं माहिती मिळविलीत खरी. पण त्याचा अर्थ वाटेल त्या बाबतींत मत देण्याचा तुम्हांला अधिकार पोंचतो असें मात्र मला वाटत नाहीं. एखादें घर बांधावयाचें झाल्यास कोणीहि तुमच्यासारख्यांचाच सल्ला घेईल. पण एखादा रोग झाल्यास वैद्याचाच सल्ला घेणें योग्य होईल.

राम :—तें सर्व खरें. पण तुम्हीं अशा रीतीनें मुख्य प्रश्न टाळीत आहांत. उपवासानें माणसाची उन्नति कशी होते तें सिद्ध करा. नाहीं तर हें खूळ सोडून तरी द्या. अहो, आम्हांला कांहीं धर्म कळत नाहीं तर नाहीं; पण तुम्हांला तरी तो कळतो ना? तर मग सांगाना येवढें आम्हाला समजावून.

गण०:—मला जें कळतें तें मी सांगेन; परंतु एका अटीवर. उपवासाची उपयुक्तता तुम्हांला पटल्यास तुम्ही स्वतः दर एकादशीला उपवास केला पाहिजे.

रामः—नाहीं, बोवा, साफ नाहीं! आम्हांला तुमचा धर्म न समजला तरी चालेल. आणि उपवास न केल्यामुळें आम्ही नरकांत पडलों तरी बेहेत्तर!

गण०:—बरें, जाऊं द्या. नका करूं उपवास. पण निदान धार्मिक बाबींची थट्टा करण्याचें तरी सोडून द्याल?

रामः—होय कबूल; पण तुमचें म्हणणें पटल्यास!

गण०:—प्रत्येक धर्माला आचार व विचार अशीं दोन अंगें असतात. त्यांचा संबंध शरीर व मन ह्यांच्या संबंधासारखा आहे.

म्हणजे मन निरोगी असल्यास शरीर निरोगी रहातें व शरीर निरोगी असल्यास मन शुद्ध राहाण्यास मदत होते.

रामः—हा युक्तिवाद चांगला ! मग तुम्हीं असेंहि म्हणाल कीं स्वच्छ कपडे वापरल्यास मन स्वच्छ राहील व मलीन वापरल्यास मन मलीन होईल.

गण०:—असेंहि म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. ( Cleanliness is next to Godliness. ' ) ' निर्मळपणा हा देवपणाच्या अगदीं जवळ रहातो.' अशी इंग्रजींत म्हण आहे ना ? तिचा अर्थ असाच नाहीं का होत ? धर्मानें मनःशुद्धीकरितां आचार सांगितले आहेत. व इंद्रियदमन हें मनःशुद्धीला आवश्यक आहे. उपवासानें इंद्रियांवर कसा ताबा येतो हें आपण पाहूं या.

रामः—बटाट्यांची भाजी, साबूदाण्याची खिचडी, शिंगाड्याच्या पुऱ्या, बदामाची खीर अशासारख्या पदार्थांनीं जर इंद्रियदमन होत असेल तर मग आमच्या कांदा-लसुणीनें सुद्धां तें होतें असें म्हणण्यास आम्हांस कोणती हरकत ? होत नाहीं असें सिद्ध करा.

गण०:—रामभाऊ, एक गोष्ट तुम्हांला प्रथम सांगावयास पाहिजे होती. मी जी चर्चा करीत आहें ती लोकाचाराची अथवा रूढींची तरफदारी करण्याकरितां नसून उपवासाची मूळ कल्पना कशी आली याची शास्त्रदृष्टीनें करीत आहें. विचारी माणसानें लोकांच्या आचरणावरून धर्माचें स्वरूप ओळखूं नये, तर प्रमाणभूत धर्मग्रंथावरून व थोरपुरुषांच्या आचारावरून ओळखावें. नाहीं तर गीतेचे पाठ करणाऱ्या कांहीं लबाडांच्याकडे बघून गीता सांगणारे भगवान् श्रीकृष्णहि लबाड ठरावयाचे. उंदीर घुशी खाणाऱ्या चिनी लोकांच्या वर्तनावरून महात्मा बुद्धदेवहि हिंसाप्रवर्तक गणले जावयाचे.

अथवा कांहीं बोलघेवड्या सुधारकांकडे नजर देऊन आमचे रामभाऊहि त्यांपैकींच एक समजले जावयाचे.

रामः—धर्माच्या मूळ कल्पनांचा मी विचार केला नसून लोकांच्या आचारावरून मला उपावासासारख्या गोष्टींचा तिटकारा आला आहे ही गोष्ट मलाहि कबूल केली पाहिजे.

गण०:—रामभाऊ, तुम्ही चहा पितां, नाहीं का ?

रामः—होय पितों, पण चहा तुमच्या उपवासालाहि चालतो.

गण०:—माझ्या विचारण्याचा हेतु निराळा आहे. तुम्ही तो कांहीं दिवस सोडूं शकाल का ?

रामः— मी तसा कधीं प्रयत्न केला नाहीं. पण सोडावयाचा झाल्यास जरा जड जाईल असें वाटतें. पण आम्हांला तो सोडून कोठें स्वर्ग मिळवावयाचा आहे !

गण०:—स्वर्गाची कल्पना तूर्त बाजूला ठेवूं या. पण एखाद्या माणसानें धर्माच्या नांवानें आपणांस आवडणाऱ्या वस्तूंचा कधीं कधीं त्याग केला व दुसऱ्या वस्तूंवर निर्वाह केला तर त्या माणसाचा आपल्या जिभेवर कांहीं तरी ताबा आहे, हें तुम्हीं कबूल कराल कीं नाहीं ?

रामः—हें कबूल केलेंच पाहिजे. जें दिसतें तें कोण नाकबूल करील ?

गण०:—झालें तर. उपवास हे मूळ ह्याच कल्पनेनें धर्मांत सांगितलेले असावेत. लोक अज्ञानानें त्यांचा भलताच अर्थ करितात. फलाहार म्हणजे धान्याहार आणि निराहार म्हणजे फलाहार असा लोकांनीं अर्थ केल्यास बिचाऱ्या धर्मानें काय करावें ? इंद्रियदमनाकरितां व शरीर निरोगी रहावें म्हणून हे उपवास प्रत्येक धर्मांत

सांगितलेले आहेत. अलीकडच्या शास्त्रज्ञांनीं उपवासानें रोग बरे करण्याचें शास्त्र शोधून काढलें आहे हें तुम्हांला माहीत आहेच.

रामः—मग तें शास्त्रहि आमच्या धर्मज्ञ ऋषींना माहीत होतें कीं काय?

गण०:—नव्हतें कशावरून? उपवासाच्या योजनेवरून तें माहीत असावें असें मानण्यास सबळ कारणें आहेत. आठपंधरा दिवसांनीं योग्य पद्धतीनें एखादा उपवास केल्यास आरोग्यरक्षणाला मदत होऊन शिवाय जिभेवरहि थोडासा ताबा मिळवितां येतो. तुम्ही दोन दिवस चहा सोडा आणि पहा तुम्हांला एकप्रकारचें सामर्थ्य वाटूं लागतें कीं नाहीं! तुमची अशी खात्री होईल कीं, चहाचे आपण गुलाम नसून चहाला आपण नोकराप्रमाणें वागवूं शकूं! अडचणींच्या प्रसंगीं जें मिळेल तें खाऊन राहण्याची पात्रता उपवास करणाराचे अंगीं येते. आणि ही गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं! आपली जीभ आपल्या ताब्यांत नसल्यास प्रवासामध्यें कोण हाल होतात विचारूं नका! एक दिवस चहा मिळाला नाहींतर लगेच डोकें दुखूं लागतें!

रामः—पण उपवासानें मोक्ष कसा मिळतो?

गण०:—उपवास, उपासनादिक व्रतें इत्यादि अंगांचा विचार करावयाचा झाल्यास बराच वेळ लागेल. तो आपण पुनः एखादे-वेळीं करूं. पण मला तूर्त एवढेंच सांगा कीं, तुम्ही आपल्या मुलांना सांगतां कीं नाहीं अभ्यास करा म्हणजे तुमचें कल्याण होईल म्हणून?

रामः—होय सांगतों; पण तें सत्याला धरून असतें.

गण०:—मग धर्म सांगतो तेंहि सत्याला धरूनच असतें. मनःशु-द्धीनें मोक्ष मिळतो. जी जी गोष्ट मनःशुद्धीला कारण ती ती मोक्षाचेंहि


कारण असें म्हटल्यास त्यांत वावगें काय? फार तर अतिशयोक्तीचा दोष येईल. पण तो दोष तुम्ही मुलांना उपदेश करितां त्यावेळींहि होत असतो; नुसत्या अभ्यासानें तुमच्या मुलांचें कल्याण होणार नसून त्यांच्या अंगीं इतर गुण असले तरच तीं मोठ्या पदास चढतात.

रामः—गणपतराव, तुम्ही म्हणतां तें मला पटलें. मला वाटतें धर्माच्या निरनिराळ्या बाबींचा असा विचार केला तर आमचीं मतें आम्हांस बरींच बदलावीं लागतील.

गण०:—खास बदलावीं लागतील. रामभाऊ, मीहि कॉलेजमध्यें पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असतांना तुमच्यासारखाच धार्मिक गोष्टींची थट्टा करीत असे. पण आम्हांला तत्त्वज्ञान शिकवणाऱ्या गुरुजींची धर्मावर श्रद्धा असून, त्यांचें वर्तन एकाद्या साधूसारखें होतें. त्यांच्या आचरणाचा आमच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. शिवाय खाजगी संभाषणांत त्यांनीं आम्हांला अनेक गोष्टी समजावून सांगितल्या. तेव्हांपासून आम्ही धार्मिक गोष्टींची थट्टा करावयाची सोडून देऊन धर्माविषयीं विचार करूं लागलों. सहानुभूतीनें विचार करितांच आम्हांला धर्मांत कितीतरी चांगल्या गोष्टी आढळून आल्या. आमच्या हिंदुधर्मरूपी वृक्षाला अनेक सच्छील व विचारी पुरुषांनीं पाणी घालून वाढविला आहे अशी आमची खात्री झाली.

उपवासाचें महत्त्व आपल्या पूर्वजांच्या चांगलें लक्षांत आलें होतें. उपवासांनीं बहुतेक रोग बरे होऊं शकतात, हें तत्त्व नवीन नसून आपल्या वैद्यकग्रंथांत स्पष्टपणें नमूद केलेलें आढळतें. वाग्भटाचार्यांनीं, 'लंघनं परमौषधम्' (लंघन हें रामबाण औषध

आहे ) अशा शब्दांत उपवासाचें चिकित्सेच्या दृष्टीनें महत्त्व वर्णिलें आहे. उपवासांत आणखी एक दृष्टि आहे. निराहार राहून किंवा तसें शक्य न झाल्यास स्वल्पाहार करून एखादा मनुष्य पवित्र जागीं एकान्तांत बसून उच्च गोष्टीचें ध्यान करील तर त्याला नवीन विचार सुचण्यास फार मदत होईल. उप म्हणजे जवळ, वास म्हणजे राहणें. देवाजवळ किंवा उच्च कल्पनांच्या सान्निध्यांत राहणें हा उपवासाचा मूळ हेतु असला पाहिजे. पण हा सर्वांनाच साधण्यासारखा नाहीं म्हणून एकादशीव्रतानें शरीरस्वास्थ्य व देवाची आठवण एवढ्या दोन गोष्टी साधल्या तरी थोडें नाहीं. मात्र शरीरस्वास्थ्याकरितां उपवास हा शक्य तर नुसतें पाणी पिऊन नाहींतर निदान दूधफळांवर राहून केला पाहिजे.



## : ३२ : औद्योगिक शिक्षण.

[ हा संवाद इ० स० १९२४ साली हिंगणें येथील महिलाश्रम हायस्कूलच्या मुलीच्या समेलनाकरितां लिहिला होता. त्यावेळीं बौद्धिक शिक्षणाबरोबर हस्तव्यवसायाचे शिक्षण दिले पाहिजे हे तत्त्व फारच थोड्या शिक्षण-तज्ज्ञांस अगत्याचें वाटे. आज परिस्थिति पार बदललेली असून, वर्धा-शिक्षण-योजनेत हस्तव्यवसायाला भरपूर महत्त्व दिले गेले आहे. सामान्य जनतेला तेच शिक्षण हितकर होईल अशी मला खात्री वाटते. मात्र बौद्धिक शिक्षण घेणारा असा एक लहानसा वर्ग शिल्लक राहील. त्यांतूनच देशांतील जनतेचे पुढारी निर्माण होतील. ह्या बौद्धिक शिक्षणाबरोबरहि एका हस्तव्यवसायाचे शिक्षण दिले पाहिजे. म्हणजे ह्या उच्चशिक्षित वर्गासहि 'कामकरी' वर्गाबद्दल सहानुभूति वाटेल व त्यांच्या अडचणी समजतील. शिवाय शिक्षण शास्त्रदृष्ट्याहि कल्पना व हस्तकृति यांचा मेळ घालण्याचे प्रयत्नांत कल्पनांना निश्चित स्वरूप येईल, व शिकलेली तत्त्वें मनावर अधिक चांगली ठसतील. ह्या वर्गाने स्वतां धंदे चालविले नाहीत तरी तो धंदेवाल्यांचें मार्गदर्शकत्व करू शकेल. ]

( सुशीलाताई शर्ट शिवीत बसल्या आहेत. )

सुशीला:—मला शिवणकाम येऊं लागल्यापासून वेळ कसा हां हां म्हणतां निघून जातो. आईला थोडी मदत करावी, तास दोन तास वाचावें आणि रिकामा वेळ सांपडला कीं शिवीत बसावें. दिवस संपतो केव्हां तें समजतसुद्धां नाहीं. ( तयार झालेल्या शर्टाकडे पाहून ) हा शर्ट मात्र जरा बरा दिसतोय. बाकी बाबा काय, पहिल्यापासूनच मी शिवलेला शर्ट कसाहि झाला तरी चांगला म्हणून घालतात. ते म्हणतात, घरीं तयार केलेली वस्तु जरा नीट नसली तरी ती घरची आहे. हळूहळू सुधारणा होतेच. बाबांच्या ह्या वृत्तीमुळेंच तर मला शिवणकाम येऊं लागलें. नाहींतर काय, तो मी शिवलेला

पहिला शर्ट ! आतां मलाच त्याची लाज वाटते. बाबांनीं तो मुद्दाम राखून ठेविला आहे; अभ्यासानें माणूस किती सुधारतें तें दाखविण्याकरितां. हा शर्ट पाहून बाबांना किती संतोष वाटेल ! आतां याचीं फक्त काजें करावयाचीं राहिलीं आहेत; करूं केव्हां तरी. ( आठवल्यासारखें करून ) खरंच, माझी लहानपणची मैत्रीण गंगूताई एका मैत्रिणीच्या लग्नानिमित्त पुण्यांत आली आहे. ती मला ४–५ वाजतां भेटावयास येणार होती. ४॥ वाजले; बाहेर जाऊन तिची वाट पाहावी. ( फाटक वाजलेलें ऐकून ) फाटक वाजल्यासारखें वाटतें. ( गंगूताई प्रवेश करितात ) या गंगूताई. आतांच तुमची आठवण झाली होती. नांव घेतलें मात्र आणि तुम्ही हजर. तुम्हांला अगदीं शंभर वर्षें ‘ औक्ष ’ आहे.

गंगूः—सुशिलाताई, आज आपली किती वर्षांनीं गांठ पडली ! तुम्हांला पाहून मला कितीतरी आनंद होत आहे ! सगळी मंडळी खुशाल आहेत ना ? सगळी म्हणजे तुमचे बाबा, व वत्सलाकाकू, तुमचा भाऊ उद्यम आणि तिकडची मंडळीसुद्धां.

सुशीलाः—हो सगळीं खुशाल आहेत. लंडनहून खुशालीचें पत्र कालच आलें. परीक्षा आतां ४ महिन्यांवर आली आहे. बाबा, शांताकाकू आणि तुमची रंगू खुशाल आहेत ना ?

गंगूः—हो सगळीं खुशाल आहेत. सुशीलाताई, बाबांना व आईला तुमची फार आठवण होते. तीं म्हणतात, सुशीलाताईसारखी सुस्वभावी मुलगी आपल्या पाहाण्यांत नाहीं. पण हें काय सुशीलाताई ! तुम्हीसुद्धां खादीचें पातळ नेसतां वाटतें ! कसला जाड आणि जड कपडा हो ! तुम्हाला उन्हाळ्याच्या दिवसांत तें

नेसवतं तरी कसं? तुमचें तरी हें फॅड्च दिसतं! तुम्ही ह्या फॅड्ला बळी पडाल असं नव्हतं मला वाटलं.

सुशीलाः—गंगूताई, यांत फॅड तें कसलं? स्वदेशी कपडा वापरण्याची तूं व मी लहानपणीं शपथ घेतलेली तुला आठवते ना?

गंगूः—( स्वगत ) आतां ह्रिच्या बोलण्यामुळें आठवण झाली खरी. ( उघड ) हो, पण खादीचा काय त्याच्याशीं संबंध?

सुशीलाः—काय तो सांगतें. स्वदेशी कपडा तरी कशाकरितां वापरावयाचा; देशांतल्या लोकांना काम मिळून आपला पैसा आपल्या घरांत रहावा म्हणून ना?

गंगूः—हो, पण गिरणीचा कपडा म्हणजे स्वदेशी कपडा नव्हे का?

सुशीलाः—नाहीं कोणी म्हटलं?

गंगूः—मग हें गाढवाचें ओझें अंगावर कशाला?

सुशीलाः—माणूससुद्धां पुष्कळवेळां त्या चतुष्पाद प्राण्यासारखेंच वागतें हें दाखविण्याकरितांच कां म्हणेनास?—हो पण, राहूं दे; आपल्या या देशांत शेंकडों लोक निरुद्योगी आहेत व त्यामुळें त्यांना एकवेळहि खायला मिळत नाहीं हें तुम्ही कबूल कराल का?

गंगूः—हें पूर्वीं मला खोटें वाटत असे. पण बाबांबरोबर मी गेल्या मे महिन्याचे सुटींत कोंकणांत गेलें होतें. तेथें पाहिलें तर कितीतरी गरीब लोकांना खायला भातहि मिळत नाहीं. म्हणून ते भाताची पेज करून खातात. हें मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलं! शिवाय पावसाळ्यांत खाण्याकरितां ते फणसाच्या आठळ्या व आंब्याच्या कोया जमा करून ठेवितात. काय त्यांची ती दशा! अंगावर वस्त्र म्हणजे लंगोटीशिवाय शपथेला मिळावयाचें नाहीं! त्यांची स्थिति आठवली म्हणजे अंतःकरण तळमळतें!

सुशीलाः—मग त्या गरीब लोकांना जेणेंकरून घांसभर अन्न मिळेल असा कोणताहि उपाय तूं पत्करशील कीं नाहीं?

गंगूः—हो अवश्य पत्करीन. पण सुशीलाताई हें विषयांतर झालें. खादीचा त्याच्याशीं काय संबंध? तुमचें फड् लपवूं नका.

सुशीलाः—काय संबंध तें सांगतें. खादीची चळवळ महात्मा गांधींनीं हे गरीब लोक लक्षांत घेऊनच काढिली. मनुष्याला आवश्यक वस्तूंत अन्न व वस्त्र हीं मुख्य. आपल्या देशांत कापूस पुष्कळ पिकतो. पण तो परदेशीं जाऊन त्याचा कपडा विणला जातो, व तो कपडा पुन्हा आपल्याकडे परत येतो. परदेशाहून आलेल्या फक्त कापडापायीं आपल्या देशाचे दरवर्षी साठ कोट रुपये खर्च होतात हें तुम्हांला ठाऊक आहे. कापूस परदेशीं जाऊं न देतां येथल्या येथें खेडेगांवांत, घरच्या घरीं फुरसतीच्या वेळांत, त्याचें सूत काढून कपडा विणला गेल्यास गरीब लोकांना मदत होईल कीं नाहीं? गिरणीचा कपडा स्वदेशी खरा, पण गिरणींत जो फायदा होतो तो बराचसा गिरणीचा मालकच गिळून बसतो. व मजुरांचे अतिशय हाल होतात.

गंगूः—हो, मी एकदा मुंबईस गेलें होतें तेव्हां मी ज्या चाळींत उतरलें होतें तिच्या शेजारच्या चाळींत मजूर राहात असत. किती अंधार त्या चाळींत! शिवाय कितीक लोक तर शौचकूपाजवळच्या खोलींत रहात असत; तें पाहून तर मला नरकाचीच कल्पना आली.

सुशीला—कल्पना कां म्हणतां? प्रत्यक्ष नरकच तो! शहरांतल्या राहाणीनें मजुरांचें अपरंपार नुकसान होतें. घाणेरड्या हवेंत त्यांची प्रकृति बिघडते. राहाणी गर्दीची असल्यामुळें बायकामुलें

घरीं खेड्यांत ठेवून त्यांना शहरांत एकटेंच रहावें लागतें. त्यामुळें त्यांस निरनिराळीं व्यसनें जडतात, व लवकरच ते रोगाला बळी पडतात. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे खेड्यांतल्या खेड्यांत उपजीविका चालवितां येईल अशी कांहीं युक्ति पाहिजे असें वाटूं लागतें. ह्या दृष्टीनें महात्मा गांधींनीं चरख्याचा प्रसार चालविला आहे.

गंगू—तुमचें म्हणणें बरेचसें पटतें. तुमच्या म्हणण्याचा हेतु घरगुती धंद्यांची वाढ झाली पाहिजे असाच ना?

सुशीला—होय. बरोबर ओळखलेंत आणि चरखा म्हणजे घरगुती धंद्याचा प्रारंभ असेंच मी समजतें. आपल्या देशाचें दारिद्र्य कमी होण्यास एकच उपाय आज मला शक्य दिसतो, तो म्हणजे देशाच्या शक्य तेवढ्या गरजा देशांतच भागविणें. घरोघर कांहींतरी धंदा चालला पाहिजे. आपणां बायकांना आपलें गृहकृत्य संभाळून एकदोन तास तरी एखादा कलाकुसरीचा धंदा करितां येण्यासारखा आहे. बाबा सांगतात कीं, जपानांत किती तरी घरीं माग असतो व तेथील बायका स्वताचें कापड स्वतः विणून वापरतात. अजून आपल्याकडे कांहीं भागांत लग्नांत मुलीच्या बरोबर चरखा देण्याची पद्धत आहे. त्याचाहि हेतु असाच कांहीं असावा; नाहीं का? आपण बायकांनीं कांहींतरी धंदा शिकून रोज थोडा थोडा काम करण्याचा अभ्यास ठेविला तर आज कुटुंबामध्यें मिळविणारा एक व खाणारीं सगळीं अशी जी लांछनास्पद स्थिति दिसून येते ती बदलेल व अडचणीच्या प्रसंगीं आपण आजच्यासारख्या हताश होणार नाहीं. ज्या ठिकाणीं गोषाची पद्धति आहे त्या ठिकाणीं तर बायकांना कांहींच काम नसतें. अशा बायकांना जर

कांहीं तरी धंदा शिकविला तर त्यांचा वेळ चांगला जाऊन कुटुंबाचाहि फायदा होईल.

गंगू:—कांहो सुशिलाताई, तुम्ही घरगुती धंद्याविषयीं बराच विचार केलेला दिसतो; तर सुशिक्षित बायकांनीं करण्यासारखे असे कांहीं धंदे आहेत का?

सुशिला:—मला वाटतें कोणताहि धंदा करणें कमीपणाचें नाहीं. काम करण्यांत लाज कसली? श्रीकृष्णांनीं धर्माच्या यज्ञांत उष्टीं नाहीं का काढिलीं? नसत्या बडेजावीनें आपलें फार नुकसान झालें आहे. ही बडेजावी पार घालवून दिली पाहिजे आणि ही जबाबदारी आपल्यासारख्या सुशिक्षित बायकांवर प्रथम पडते. तें असूं द्या. पण बायकांनीं करण्यासारखे असेहि पुष्कळ धंदे आहेत. शिवणकाम, कापड विणणें, पुस्तकें बांधणें, घड्याळें दुरुस्त करणें, चटया विणणें, वेताच्या खुर्च्या इत्यादि विणणें, आपल्याकडे जपानी कागदाचे कंदील इत्यादि जिन्नस येतात तसे तयार करणें, मातीचीं चित्रें काढून त्यांना रंग देणें, तसबिरी रंगविणें, पायमोजे इत्यादि विणणें असे अनेक धंदे आपल्याला घरीं बसून करितां येण्यासारखे आहेत.

गंगू:—पण हें सगळं जमावं कसं? आपण धंदे करूं लागलों तर समाज आपल्याला हंसणार नाहीं का?

सुशीला:—अहो, हंसतील त्यांचे दांत दिसतील. पहिल्यांदा बायका शिकूं लागल्या तेव्हां नाहीं का लोक हंसले? पण आज शास्त्री किंवा वैदिकसुद्धां आपल्या मुलींना शाळेंत पाठवितात. फायदा दिसूं लागला म्हणजे आज जे हंसतील तेच उद्यां आपल्या मुलींना कांहीं तरी धंदा शिकविण्याची धडपड करतील.

( हातांत पेटी व सुतारकामाचीं हत्यारें घेऊन उद्यम प्रवेश करतो. )

उद्यमः—ताई, ताई, तुला मी किती हांका मारिल्या. तुझ्या शिवणकामाच्या खोलींत तुला हुडकली, आईला विचारलें, पण तुझा पत्ताच नाहीं. सहज बाहेर आलों तों तूं दिसलीस. ताई, ही बघ मी पेटी तयार केली आहे. ही तुला आवडते का ?

सुशीलाः—पाहूं बरें. वाः ! चांगलीच झाली आहे.

गंगूः—(स्वगत) ह्या कुटुंबांतील सर्वच माणसें हुन्नरी दिसतात.

उद्यमः—ताई, मी तुला शिवलेले कपडे ठेवण्याकरितां एक मोठी पेटी करून देईन.

सुशीलाः—वाः ! मग तर फारच चांगलें होईल.

उद्यमः—पण तूं मला काय देणार ?

सुशीलाः—काय देऊं सांग, तूंच सांग.

उद्यमः—तूं मला एक छानसा कोट शीव म्हणजे झालं.

सुशीलाः—ठीक आहे. शिवीन बरं बाळ.

उद्यमः—बरं तर दे माझी पेटी, मी बाबा आल्यावर त्यांना दाखवीन. [ पेटी घेऊन जातो. ]

गंगूः—सुशीलाताई, किती हुषार तुमचा भाऊ हो. एवढासा मुलगा पण किती छान पेटी केलीन् !

सुशीलाः—त्याला सुतारकामाचा नाद लागलाय. रिकामा वेळ सांपडला कीं, तो बसतो ताशीत. असा लहानपणापासून एखाद्या धंद्याचा नाद लागला तर किती मजा होईल ! बौद्धिक शिक्षणाबरोबर धंदेशिक्षणहि होऊन जाईल.

गंगूः—सुशीलाताई, तुमचें म्हणणें मला अगदीं पटलें. माझ्या

मनांतहि एखादा धंदा शिकावा असं आलंय्. तुम्ही मला शिवण काम शिकवाल का ?

सुशीलाः—हो आनंदानें शिकवीन. मी मॅट्रिक झाल्यावर बाबांनीं मुद्दाम शिंपी ठेवून हा धंदा मला शिकविला. मशीन घेऊन दिलं. आमच्या बाबांचें तर मत असें आहे कीं, माणसाला मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, कांहीं तरी एक धंदा येत असावा. नुसतें बौद्धिक शिक्षण स्वातंत्र्यवृत्तीला पोषक होत नाहीं. निव्वळ बौद्धिक शिक्षण घेतलेल्या बहुतेक माणसांना नोकरीशिवाय मार्ग नसतो. आणि नोकरी म्हणजे गुलामगिरी. मला तर सुशिक्षित लोक उद्योगधंद्यांत शिरल्याशिवाय देशाची धडगत दिसत नाही. या बाबतींत अगदीं क्रान्ति घडवून आणिली पाहिजे. लहानपणांपासून मुलांना हें बाळकडू पाजिलें पाहिजे कीं, शारीरिक कष्ट करणें हें कमीपणाचें नसून उलट भूषणावह आहे. हें इभ्रतीचें पिशाच्च मेलं गाडलंच पाहिजे.

गंगूः—सुशीलाताई, धंद्याचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कांहीं उपाय नाहीं का ?

सुशीलाः—बाबा म्हणतात, शाळेंतील बौद्धिक शिक्षणाबरोबर एका धंद्याचें शिक्षण आवश्यक करावें. रोज थोडें थोडें काम करून ५–७ वर्षांत एका धंद्याचें चांगलें ज्ञान होईल. सुशिक्षित लोकांना एकदा धंदेशिक्षणाचें महत्त्व पटलें म्हणजे इतरांनाहि तें पटेल. व लवकरच आपला देश प्राचीनकाळीं जसा कारागिरी-करितां प्रसिद्ध होता तसा तो पुन्हा होईल. निदान आपल्या पुढच्या पिढीला तरी तो तसा पहावयास मिळेल.

गंगूः—हा उपाय चांगला दिसतो खरा. मी बी. ए. झाल्यावर

एक मुलींची शाळा चालविण्याचें ठरविलें आहे. मी आपल्या शाळेंत बौद्धिक शिक्षणाबरोबर एका धंद्याचें शिक्षण आवश्यक करीन. माझी बी. ए. ची परीक्षा होतांच मी तुमचेकडे येईन व मग तुम्ही मला शिवणकाम शिकवा. स्वतःच्याच वर्तनानें दुसऱ्याला उदाहरण घालून दिलेलें चांगलें ठसतें.

सुशीलाः—तुम्ही अवश्य या; मी तुम्हांला मला येतें तें आनंदानें शिकवीन.

गंगूः—बरं तर चला; आतां वत्सलाकाकूंना व तुमचे बाबांना भेटून मला निघालंच पाहिजे—संध्याकाळ फार झाली.

( दोघी जातात. )



## : ३३ : व्यसनें.

> व्यसनस्य च मृत्योश्च व्यसनं कष्टमुच्यते ।
> व्यसन्यधोऽधो व्रजति स्वर्यात्यव्यसनी मृतः ॥
>
> मनुस्मृति.

"व्यसन आणि मृत्यु यांची तुलना केली तर व्यसन अधिक कष्टदायक असतें व्यसनी मनुष्य नेहमीं अधोगतीला जात असतो. व्यसनापासून अलिप्त असणारा मात्र मृत्यूनंतर स्वर्गाला ( सद्गतीला ) जातो."

मुलांनो, कोणतेंहि व्यसन तुम्हांला लागणार नाहीं अशी दक्षता बाळगा. दारू, गांजा, अफू, भांग इत्यादि मादक पदार्थांचें सेवन केल्यानें मनुष्य आरोग्य, पैसा व बुद्धि गमावून बसतो. पैसा एकवेळ गेला तरी पुन्हा मिळवतां येईल, पण बुद्धि गेली कीं, माणसाचा पशु बनतो. व्यसनी मनुष्याच्या शब्दावर कोणीहि विश्वास ठेवीत नाहीं, व समाजांत त्याला खालीं मान घालून रहावें लागतें. कुटुंबांतील माणसांना त्याच्यापासून फार त्रास पोंचतो, त्यामुळें त्याच्या घरांत कधींहि शान्ति नांदत नाहीं.

मादक पदार्थांचें सेवन केल्यानें बुद्धि–भ्रंश होतो; व बुद्धि–भ्रंश झाल्यावर मनुष्य आणि पशु यांत फरक कोठें राहिला ? निशेंत असणाऱ्या माणसांना चांगलें वाईट कळेनासें होतें. तीं अद्वातद्वा बोलतात. मारहाण करितात. स्वतः लाचार होऊन गटारांतहि पडतात.

कोणी म्हणेल कीं, आम्हीं या मादक पदार्थांचें माफक सेवन केलें तर काय हरकत? मादक पदार्थांचें एकदा सेवन केलें कीं, ते पुन्हा पुन्हा घ्यावेसे वाटतात व मनुष्य त्यांचा गुलाम बनतो. प्रथम औषध म्हणून माफक दारू घेणारे किंवा गांजा ओढणारे लोक दारूबाज व गंजड बनतात असें प्रत्ययाला येतें. याला अपवाद क्वचित् सांपडेल. शिवाय ज्याची शरिराला जरूरी नाहीं, इतकेंच नव्हे तर ज्याचें किंचित् जास्त सेवन केलें असतां मोठा अपाय होतो तो पदार्थ घ्याच कशाला?

कांहीं वर्षांपूर्वीं चीन देशांतील लोक अफूबाज होते. त्यामुळें त्या लोकांचें व राष्ट्राचें अपरिमित नुकसान झालें. तेथील पुढाऱ्यांनीं हें ओळखून आतां त्यांनीं कायदे करून लोकांना अफूच्या व्यसनांतून पुष्कळसें सोडविलें आहे.

आपल्या देशांतील पुष्कळ लोक आज दारूच्या व्यसनांत बुडाले आहेत. खेड्यांत सुतार, लोहार, कोष्टी वगैरे कसबी लोक रोज बारा आण्यांपासून रुपयापर्यंत मजुरी मिळवितात. खेड्यांतील जीवन एवढ्या पैशांत सुखी होऊं शकेल. पण ते लोक निम्मे अधिक पैसे दारूंत खर्च करितात. त्यामुळें इतकी मजुरी मिळवूनहि त्यांना कर्ज काढावें लागतें. त्यांच्यांपैकीं एखादा मनुष्य निर्व्यसनी असला तर तो सुखानें संसार करतांना आढळतो. दारुडे लोक बायकांमुलांना हाणमार करतात. दारुड्याच्या कुटुंबाला खायाला मिळण्याची पंचाईत पडते. कारण तो केवळ आपण मिळविलेले पैसे खर्च करून रहात नाहीं, तर बायकापोरांनीं मिळविलेलेसुद्धां त्यांच्यापासून हिसकावून घेतो. दारुडा शेजाऱ्यांनासुद्धां पीडा देतो. त्याच्या जवळपास रहाणें कधीं कधीं धोक्याचें होऊन बसतें. तो कोणाला शिवी-

गाळ करील याचा नियम नाहीं. कारण तो निशेंत काय कर याचें त्यास भानच नसतें.

मुलांनो, या दारूनें कित्येक गरीब कुटुंबांचें वाटोळें केलें आ दारुड्याचें शरीर रोगाला सहज बळी पडतें व त्याचे रोग आनुवंशि कत्वाच्या नियमानें त्याच्या मुलांना जडतात. म्हणजे त्याची पुढ पिढीहि दुबळी निपजते. राष्ट्रीयदृष्ट्या हें केवढें नुकसान !

मुलांनो, आपल्या देशांत दारिद्र्य फार वाढलें आहे. सर्व दि राबलें तरी कित्येक लोकांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मि शकत नाहीं. अशा स्थितींत दारूसारखें घातक व्यसन बंद क हें फार मोठें, भूतदयेचें व राष्ट्रीय कार्य आहे. गरीब लोक व्यसनांतून सुटले तर त्यांना व त्यांच्या कुटुंबाला खायाला मिळे खायाला मिळालें म्हणजे त्यांचें आरोग्य सुधारेल, आरोग्य सुधा म्हणजे ते अधिक कष्ट करूं शकतील, अधिक कष्ट केल्या त्यांच्या प्राप्तींत भर पडेल व ते सुखी होतील.

आज कॉंग्रेस-मंत्र्यांनीं दारूबंदी करण्याचें ठरविलें असून मुं व उपनगरांत तिचा प्रयोग सुरू केला आहे. ह्या प्रयोगाला प्र कानें होईल तें साहाय्य दिलें पाहिजे. व ही मोहीम यश केली पाहिजे. तेथें ती यशस्वी झाली म्हणजे इतर ठिकाणीं स यशस्वी होईल.

मद्यपान हें मोठें पातक आहे. मनूनें त्याची पंचमहापातक गणना केली आहे.

> “ ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वङ्गनागमः ।
> महान्ति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह ॥ ”

"ब्राह्मणाची हत्या ( तो विद्वान् व सदाचारी असतो म्हणून ), मद्यपान, चोरी, गुरुपत्नीशीं व्यभिचार, तसेंच या गोष्टी करणारांची संगत करणें हीं पांच भयंकर पातकें होत."

सुरापानानें शुक्राचार्य कसे फसले हें तुम्हांला माहीत असेलच. कचानें संजीविनी विद्या शुक्राचार्यांपासून त्यांच्या ह्या दौर्बल्याचा फायदा घेऊन हस्तगत केली. शुक्राचार्यांना हा आपला दोष दिसून आला व त्यांना फार वाईट वाटलें. तेव्हांपासून त्यांनीं स्वता दारू पिण्याचें सोडून दिलें व सुरापानाचा तीव्र शब्दांत निषेध केला.

पंत म्हणतातः—

**"जो विप्र आजपासुनि मद्यप्राशन करील तो पापी।**
**ब्रह्मघ्नासम निश्चित असि मर्यादा स्वयें कवि स्थापी॥"**

पूर्वीं मराठेशाहींत दारूचा फार थोडा खप होत असे. दारूपासून उत्पन्न करण्याची सरकारची कल्पनाच नव्हती; कारण तसें करणें पाप समजत. अगदीं खालच्या दर्जाचे लोक ती चोरून पीत. मद्यपान हें अधर्म्य व हीनतेचें लक्षण गणलें जात असे. दारू पिणाराला बहिष्कृत करीत असत. त्याची सावली निषिद्ध मानीत असत. १८४९ मध्यें लिहिलेल्या लेखांत **लोकहितवादी** म्हणतात :

" आलीकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून लोकांस सद्गुण लागावयाचे तें एकीकडे राहून महान भयंकर व त्वरीत वृद्धी पावणारा असा एक दुर्गूण लोकांमध्यें प्रगट झाला आहे; तो कोणता म्हणाल तर दारू पिणें. पहा कीं, पूर्वींचे राज्यांत दारू कोणी पीत नवते.

व उत्पन्नही करीत नव्हते. ब्राह्मण व मराठे राज्य करणारे तेव्हां ते दारू उत्पन्न करणारास नीच मानीत, आणि कोणी आपलीं झाडें त्याजला दारू करण्यास दिलीं तर त्यास बहिष्कृत करीत. आणि कोंकणांत अशी चाल होती कीं दारू काढणारा हातांत दारू घेऊन जर अंगावरून गेला तर दर्शनदोषास्तव स्नान करीत. आणि दारू प्यालेला ब्राम्हण कधीं आढळत नव्हता. जर कदाचित कधीं कोणी पाहिला तर त्यास सर्व लोक निंद्य मानून कधींहि जातींत घेत नव्हते." *

आज सरकारला दारूचे मक्ते देऊन उत्पन्न पुष्कळ मिळतें हें खरें. एकट्या मुंबई इलाख्यांत अडीच कोटी रुपये जमा होतात. पण हें सर्व उत्पन्न गरीब लोकांचें आरोग्य, पैसा, नीतिमत्ता व कौटुंबिक सुख यांच्या मोबदल्यांत मिळतें म्हणून शहाण्या सरकारानें तें हराम म्हणून सोडून दिलें पाहिजे; व अशा लोकहितानुवर्ती सरकाराला प्रजेनें मनापासून साहाय्य केलें पाहिजे.

मुलांनो, हिंदुधर्मशास्त्रकार मनूनें दारूची पंचमहापातकांत गणना केली आहे; यावरून हिंदू लोक दारूला किती निंद्य मानीत असत हें सहजच सिद्ध होतें. मुसलमानांच्या कुराणांतहि दारूचा तीव्र निषेध केला आहे. तेव्हां हिंदू व मुसलमान या दोघांनीहि दारूबंदीला मदत करणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे.

दारूचा नायनाट केला तर गरीब कुटुंबें सुखी होतील. गरीब बाया व मुलें यांचें हाल नाहींसे होतील. गरिबांचें आरोग्य व नीति सुधारेल आणि शेतकरी व मजूर हे निरोगी नीतिमान व सुखी होण्यांतच देशाचें खरें हित आहे.

---

* शुद्धलेखन लोकहितवादीच्या मुळाला धरून दाखविलें आहे.

जुगार हें एक भयंकर व्यसन आहे. घोड्यांच्या शर्यती व निरनिराळ्या प्रकारच्या लॉटरी ह्यांत पैसा घालून अनेकांनीं दिवाळें काढलें आहे. राष्ट्रीय सरकारानें ह्यांनाहि कायदा करून बंदी केली पाहिजे.

मुलांनो, आतांपर्यंत केवळ मोठ्या व्यसनांची तुम्हांस कल्पना दिली. पण दुसरीं लहान लहान व्यसनें सुद्धां पुष्कळ अपाय करितात. तीं सुद्धां आपणांस लागूं देऊं नका. सिगारेट, सिनेमा, चहा हीं जरी मोठीं व्यसनें नसलीं तरी त्यांपासून दूर रहाणें चांगलें. व्यसन म्हटलें कीं अपाय करणारच. तेव्हां त्याला थाराच देऊं नका.

आपल्या प्राचीन परंपरेंतील विद्यार्थी व गुरुजी अगदीं साधे रहात. सुपारीचें सुद्धा आपणांस व्यसन लागूं नये म्हणून काळजी घेत. त्यांना एकच व्यसन असे—तें म्हणजे विद्येचें. कल्याणेच्छूनें हें व्यसन अवश्य लावून घ्यावें.

— शान्तिःपुष्टिस्तुष्टिश्चास्तु —



# बालसुहृद्

## परिशिष्ट

### टीपा, प्रश्न, व पुरवणीवाचन.

१ प्रार्थना:—प्रमाद = चुका. निरास = नाश. Many things etc. जगाला कल्पनाहि येणार नाहीं इतक्या गोष्टी प्रार्थनेने साध्य होतात.

प्रश्न:—( अ ) गायत्री मंत्र लिहून त्याचा अर्थ स्पष्ट करा.

( आ ) प्रार्थनेचा हेतु काय? खरी प्रार्थना कोणती?

उपयुक्त वाचन:—घनःश्याम सुंदरा ही भूपाळी, ॐ सहनाववतु इ. ही प्रार्थना, आश्रमभजनावलींतील 'वैष्णवजन तो तेने कहिये' वगैरे प्रार्थना.

२ राष्ट्रधर्म:—राष्ट्रीयत्व = आपल्या देशातील नागरिकाविषयीं बंधुभाव ठेवून देशाकरिता स्वार्थत्याग करण्याची वृत्ति. यज्ञ = त्याग. निरयगति = नरकवास.

प्रश्न:—( अ ) राष्ट्ररक्षणासाठीं इंग्रज एक झाल्याचीं ऐतिहासिक उदाहरणें द्या.

( आ ) घोषयात्रेची कथा सागून तींत कोणतें उदात्त तत्त्व सागितलें आहे तें लिहा.

३ मातृदेवो भव ।—कुपुत्र = दुष्ट मुलगा. क्रयविक्रय = खरेदी-विक्री, व्यापार.

प्रश्न:—( अ ) 'आईच्या प्रेमाला जगात तुलनाच नाहीं' या वाक्याचें उदाहरणें देऊन स्पष्टीकरण करा.

( आ ) 'माता' हा आपला गुरुहि आहे, हें कसे?

उपयुक्त वाचन:— Washtington Irving या अमेरिकन लेखकाच्या

Sketch Book या पुस्तकांतील 'The Wife' हा निबंध. यशवंत यांची 'आई' ही कविता.

४ **पितृभक्त श्रावणः**—तृषार्त = तहानेनें व्याकुल. मृगया = शिकार. दारुण = भयंकर, फार मोठा.

**प्रश्नः**—( अ ) श्रावणाची गोष्ट थोडक्यात सांगा. त्याची पितृभक्ति कशात दिसून आली ?

( आ ) दशरथाला ह्या पापाचें प्रायश्चित्त कसें भोगावें लागलें ?

( इ ) श्रीरामचंद्राची पितृभक्ति लोकोत्तर कशी ?

५ **माझे गुरुजीः**—हिरमोड = उत्साहभंग. विन्मुख = परत. गावकीची बैठक = गावासंबंधीं एकाद्या प्रश्नाचा निकाल करण्याकरिता भरलेली गावातील लोकांची सभा.

**प्रश्नः**—( अ ) नानाचे अंगीं कोणते सद्गुण होते ?

( आ ) तुमच्या ओळखीच्या एका नमुनेदार शिक्षकाचें शब्द-चित्र काढा.

( इ ) 'ध्येयनिष्ठ शिक्षक व विनयशील विद्यार्थी हेच राष्ट्राचा खरा उद्धार करतील' या विषयावर एक निबंध लिहा.

६ **माझीं भावंडें**:—विरक्ति = वैराग्य, तिटकारा. रत्नकांचनयोग = समसमा संयोग. उ. दुधात साखर पडणें. सोन्याच्या कोंदणांत रत्न बसविणें.

**प्रश्नः**—( अ ) हल्लीं विवाह गुणाकडे बघून होतात का पैशाकडे ?

( आ ) 'स्वतः चैन करणें म्हणजेच सुखी होणें' ही कल्पना निंद्य का तें सकारण लिहा.

( इ ) उत्तम नोकर कसा वागतो ?

७ **शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।**—गर्भगळित = फार भिऊन गेलेला. शोचनीय = दुःखकारक.

**प्रश्नः**—( अ ) तुम्ही रोज नियमानें कोणता व्यायाम घेतां ?

( आ ) चार पुरुषार्थ कोणते ? शरीर हें त्यांचें साधन कसें ?

( इ ) हल्लीं आरोग्याचा ऱ्हास कां झाला आहे ? तो थांबविण्यास काय उपाय केले पाहिजेत ?

( ई ) नमस्काराचा व्यायाम सर्वोत्कृष्ट कां ?

८ ब्रह्मचर्यः — भ्रंश पावणें = नाश होणें. बेताल = ताळ सोडलेलें. विलास = चैन.

प्रश्नः—( अ ) मनःस्वास्थ्य म्हणजे काय ? त्याचा शरीरस्वास्थ्याशीं कसा संबंध आहे ?

( आ ) ब्रह्मचर्याचे कोणते नियम मनुस्मृतींत सांगितले आहेत ?

उपयुक्त वाचनः— महाभारतांत आदिपर्वांत ( अध्याय ८४–९३ ) ययाति राजाची गोष्ट सांगितली आहे ती वाचा. त्या गोष्टीपासून कोणतें तत्त्व निघतें ?

९ सृष्टिसौंदर्यः—सृष्ट्यवलोकन = ( सृष्टि + अवलोकन ) सृष्टींतील पदार्थांचें निरीक्षण. इंद्रजाल = गारुड, जादू, चमत्कार. रजतरस = रुप्याचा रस ( रजत + रस ). आरक्त = किंचित् तांबडा ( आ = किंचित्, रक्त = तांबडा ). प्रतीत होणें = जाणवणें. वर्ण = रंग. ओतप्रोत = भरपूर.

प्रश्नः—( अ ) तुम्ही पाहिलेल्या एखाद्या सुंदर निसर्ग-देखाव्याचें वर्णन करा.

( आ ) अस्सल व कृत्रिम काव्य कोणतें ?

सूचनाः—तुम्ही महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा, खंडाळा, गोकाक यांपैकीं एखादें ठिकाण पावसाळ्याच्या अखेर पहा.

१० आरामरचनाः—अपत्यस्नेह = आईबापांचें मुलावरील प्रेम. खगगण = पक्ष्यांचा समूह. अभिरुचि = आवड. कृतघ्न = केलेले ( उपकार ) विसरणारीं. व्यंग्यार्थ = गर्भितार्थ, सूचितार्थ. वाच्यार्थ = शब्दांचा मूळ अर्थ.

प्रश्न :—( अ ) आरामरचना म्हणजे काय? तीपासून फायदे काय आहेत?

( आ ) बालसंवर्धन व वृक्षसंवर्धन यांत साम्य कसें आहे?

११ **शीलपालनः**—हा जी हा जी = खुशामत. मर्तिक झाल्यास = कोणी मृत्यु पावल्यास. पुस्तकी ज्ञान = वाचनानें मिळालेलें पण अनुभवाशिवायचें ज्ञान.

प्रश्नः—( अ ) शीलसंवर्धनाचें महत्त्व काय आहे?

( आ ) पाश्चात्य लोक आपल्यापेक्षां अधिक शीलवान् आहेत काय?

( इ ) राष्ट्रोपयोगी सद्गुण कोणते व ते कसे वाढवावेत?

( ई ) तुमच्या परिचयांतील एखाद्या शीलवान् मनुष्याचें वर्णन लिहा.

**उपयुक्त वाचनः**—महाभारत, शान्तिपर्व ( अध्याय १२४ ) यातील प्रल्हाद व इंद्र याचा शीलासंबंधीं संवाद.

१२ **वक्तृत्वः**— आत्मसात् करणे = आपलीशी करणें. सुसंबद्ध = तर्काला धरून. उद्धृत करणें = उचलून घेणें. तदनुरोधानें = त्याप्रमाणें. ईश्वरदत्त = जन्मसिद्ध.

प्रश्नः—( अ ) वक्तृत्वाला विद्वत्तेची आवश्यकता कां आहे?

( आ ) बोलण्याला कृतीची जोड असावी म्हणजे काय?

**उपयुक्त वाचनः**— निबंधमालेत वक्तृत्वावर फार मोठा लेख आहे. अवश्य वाचा.

शतेषु जायते शूरः । सहस्रेषु च पण्डितः ।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥ अर्थ लिहा.

१३ **वक्तृत्वकलाविषयक सूचनाः**—अंगविक्षेप = अभिनय, हावभाव. विषयांतर = पहिला विषय सुटून दुसरा विषय चालू होणें. रुचिवैचित्र्य = आवडीची विविधता.

श्नः—( अ ) वक्तृत्व अंगीं बाणण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं कोणते उपाय करावेत?

( आ ) बोलणाऱ्यांच्या कांहीं लकबांचें वर्णन करा. उ. कोणी खांदे उडवतात, कोणी उगीचच मागें पुढें होतात, इ.

( इ ) तुम्हांला एखाद्या पुढाऱ्याचें भाषण सर्वोत्कृष्ट वाटलें असेल. तसे तें का वाटलें तें सांगा.

१४ **वेळाचा सदुपयोग**:—वायफळ = निरुपयोगी. बिनदिक्कत = निःशंकपणें. आक्षेप = हरकत. अजबखाना = पदार्थसंग्रहालय. टिवल्या बावल्या करणें = रिकामटेकड्या गोष्टींत वेळ काढणें.

**प्रश्नः**—( अ ) 'वेळ झाला नाहीं हें उत्तर शें ९९ वेळां खोटें असतें' या विधानाची चर्चा करा.

( आ ) तुम्हाला कोणता नाद आहे ? गप्पा मारण्याचा नाद का वाईट ?

( इ ) सृष्टि हा एक अजबखाना कसा ?

( ई ) वेळेचा सदुपयोग हे तत्त्व लक्षांत ठेवून त्याच्या अनुरोधानें तुमचा दिवाळीच्या सुटींतील अगर उन्हाळयाच्या सुटींतील कार्यक्रम कसा असतो याचें वर्णन करा.

१५ **वक्तशीरपणा**:—प्रायश्चित्त = पापाबद्दल वाईट वाटून केलेलें परिमार्जन. दण्डक = नियम.

**प्रश्नः**—( अ ) वेळेवर काम न केल्यामुळें तुमचें स्वतःचें नुकसान झालें अशा एकाद्या प्रसंगाचें वर्णन करा.

( आ ) निसर्गातील वक्तशीरपणा कसा असतो त्याचें वर्णन करा. निसर्गांत अनियमितपणा चालू झाल्यास केवढा अनर्थ माजेल बरें !

१६ **एका विद्वान् पदवीधराचे स्वगत विचार**:—मुक्तकंठानें = मनापासून, खुल्या दिलानें. खानदानींतील = चांगल्या श्रीमंत घराण्यांतील. संस्कार = ठसा. अव्याहत = सतत, खंड न पडतां. पारंगत = परिपूर्ण ज्ञान असलेला.

**प्रश्नः**—( अ ) मनुष्यास अत्यंत अवश्य असें ज्ञान कोणतें ?

( आ ) खरा शहाणा कोण ?

( इ ) तुमचें अज्ञान तुम्हांस विशेष जाणवणाऱ्या एखाद–दुसऱ्या प्रसंगाचें वर्णन करा.

उपयुक्त वाचनः—कै० वि. कृ. चिपळूणकर यांचा 'मनुष्याचें आटोकाट ज्ञान' हा निबंध वाचा.

१७ अज्ञानेंच स्वराज्य गेलें !

प्रश्नः—( अ ) विठूच्या अंगीं कोणते सद्गुण होते ?

( आ ) विठूप्रमाणें तुम्ही केलेलें एखादें परोपकाराचें कृत्य सांगा.

१८ दैनंदिनीचें महत्त्वः—आयव्यय = जमाखर्च. अक्षम्य प्रमाद = फार मोठी चूक. भंगुर = नाश पावणारे. धक्केचपेटे = अडचणींचा मार.

प्रश्नः—१ आयुष्याचें दिवाळें काढणें म्हणजे काय ? तें कसें थांबेल ?

२ दैनंदिनी कां लिहितात ?

३ तुमची एक दिवसाची दिनचर्या लिहा.

४ कांहीं मोठीं माणसें दैनंदिनी लिहितात. त्याचा त्यांना तर फायदा होतोच; पण इतरांना सुद्धां होतो. उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

प्रत्यहं इ० दररोज माणसानें आपण काय केलें याचा आढावा घ्यावा. आपण पशूसारखें कृत्य कोणतें केलें कीं काय व चांगलीं कृत्यें कोणतीं केलीं हें पहावें.

१९ उद्योगः—निसर्गनिर्मित = सृष्टीनें निर्माण केलेली. कलोपासक= कलेचा भक्त. कांस धरणें = आश्रय घेणें.

प्रश्नः—( अ ) कालाचा, वित्ताचा व चित्ताचा अपव्यय म्हणजे काय ? सोदाहरण सांगा.

( आ ) साहेब लोकांचे कोणते गुण आपण घेतले पाहिजेत ?

(इ) दीर्घोद्योगानें उत्कर्षास चढलेल्या तुमच्या पाहण्यांतील लोकांचीं उदाहरणें द्या. त्यांनीं कशी खटपट केली त्याचें वर्णन करा.

२० वाचनः—सांगोपांग = संपूर्ण. सुहृत् + स्नेह = मित्रावरील प्रेम. मृगजल = आभास ( मृग + जल ), वाळवंटांत हरिणाना पाण्याचा भास होतो तो.

प्रश्नः—(अ) रामशास्त्र्यांची निस्पृहता व धैर्य आणि बाजीप्रभूची स्वामिनिष्ठा याविषयीं तुम्हांस असलेली माहिती सांगा.

(आ) ग्रंथ-वाचनापासून कोणते फायदे होतात?

२१ प्रेमबन्ध. विसर्जन = टाकणें.

प्रश्नः—(अ) आजच्या काळात चांगलीं माणसें अत्यल्प आहेत असें कां म्हटले आहे? तुमचा अनुभव काय आहे?

(आ) जनावरात माणसापेक्षां अधिक गुण कोणते असतात?

(ई) जनावरे आपलें प्रेम कसें व्यक्त करतात?

२२ आईचें मुलास पत्र. नर्मदेंतील गोटे = ज्याच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं अशीं माणसें. कविकुलगुरु = कविश्रेष्ठ कालिदास.

प्रश्नः—(अ) हॉटेले हीं नरकाचीं द्वारें कशीं?

(आ) मुंबई मोहमयी कशी?

(इ) पत्रांतील आई आपल्या मुलाकडून कोणती अपेक्षा करते?

(ई) पत्रांतील आई सुशिक्षित आहे कीं, अशिक्षित? कारणें द्या.

२३ रत्नाकरः-नितांत = अतिशय. अन्तरित = समाविष्ट, मिळून गेलेलीं.

प्रश्नः—(अ) समुद्राला रत्नाकर का म्हणतात?

(आ) समुद्रकांठच्या शोभेचें वर्णन करा.

(इ) सूर्यास्त आणि सूर्योदय यांचें वर्णन करा.

२४ भाऊबीजः—

प्रश्नः—(अ) दारिद्र्यापासून कोणता फायदा होऊं शकतो?

(आ) चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनीं शाळा काढण्याचा अट्टहास कां केला?

( इ ) महाराष्ट्रांत गरिबींतून वर आलेल्या मोठ्या माणसांचीं उदाहरणें द्या.

२५ सौजन्यः—मातब्बरी = महत्त्व. उपकृति = उपकार. प्रियं च नानृतं ब्रूयात् ।=गोड बोलत असतांना तें असत्य असणार नाहीं याची काळजी घ्यावी.

प्रश्नः—( अ ) 'उपकृतीवाचून जे गोड बोलणें तें लबाडी होय' हें कसें ?

( आ ) कठोर बोलणें केव्हां हितकारक ठरतें ?

( इ ) कर्णपर्वांतील गोष्ट लिहून तिचें तात्पर्य सांगा.

( ई ) शिष्टाचाराचा अतिरेकहि कृत्रिमपणामुळें आपणास पसंत पडत नाहीं. उदाहरणें द्या.

२६ झोंपः—द्विज = ज्यांना उपनयन संस्कार करिता येतो ते म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य. वधू = नवरी, उपवर कन्या.

प्रश्नः—( अ ) 'झोंपेसारखें औषध नाहीं' या वाक्याचा खुलासा करा.

( आ ) जागरणाच्या दुसऱ्या दिवशीं तुम्हास कसें वाटतें त्याचें वर्णन करा.

उपयुक्त वाचनः—( अ ) शेक्सपियरच्या. मॅक्बेथ नाटकात लेडी मॅकबेथनें खुनाला मदत केल्यामुळें तिला झोंप लागत नाहीं याचें सुंदर वर्णन.

(आ) मृच्छकटिकात निद्रा कशी येते यासंबंधींचें वर्णन.

( इ ) वर्ड्स्वर्थची कविता A flock of sheep etc.

२७ संस्कृत भाषाः—उद्बोधक = ज्ञान देणाऱ्या. प्रत्यय = अनुभव. अमरत्व = अविनाशित्व.

प्रश्नः—( अ ) ऋषींचे वंशज शोभण्याकरिता आपण काय केलें पाहिजे ?

( आ ) संस्कृतमधील ज्ञानभांडाराचें दिग्दर्शन करा.

( इ ) आपली परंपरा उज्ज्वल कशी आहे तें विशद करा.

( ई ) आज आपण शास्त्रज्ञानांत इतर देशांच्या मागें कां पडलों आहोंत ?

२८ **दुराग्रह सोडा**:— अलंकृत करणें = शोभा आणणें. विवाद्य = वादग्रस्त. निश्चेष्ट = हालचाल न करणारे, स्तब्ध.

**प्रश्न**:—( अ ) कांहीं प्राचीन व अर्वाचीन विदुषी स्त्रियांचीं नांवें सांगा.

( आ ) दोन सरदारांच्या गोष्टींतील मर्म सांगा.

( इ ) न्यायाधिशांत मुख्य गुण कोणता असावयास पाहिजे ?

२९ **साधु पुरुष कसे ओळखावेत ?**—काकतालीय न्याय = ताडाचे फादीवर कावळा बसायला व फादी मोडायला गाठ पडावी त्याप्रमाणे चुकून घडणाऱ्या गोष्टीला हा न्याय लावितात. उदित होणे = उत्पन्न होणे. भूतानुकंपा = प्राण्याविषयीं दया.

**प्रश्न** :—( अ ) म. गांधींना साधु का म्हटले आहे ? महात्मा म्हणजे काय ?

( आ ) साधूचीं मुख्य लक्षणे द्या.

( इ ) तुमच्या पहाण्यात प्रपंच करून अगदीं साधेपणाने रहाणारा असा सत्पुरुष आला आहे काय ? असल्यास त्याच्या राहणीचें वर्णन करा.

३० **एक अर्वाचीन संत**:-विस्मय = आश्चर्य. सहिष्णुवृत्ति= सहनशीलता.

**प्रश्न**:—( अ ) प्रो. कर्वे याना सत्पुरुष का म्हटलें आहे त्याचीं कारणें सांगा.

( आ ) सत्पुरुषाना त्याच्या हयातींत लोकापवाद सहन करावा लागतो तो कां ?

३१ **धर्म व उपवास** :—प्रत्यवाय = हरकत तरफदारी = समर्थन. हिंसाप्रवर्तक = हिंसेचे पुरस्कर्ते. चिकित्सेची = मुळ कारण शोधून काढण्याची.

**प्रश्न**:—[ अ ] उपवासाचें शास्त्रीय स्वरूप कोणतें ? हल्लीं उपवासाला कोणतें स्वरूप आलें आहे ?

[ आ ] म. गांधी केव्हां केव्हां मोठे उपवास कां करतात ?

[ इ ] रूढीमुळें उपवासाला जसें विकृत स्वरूप आलें आहे, तसें इतर कोणत्या धार्मिक कल्पनांना आलें आहे का ?

[ ई ] इंद्रियसंयमाचें महत्त्व सांगा.

३२ औद्योगिक शिक्षणः—हुन्नर = कलाकौशल्य. इभ्रत = प्रतिष्ठा.

प्रश्नः—( अ ) कोंकणांतील लोकांच्या गरिबीचें वर्णन करा.

( आ ) स्वदेशी व्रताची आवश्यकता कां आहे ?

( इ ) सुशिक्षित बायकांनीं करण्यासारखे घरगुती धंदे कोणते ?

( ई ) इभ्रतीचें पिशाच म्हणजे काय ? त्यापासून काय नुकसान होतें ?

( उ ) यंत्रामुळें घरगुती धंदे मारले जातात. ते राखण्यास काय केलें पाहिजे ?

३३ व्यसनें:—लाचार = असहाय, निरुपाय. व्यभिचार = परस्त्रीशीं अधर्म्य संबंध. निषिद्ध = मनाई असलेले.

प्रश्नः—( अ ) लोक व्यसनी कां होतात ? व्यसनी मनुष्याच्या कुटुंबाची कशी दुर्दशा होते याचें वर्णन करा.

( आ ) दारूबंदीमध्यें सरकारास आपण साहाय्य कां केलें पाहिजे ? तें कसें करता येईल ?

( इ ) ‘ दारूचा नायनाट केला तर गरीब कुटुंबें सुखी होतील ’ कां तें सविस्तर सांगा.

( ई ) विद्याव्यसन म्हणजे काय ?

# या पुस्तकावरील अभिप्राय

## साहित्याचार्य न. चिं. केळकर, बी. ए. एलएल्. बी. पुणें.

पुस्तक वाचून पाहिले. चांगले साधले आहे. विद्यार्थ्यांना समजेल व आवडेल अशी विषयांची सजावट असून भाषाहि सोपी व सहज-सुंदर आहे. विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यास योग्य पुस्तक.

---

## प्रि. गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए., सांगली.

[ निवृत्त प्रिन्सिपाल स्पेन्स ट्रेनिंग कॉलेज, जबलपूर. ]

माझे मित्र श्रीयुत गोविंदराव चोळकर यांनीं लिहिलेलें 'बालसुहृद्' हें पुस्तक वाचलें. नांवाप्रमाणें खरोखर हें पुस्तक मुलाचा जिव्हाळयाचा सन्मित्र ठरेल अशी आशा वाटते. 'बाल' शब्द 'ग्रहणधारणपटुः' या अर्थानें योजलेला दिसतो. अर्थात् बारा वर्षांपुढच्या दुय्यम शिक्षण घेत असलेल्या मुलांमुलींस व दुर्दैवानें अधिक शिक्षण न मिळाल्यानें अधिक प्रौढ वाङ्मयास मुकलेल्या अनेक बंधुभगिनींस संसारांत कसें वागावें हें अत्यंत हृद्य व मनोरंजक पद्धतीनें या पुस्तकांत सांगितलें आहे. केवळ निबंधात्मक पाठ यांत थोडेच आहेत. बहुतेक पाठांची उभारणी व्यावहारिक अनुभवाच्या गोष्टी व दृष्टांत यांवर केलेली आहे. यामुळें रूक्ष तात्त्विक चर्चेचें स्वरूप कोठेंही न येतां सहज हसत खेळत केलेल्या चटकदार संभाषणाची गोडी या पाठांस आली आहे. भाषा अगदीं साधी, ओघवती आहे. विकासोन्मुख व संस्कारक्षम अशा वयांत मार्ग-दर्शक असें हें पुस्तक ठरेल असा दृढ विश्वास वाटतो.

---

**रावसाहेब नारायण गोविंद चाफेकर,** बी. ए. एल्‌एल्. बी.,
**बदलापूर** [ ठाणें ].

सध्यां स्वराज्य–दोन आणे कां होईना आपल्या पदरीं पडलें आहे. व पूर्ण स्वराज्यप्राप्तीचा काल फार दूर नाहीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. अशा वेळीं प्रत्येक मुलामुलीला नागरिकत्वाचें शिक्षण मिळणें अवश्य आहे. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीची राष्ट्रसेवाविषयक उपयुक्तता वाढविणें हे उपरिनिर्दिष्ट शिक्षणाचें कार्य आहे. हे शिक्षण जेणेंकरून लाभेल अशीं पुस्तकें शिक्षणक्रमात समाविष्ट करणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीने विचार करता श्री. चोळकर याचें 'बालसुहृद्' हे पुस्तक अत्यंत उपयुक्त होईल ह्याविषयीं मला शंका वाटत नाहीं. मुलामुलींचे शरीर, मन व बुद्धि सुदृढ व सुसंस्कृत होऊन प्रौढपणीं तीं आदर्शभूत नागरिक बनतील अशी प्रस्तुत पुस्तकाची रचना ग्रंथकारांनीं केली आहे. भाषा विषयाला अनुरूप अशीच प्रौढ व सुबोध आहे. अशा पुस्तकाचें वाचन शाळेंतील विद्यार्थ्यांकडून सक्तीनें करून घेण्यांत आले पाहिजे. प्रस्तुत उपक्रमावरून ग्रंथकर्त्यास अशी सूचना करावीशी वाटते कीं, त्यांनीं अशा तऱ्हेचीं आणखीं दोन तरी पुस्तकें लिहावीं आणि भावी पिढी कार्यक्षम करण्याचें श्रेय घ्यावें.

---

**प्रो. वा. म. जोशी,** एम्. ए., पुणें.

इचलकरंजी येथील हायस्कूलचे मुख्य अध्यापक रा० चोळकर यांनीं 'बालसुहृद्' नांवाचें लिहिलेले पुस्तक वाचून पाहिलें. ह्यातील लहान निबंध, संवाद, पत्रें इत्यादि मुलांना मनोरंजक आहेत. आणि हें पुस्तक मुलांमुलींना खरोखर सुहृदय अशा सुहृदाप्रमाणें वाटेल अशी माझी समजूत आहे.

---

## श्री. पांडुरंग सदाशिव साने, गुरुजी, एम्. ए., अमळनेर.

श्री. गोविंदराव चोळकर, इचलकरंजी हायस्कूलचे हेडमास्तर हे माझे स्नेही आहेत. श्री चोळकर यांचें १॥ तप आज अध्यापनांत गेलें. शिक्षकाचे कामात ते रंगले आहेत. बालसुहृद् हें अप्रतिम पुस्तक लिहून ते मुलांचे खरोखरच प्रेमळ मित्र झाले आहेत. या पुस्तकांतील कांहीं निबंध १९२८।२९ मध्ये अमळनेरच्या विद्यार्थी मासिकांत प्रसिद्ध झाले होते. हे निबंध हळुहळु जमत गेले. हे निबंध सोपे सुटसुटीत आहेत. त्यात पाल्हाळ नाहीं. त्यात कठिणपणा नाहीं. भाषा साधी असून सहृदय आहे. संस्कृतांतील निरनिराळीं सुभाषितें विखुरलेलीं पाहून आल्हाद होतो. हे निबंध वाचून मुलास बोध, आनंद मिळेलच, त्याबरोबर बहुश्रुतपणाहि लाभेल. निबंध अकृत्रिमपणे फुलणाऱ्या फुलासारखे वाटतात. हे निबंध म्हणजे मोगऱ्याचीं जणूं फुलें; तृणपर्णावरील गोड दंवबिंदु.

साधे परंतु सुंदर व निर्मळ व पवित्र. या निबंधाच्या मांडणींतही एक हेतु दिसतो. आरंभीं देवाचें स्मरण, मग देशाचें, मग आईबाप, गुरु आले आहेत. मग प्रेमळ भावंडें. या सर्वांची ओळख झाली. या सर्वांसंबंधीं आपलीं कर्तव्ये असतात. तीं पार पाडण्यास मनुष्यानें शरीर, हृदय व बुद्धि याचा विकास केला पाहिजे. त्याला अनुलक्षून पुढील निबंध आहेत. शरीराला व्यायाम व ब्रम्हचर्य. शरीर व मन प्रसन्न रहावें म्हणून सृष्टिसौंदर्याचा परिचय. देवाचे सृष्टिसौंदर्य पाहून स्वतःहि तें निर्माण करावे म्हणून "आरामरचना;" जीवनातहि बाग फुलावी म्हणून शीलपालन. अशाप्रकारें एक संगति आहे. परंतु बाग कितीहि चांगली केली तर कीड लागता कामा नये. म्हणून शेवटच्या निबंधांत 'व्यसनें' हा निबंध लिहून धोक्याची सूचनाहि आहे. असो. हे निबंध गोड आहेत. उद्बोधक आहेत. विद्यार्थ्यांस व शिक्षकांस हे फार आवडतील अशी मला आशा आहे. पुस्तकाची छपाईहि ठसठशीत अशी आहे.

---

**डॉ. ग. श्री. खैर**, एम्. ए., पीएच्. डी, महाराष्ट्र विद्यालय, **पुणें.**

आपलें निबंधाचें पुस्तक मी समग्र वाचून पाहिलें. निबंध लिहिण्याची आपली शैली साधी, सोपी व आकर्षक अशी आहे. एकादा विवक्षित अभ्यासक्रम नजरेपुढें ठेवून प्राथमिक शाळेच्या व हायस्कूलच्या वर्गाकरितां जर आपण पुस्तकें लिहिलींत तर तीं उपयुक्त होतील असें मला वाटतें.

नवीन शिक्षणाच्या अमदानीमध्यें देश, समाज, नागरिक कर्तव्यें, राष्ट्रीय ऐक्य इत्यादिविषयक विचारप्रणालींची जर एकादी ग्रंथमाला तयार झाली तर कदाचित् पुढच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या अमदानींत तिचा उपयोग केला जाईल. त्या दृष्टीनें विचार करावा.

---

**रा. कृष्णाजी रामचंद्र कुलकर्णी**, एम्. ए., हेडमास्तर विद्यापीठ हायस्कूल, कोल्हापूर.

माझे मित्र श्रीयुत चोळकर यांनीं लिहिलेल्या ‘ बालसुहृद् ’ या पुस्तकाबद्दल आपला अभिप्राय व्यक्त करतांना मला फार आनंद वाटतो. कोणत्याहि पुस्तकाकडे पहातांना लेखक, लेखनविषय व लेखनशैली या तीन दृष्टीनें विचार करणें इष्ट असतें. माझ्या मतें या तीनहि प्रकारांनीं या पुस्तकानें उपयुक्त कामगिरी केली आहे.

लेखकांचें सार्वजनिक जीवन सर्वच शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रांतच गेलें आहे. त्यांच्या दीड दोन तपाच्या विद्यादानांत त्यांना ज्या विविध गोष्टींचा अनुभव आला, त्याचेंच रसिक व मार्मिक सार या त्यांच्या ग्रंथांत उतरलें आहे. अध्ययन–अध्यापनाच्या जगांत हरघडी येणाऱ्या गोष्टींवरच सूक्ष्म अवलोकनानें सहृदय विचारांचें पांघरूण घातलेलें या पुस्तकांत आढळेल.

लेखनविषय विद्यार्थीजीवनाला उपयुक्त अशा विषयांचें एक धावतें पण परिपूर्ण असें सिंहावलोकनच आहे. व तें, प्रेमळ शिक्षक आदर-

शील विद्यार्थ्यांना गंभीर व पवित्र क्षणीं जसें सांगेल, त्या पद्धतीनें केलें आहे. पण विषयाच्या विविधतेनें पुस्तकांतील प्रतिपादनांतील अनुस्युत सुवर्णसूत्र सूक्ष्म दृष्टीला भासल्याशिवाय राहात नाहीं.

लेखनशैली कै. छत्र्याच्या 'बालमित्राचें' नव्या युगाचें सुसंस्कृत स्वरूप अशा रीतीनें वर्णिता येईल. लेखकाच्या विशिष्ट भूमिकेमुळें हें पुस्तक 'अधृष्य' ( उपहास वृत्तीनें वाचणें अशक्य असलेलें ) पण 'अभिगम्य' ( त्यांतील हृद्यतेनें सर्वांना आकर्षित करणारें ) असेंच कालिदासाच्या भाषेंत आहे.

असल्या बहुमोल पुस्तकाची बाल–वाङ्मयांत भर घातल्याबद्दल श्री. चोळकर यांचें हार्दिक अभिनंदन करतों.

---

**श्री. सौ. मालतीबाई दांडेकर,** बुधगांव ( S. M. C. )

सर्वच निबंध अगदीं सुटसुटीत व सुंदर आहेत. मला 'मातृदेवो भव' हा फार आवडला. भाषाहि सोपी, पण गंभीर आहे. हें पुस्तक खरोखर विद्यार्थ्यांना प्रिय होईल असं वाटतं. तरी पण संवाद किंवा लघुकथा याऐवजीं निबंधात्मक स्वरूपांतच ते विशेष परिणामकारक वाटतात असं मला वाटतं.

---

**आचार्य स. ज. भागवत,** आश्रम सासवड.

सध्या महाराष्ट्रांत खेड्यांतून आणि शहरांतून मुलांचें आणि मुलींचें शिक्षण झपाट्यानें वाढूं लागलें आहे. साक्षरतेच्या मोहिमेला सर्वत्र सुरवात झाली आहे. अशा वेळीं साक्षरांच्या हातीं जीवनाला सर्व दृष्टींनीं शुद्धि आणि समृद्धि आणणारें वाङ्मय कसें पडेल हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रश्नाचा यशस्वी उलगडा झाला नाहीं तर शिक्ष-

णामुळें लाभ व्हावयाचा एकीकडेच राहून घोर हानि मात्र होईल. श्री. गोविंदराव चोळकर यांचा 'बालसुहृद्' वाचल्यानंतर मला असें वाटलें कीं, हें पुस्तक महाराष्ट्रांत प्रत्येक घरीं गेलें पाहिजे. कारण यातील लेखांत विषयाची विविधता, भाषेचा सोपेपणा आणि शैलीचा रसाळपणा एवढेच गुण आहेत असें नाहीं. जीवनातील सर्वश्रेष्ठ आकाक्षा यात अतिशय रोचकपणें व्यक्त झालेल्या आहेत. रवींद्रनाथांनी एका कवितेंत म्हटल्या प्रमाणें प्रत्येक बालक हें 'निजेर से विश्वेर से विश्वदेवतार' याप्रमाणें स्वतःचें, विश्वाचें आणि विश्वदेवतेचे असतें. याची जाणीव जितक्या लवकर त्याला, त्याच्या चालकांना आणि त्याच्या शिक्षकाना होईल तितकें चांगलें. उपनयनांमध्यें हीच दृष्टि होती. विद्या, ब्रम्हचर्य आणि प्रार्थना या तीन साधनाचा त्यांत समावेश केला जात असे. शिक्षणानें आणि वाङ्मयानें मुलाना या तीनहि गोष्टी दिल्या पाहिजेत. 'बालसुहृद्' ज्या बालांच्या हातीं जाईल त्याना स्वतःची, स्वतःभोंवतीं पसरलेल्या समाजाचीं आणि विश्व व्यापून राहिलेल्या सत्तत्त्वांचीं कर्तव्यें करण्यास प्रेरणा देत राहील यांत मला मुळींच संशय वाटत नाहीं.

---

## श्रीमती सौ० कमलाबाई टिळक, एम्. ए. बडोदें.

( निवृत्त प्रिन्सिपॉल वुइमेन्स कॉलेज, काशी विद्यापीठ )

शालेय शिक्षणांत नीतिशिक्षणाला प्रमुख स्थान असलें पाहिजे, ही गोष्ट बहुंशीं आज निर्विवाद ठरली आहे. मात्र या शिक्षणाचा अभ्यासक्रम कसा आखावा, त्याचीं पाठ्य पुस्तकें काय स्वरूपाचीं असावींत, याबद्दल निश्चित मत अजून झालेलें दिसत नाहीं. तद्विषयक निरनिराळे प्रयोग शिक्षणक्षेत्रांतून ठिकठिकाणीं चालू आहेत. अशा स्थितींत श्रीयुत चोळकर यांचें 'बालसुहृद्' हें पुस्तक एक मोठी उणीव भरून काढीलसें वाटतें. सुबोध व रसाळ भाषेंत, मित्रत्वाच्या नात्यानें, अनेक अमोल नीतितत्त्वें बालवाचकांच्या हृदयावर ठसवण्याचा या पुस्तकांत

प्रयत्न केला आहे. व तो अत्यंत यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रम्हचर्य, व्यायाम, उद्योग, वाचन, वक्तृत्व, वक्तशीरपणा शीलपालन इत्यादि विषयांच्या चर्चेनें विद्यार्थ्यांचीं शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढ उत्तम होण्यास मदत होईल, तर मातृभक्ति, पितृभक्ति, गुरुभक्ति, कौटुंबिक कर्तव्यें, औद्योगिक शिक्षण, राष्ट्रधर्म, यासंबंधीं लेखकानें दिलेल्या उत्तम उपदेशाच्या मननानें मुलें उत्कृष्ट नागरिक व निपुण समाजसेवक बनतील.

एकंदरीनें दीडशें पानांच्या लहानशा मर्यादेंत, पंधरा सोळा वर्षें वयांच्या मुलांना आवश्यक तेवढें सारें नीतिशिक्षण लेखकानें चतुरस्रपणें बसवलें आहे व यामुळें उपरोक्त विषयावरील पाठ्य पुस्तक म्हणून 'बालसुहृद्' याचा अतिशय उत्तम उपयोग होईल यांत शंका नाहीं.

---

Prof. **R. D. Karamarkar,**
B. A., S. T. C., D. F. T. S.,
Ex-Headmaster, N. J. Highschool,
Karachi:—

I went through all the stories and I must admit each article is well balanced and also an inspired one.

Wish you every success in this branch of literature.

---

Mr. **R. N. Pandit,**
B. A.,
Retired Deputy Collector,
Belgaum.—

With the variety of subjects—religious, moral and cultural—treated in an easy, idiomatic and graceful style, the book is a model of composition and instruction to the students in the Vernacular and English schools alike, and is a veritable "Friend" which it justifiably professes to be.

---

# मुलांना वाचनीय पुस्तकें

१ जीवनप्रकाशन म्हणजेच मोठ्यांच्या छोट्या गोष्टी
ले. साने गुरुजी ०—२—०

२ विश्राम (गोष्टी) ,, ,, ०—१०—०

३ विद्यार्थी जीवन ०—८—०

४ उपनिषदांतील दहा गोष्टी ०—६—०

५ कांग्रेसची कथा ०—१—०

६ विद्यार्थ्यांचें साम्राज्य (संपूर्ण विद्यार्थी जीवनावर आधारलेली कादंबरी) २—०—०

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार,**
महाद्वाररोड कोल्हापूर.